महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका



अनुक्रमणिका

आवाहन

मराठीतील दर्जेदार नियतकालिकांच्या दुरावस्थेची समस्या गेल्या काही वर्षांपासून विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र 'युगवाणी'च्या संघटित प्रयत्नानंतर मराठी वाङ्‌मयीन संस्कृतीतील एक सर्वाधिक अग्रक्रमाची समस्या म्हणून आता पुरेशी जाणवू लागली आहे.

मात्र त्यावरील तोडगा, उपाययोजना व त्याकरता आवश्यक त्या सामूहिक कृतीकरता पुरेशी इच्छाशक्ती अद्यापही अभावानेच आढळते.

विदर्भ साहित्य संघाच्या 'युगवाणी' या नियतकालिकाने मराठीतील पहिली वहिली नियतकालिक विकास परिषद घेऊन त्याद्वारे केवळ युगवाणीच नव्हे तर तत्सम सर्वच वाङ्‌मयीन नियतकालिकांच्या उपजीविकेच्या समस्यांची शासनाने दखल घेतली. त्याबावत एक समिती नियुक्त करुन त्यावर विचारही केलेला असून समितीने मांडलेल्या सूचनांची स्वीकृती व अंमलबजावणी याबावत मात्र अद्याप कोणताच निर्णय घेतलेला नाही. तो तसा जलद घ्यावा अशी मागणी सर्वच वाङ्‌मयीन नियतकालिकांकडून होणे आवश्यकही आहे. दुसरी वाङ्‌मयीन नियतकालिक विकास परिषद शासनाच्या या संबंधातील निर्णया नंतरच आयोजित करावी असा मानस असल्याने त्या संदर्भातही पुढील हालचाल तूर्तास स्थगित आहे. दरम्यान पहिल्या वाङ्‌मयीन नियतकालिक विकास परिषदेने सुचविल्याप्रमाणे प्रत्येक वाङ्‌मयीन नियतकालिकांनी आपआपला स्थायी निधी उभारण्याच्या सुचनेची अंमलबजावणी विदर्भ साहित्य संघाने करावी असे कार्यकारिणीने ठरविले असून 'युगवाणी' या विदर्भ साहित्य संघाच्या नियतकालिकाने आपला स्वतःचा स्थायी निधी उभारावा या हेतुने सर्व वाचक, वर्गणीदार, संस्था, व्यक्ती व वाङ्‌मयप्रेमी यांना हे आवाहन करण्यात येत आहे.

'युगवाणी' या नियतकालिकाला पुढेही स्थिर पायावर कायम उभे राहता यावे याकरता एक 'स्थायी निधी' उभारण्याचे ठरविण्यात आले असून त्यास सर्व संबंधितांनी सढळ हाताने मदत करावी व ही वाङ्‌मयीन संस्कृती कायम राखण्यास अधिक समृद्ध करण्यास सहकार्य करावे ही विनंती आहे या निधीत रुपये पाचशे व अधिक रक्कम जमा करणाऱ्यास 'युगवाणी'चा अंक आजीव प्राप्त होत राहील.

'युगवाणी'चा स्थायी निधी हा मराठी वाङ्‌मयीन संस्कृती टिकवून धरण्याच्या कार्यातील एक सर्वाधिक महत्वपूर्ण दुवा समजून समस्त वाङ्‌मयप्रेमी यथाशक्ती सहकार्य करतीलच या विश्वासासह हे आवाहन.

संपादक/प्रकाशक
'युगवाणी'
विदर्भ साहित्य संघ, नागपूर

● ●

टिप निधीची रक्कम चेक/ड्राफ्टने सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ या नावे कृपया **'युगवाणी स्थायी निधीकरता'** असे नमूद करून पाठवावी ही विनंती.

युगवाणी

॥ विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र ॥

संपादक : श्रीपाद भालचंद्र जोशी

॥ भाषा, साहित्य, संस्कृती, संवाद व कलाविषयक अभिरुचीचे जोपासन–संवर्धन–संशोधन ॥

प्रबंध संपादक : केशव जोशी

संपादक मंडळ : डॉ. विश्वास कानडे / डॉ. दमयंती पांढरीपांडे / मनोहर तल्हार / कमलाकर घारप / प्रा. कृष्णा चौधरी / भगवान ठग

वर्ष अठ्ठेचाळीसावे / अंक ४८–७/८ जुलै–ऑगष्ट – १९९२

मूल्य–१० रु./वार्षिक वर्गणी : ९० रु.

त्रैवार्षिक वर्गणी : १२५ रु.


अनुक्रम ■ ■ ■ ■

[महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाकडून अंशत: अनुदान प्राप्त]

आवरण पृष्ठ : संजय धोतरकर
रेखाचित्रे : राजू महाजन / स्व. भाऊ समर्थ / विकास
मुद्रित शोधन / संकलन / प्रतिलिपी इ. सहकार्य : सौ. शोभा उबगडे / सौ. कुंदा केळापुरे / श्यामकांत कुळकर्णी

संपादकीय पत्रव्यवहार : संपादक, युगवाणी, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, नागपूर ४४००१२

वर्गणी व वितरणविषयक पत्रव्यवहार : सरचिटणीस / विदर्भ साहित्य संघ, नागपूर



अनुक्रमणिका

संपादकीय

नव्या कार्यकालाच्या नव्या संपादक मंडळासहित प्रकाशित होत असलेला हा अंक मुद्रणातील विलंबामुळे अक्षम्य अशा विलंबाने वाचक, वर्गणीदार व सदस्यांना प्राप्त होत आहे याची व पुढील अंकांना देखील त्यामुळे जो विलंब संभवतो त्याची खंत असून वाङमयीन नियतकालिकांच्या व्यवहारात एकूणच किती उदासीनता ओतप्रोत भरून उरते आहे याचेच ही गोष्ट निदर्शक आहे यात शंकाच नाही.

या अशा नियतकालिकांच्या संपादकांच्या हाती केवळ अशा विलंबाच्या संबंधाने हतबलता व्यक्त करणे व अशा प्रत्येक वेळी आपली क्षमायाचना करण्यास भाग पाडणे या व्यतिरिक्त आपल्या वाङमयीन संस्कृतीच्या समकालीन वास्तवाने फारसे काही ठेवलेलेच नाही.

महत्प्रयासाने प्रत्येक वेळी संपादकांनी ही विलंबाची गाडी रुळावर आणायची आणि ती तशी येते न येते तोच (पुनः पुढच्याच अंकांपासून) ती रुळावरून घसरायची असा हा खेळ गेल्या काही वर्षांपासून सुरू आहे. तो केवळ युगवाणीच्याच संदर्भात आहे, असे नव्हे तर अशा वाङ्मयीन नियतकालिकांचे जणू ते समकालीन प्राक्तनच झालेले आहे. अशा खेळातच कदाचित एखाद्या दिवशी अचानक या वाङ्मयीन नियतकालिकांपैकी कुणाचा केव्हा अपमृत्यु ओढवेल व त्यात कोण अगोदर आणि कोण नंतर असेल हे सांगता येत नाही. परंतु याच वाङ्मयीन नियतकालिकांकरता आजच्या अंधारलेल्या असलेल्या या युगातूनच ती जगविण्याच्या जिद्दीपोटी कदाचित त्यांच्या स्थायी अस्तित्वाचा नवा सूर्योदय देखील संभवेल अशीदेखील ही स्थिती आहे.

तशा अस्तित्वसंभवाच्या दृष्टीनेच युगवाणीच्या याच अंकात 'युगवाणी स्थायी निधी'करता विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारिणीने ठरविल्याप्रमाणे निधी उभारण्यात सहकार्य करण्याचे आवाहन मलपृष्ठ २ वर करण्यात आलेले आहे. 'युगवाणी'सारखे येत्या दोनच वर्षात पन्नाशी गाठणार असलेले हे नियतकालिक ही पन्नाशी गाठून एक्कावन्नाव्या वर्षात पदार्पण करतेवेळी तरी आजच्या विलंबाच्या व संभाव्य अनिश्चिततेच्या भीतीग्रस्ततेतून पूर्णपणे मोकळे व्हावे व वाङमयीन संस्कृतीतील अशा नियतकालिकास लागलेले ग्रहण कायमचे सुटलेले असावे एवढा स्वतःचा निधी बाळगून असावे अशी महत्त्वाकांक्षी कल्पना यामागे विदर्भ साहित्य संघाची आहे.

अर्थात् वाङमयीन संस्कृती जगवण्याची जिद्द व आस्था बाळगणाऱ्यांच्या व त्या करता 'युगवाणी'सारखी नियतकालिके आपले अस्तित्व कायम टिकवून असलीच पाहिजेत याची कळकळ असणाऱ्यांच्याच भरवशावर, त्यांच्याच सहकार्याने हे घडू शकणार आहे. हे प्रत्यक्षात घडावे या करता या स्थायी निधीस सढळ हस्ते आपले योगदान आपण करावेच परंतु आपआपल्या पातळीवर आपण या नियतकालिकाच्या संभाव्य, कायम अस्तित्वाची तरतूद करणाऱ्या वाङमयीन संस्कृतीचे प्रचारकही होऊन इतरांनाही या कार्यात सहकार्य देण्यास प्रवृत्त करावे ही आग्रहाची नम्र विनंती.

अनुक्रमणिका

युगवाणीचे असंख्य वाचक, वर्गणीदार, सदस्य, लेखक हितचिंतक व वाङमयप्रेमी या कार्यांत सहकार्य करतील असा विश्वास वाटतो. त्या विश्वासापोटीच ही वाङ्मयीन संस्कृती जगविण्याचे हे कळकळीचे आवाहन, तेवढ्याच कळकळीने स्वीकारल्या जाईल या खात्रीसह.

इतर विषयांबाबतची संपादकीय चर्चा त्यामुळेच पुढील अंकी.

तूर्तास मराठी वाङमयीन संस्कृतीचे घटक असणाऱ्या असंख्य प्राध्यापक, महाविद्यालये, विद्यार्थी, अभ्यासक, लेखक-कवी-कलावंत व अगणित वाङमयप्रेमी यांनी युगवाणी हे केवळ नियतकालिक तेवढे नसून ती एक चळवळदेखील आहे. असे समजून तिच्या सातत्याने जोमदारपणे टिकून असल्यावरच या प्रांतातील वाङमयीन संस्कृतीचे अस्तित्व बहुतांशी अवलंबून आहे हे आपआपल्या परीने जाणवून, पटवून घेऊन-देऊन हा स्थायी निधी अधिकाधिक स्थायी करण्याचे आवाहन करावे; त्यात सहकार्य करावे ही विनंती. नवे संपादक मंडळ व नवी कार्यकारिणी यांच्या सहकार्याने हे कार्य अधिक सुलभ होण्यास मदत होईल हा विश्वास आहेच.

श्रीपाद भालचंद्र जोशी

अनुक्रमणिका

जळत आहे दिवा तोवर....

जळत आहे दिवा तोवर
हसत हसत जगून घ्यावे
डोळ्यांत उजेड आहे तोवर
दिव्यासारखे जळून घ्यावे...

रानावनात, डोंगर-दऱ्यात
सैरभैर भटकून घ्यावे
सूर्य आहे तोवर मन
आभाळभर पसरून द्यावे...

काळाला किनारे नसतात
त्याचे अंतर मोजू नये
अनंताचा गुंता येथे
उगाच उकलत बसू नये...

—प्रत्येकाने थोडे थांबून
मागच्याला बोट द्यावे
थडी लागताच मोबदल्यात
घेणाऱ्याने हृदय द्यावे ...!

— बबन सराडकर

नामदेवगाथ्यातील चार नामदेव

सु. बा. कुळकर्णी

१९७० साली महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात सकलसंतशिरोमणी श्री नामदेव महाराज यांची सातवी जन्मशताब्दी साजरी झाली. या निमित्ताने नामदेव समाजोन्नती परिषदेने संत नामदेवांच्या जीवन, कार्य आणि परंपरा यांचा आढावा घेणारा 'श्रीनामदेवदर्शन' या नावाचा एक बृहद्ग्रंथ प्रकाशित केला. या ग्रंथाच्या प्रस्तावनेत वि. भि. कोलते यांनी एक मार्मिक प्रश्न उपस्थित केला आहे. वारकऱ्यांच्या मुखी सतत पुनरावृत्त होणारे एक घोषवाक्य असते :

"निवृत्ति ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई ।
एकनाथ नामदेव तुकाराम ॥"

या घोषवाक्यात संत नामदेव हे ज्ञानदेवांचे समकालीन असूनही त्यांची वर्णी एकनाथांनंतर लागते, असे का व्हावे ? (प्रस्ता. पृ. ३७)

कोलते यांच्या प्रश्नाचा रोख सामाजिक असला तरी त्याचे खरे कारण ऐतिहासिक होय. ते एक ऐतिहासिक सत्य आहे; परंतु अर्धसत्य आहे.

संत नामदेव हे ज्ञानेश्वर–समकालीन होत यात तिळमात्र संदेह नाही. परंतु त्यांच्याच तोलामोलाचा विष्णुदासनामा नावाचा दुसरा एक नामदेव इसवी सनाच्या सोळाव्या शतकात होऊन गेला. या विष्णुदासनाम्याची आणि आद्य नामदेवांची उत्तरकाळात सातत्याने गल्लत झाल्याने ही परिस्थिती उद्भवली. आजमितीला देखील स्वतःला पंडित आणि संशोधक म्हणविणारी मंडळी हीच गल्लत करतात. या उभय नामदेवांचे काव्य एकत्रित छापतात; ते आद्य नामदेवांचे आहे असे समजून त्यावर अभ्यासपूर्ण प्रबंध लिहितात आणि भोळ्याभोबड्या वाचकांच्या माथी मारतात !

सौचिकांचे सारस्वत

वस्तुतः नामदेवगाथा हा सौचिकांच्या सारस्वताचा एक महावृक्ष होय. सुईप्रमाणेच सारस्वताच्या क्षेत्रातही सौचिक मंडळी मागे नाहीत या वस्तुस्थितीचे हे प्रत्यक्ष प्रमाण होय. सात शतकांपूर्वी संत नामदेवांनी लावलेल्या या रोपट्याने आज विशाल स्वरूप धारण केले आहे. भागवत परंपरेतील या रोपट्यावर नामदेवांनी विठ्ठलभक्तीचे जलसिंचन केले. त्याला नामसाधनेचा आधार दिला. त्याच्या सभोवती समतेचा बांध घातला. हां हां म्हणता या रोपट्याला मुळे, फांद्या, पारंब्या फुटून त्याचा विस्तार होत गेला. त्यामुळेच आज मूळ वृक्ष कोणता व त्याचा उत्तरकालीन विस्तार कोणता हा एक संशोधनाचा विषय झाला आहे.

नामदेवगाथेतील आद्य नामदेवांचे काव्य कोणते व इतरांचे कोणते हे शोधण्याचे प्रयत्न आजवर अनेक अभ्यासकांनी केले. परंतु, त्यांमध्ये अनधिकारी मंडळींचेच प्राबल्य माजल्याने गाडी मूळपदावरच स्थिर आहे.

सप्तशताब्दीच्या निमित्ताने महाराष्ट्र शासनाने नामदेवांच्या अभंगांचा एक स्वस्त गाथा वाचकांना उपलब्ध करून दिली. ही गाथा तयार करण्यासाठी शासनाने विद्वानांची एक महासमिती नेमली होती. या समितीच्या ठिकठिकाणी शहात्तर सभा झाल्या. टीएडीएपोटी लाखो रुपये खर्च झाले. परंतु त्यातून निष्पन्न झालेला गाथा हा पूर्वप्रकाशित गाथ्यांचीच एक सुधारलेली आवृत्ती होय ! या समितीवर परंपरेचा दुर्दम्य दबाव होता. यामुळे संशोधनाद्वारे निर्भेळ सत्याला सामोरे जाण्याचे धैर्य समितीला झाले नाही. संशोधन व संपादनाची ही तऱ्हा अशीच चालू दिल्यास संत नामदेवांच्या सारस्वताचे सत्य दर्शन आपणास कधीच होऊ शकणार नाही.

एकनाथपूर्व तमोयुग

शके १५०५ मध्ये एकनाथांनी ज्ञानदेवांची समाधी शोधून काढली व तिचा जीर्णोद्धार केला

शके १५०६ मध्ये त्यांनी ज्ञानेश्वरीचे शुद्धीकरण केले. यापूर्वीचा तीन शतकांचा काळ हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनातील एक तमोयुग होते. या प्रदीर्घ कालखंडात यादवकाळातील राजकीय घडी पूर्णपणे विस्कटून गेली होती. सर्व महाराष्ट्रभर इस्लामी राज्यकर्त्यांची जुलमी राजवट चालू होती. मोठ्या प्रमाणावर धर्मांतरण झाले होते. मंदिर–मठांचा विध्वंस करून त्या जागी मशिदींची व दर्ग्यांची उभारणी झाली होती. प्रजा आपल्या इतिहास आणि परंपरांस विसरून गेली होती. ज्ञानदेव–नामदेवादी संतांचे साहित्य बांदीकोपऱ्यात गेले होते; वा अग्नये स्वाहा झाले होते. संतांच्या जीवनातील घटनांना दंतकथांचा साज चढला होता. अशा या खंडित, दंडित, भ्रष्ट आणि नष्ट लोकजीवनाला पुनश्चेतना देण्याचे कार्य एकनाथ आणि विष्णुदासनामा या नवसंतांनी केले.

कथा, कीर्तन आणि प्रवचन ही त्या काळातील जनसंवादनाची आणि प्रबोधनाची साधने होत. एकनाथ आणि विष्णुदासनामा हे उभय पंडित पट्टीचे कीर्तनकार आणि प्रवचनकार होते. एकनाथांनी ज्ञानदेवांची समाधी शोधून काढली आणि ज्ञानेश्वरीची पाठशुद्ध आवृत्ती तयार केली एवढेच नव्हे, तर त्यांनी स्वतःही रामायण आणि भागवतावर विस्तृत काव्यरचना केली. विष्णुदासनाम्याने मराठीतील पहिले अठरा पर्वे महाभारत रचले. ज्ञानदेव–नामदेवादी प्राचीन संतांविषयी माहिती जमा करून त्यांच्या जीवनावरील आख्याने रचली. या उभय संतांनी अलोट अभंगरचनाही केली. जसजसा काळ लोटला तसतसे हे नवसंतही विस्मृतीच्या गर्तेत विसर्जित झाले.

विष्णुदासनामा

एकनाथ हे पैठणकर ब्राह्मण, तर विष्णुदासनामा हा पंढरपूरकर शिंपी होय. एकनाथांचे काव्य रूक्ष आणि पंडिती वळणाचे होते. विष्णुदासनाम्याच्या काव्याला मात्र प्रतिभेचा परीस लागलेला होता. संत नामदेवांप्रमाणे याने भारतभर तीर्थयात्रा केली. नामभक्तीचा प्रचार केला. याची कीर्ती सर्वदूर पसरली. विष्णुदासनाम्याचे 'रात्र काळी घागर काळी, मल्हार मद्दडें गगनीं दाटलें, परब्रह्म निष्काम तो हा, येई वो विठ्ठले माझे माउली ये, विठ्ठल विसावा सकळिकां पंढरीचे सुख पाहतां एक घडी' इत्यादी अभंग आजही मोठ्या भक्तिभावाने गाईले आणि ऐकिले जातात.

संत नामदेवाचे कौटुंबिक नाव 'नामा' असे होते. त्यांच्या अभंगांतून येणारी त्यांची नाममुद्राही 'नामा म्हणे' अशीच आहे. विष्णुदासनाम्याचेही मूळ नाव 'नाना–नाम्मा–नामया' हेच होय. शिंपी ज्ञातीच्या कुटुंबात नामा किंवा नामदेव हे नाव पूर्वजाभिमानाने पुनरुक्त होणे अगदी स्वाभाविक होय. याच पारंपरिक भक्तिकाव्याचा विस्तार केला व त्यांच्या चरित्रावरील आख्याने लिहिली. असे करताना अनेक वेळा त्याने नामदेवांची भूमिका व सदृश नाममुद्रा धारण केली. नामदेवांपासूनचे भिन्नत्व दर्शविण्यासाठी त्याने आपल्या नावास 'विष्णुदास' हे पूर्वपद जोडले. नामदेवगाथ्यातील 'नामयाचा स्वामी', 'नामयाचा दातार', 'म्हणे नामा' इ. नाममुद्राही विष्णुदासनाम्याच्याच होत. नामसादृश्यामुळे त्याच्या व संत नामदेवांच्या काव्याची पुढे गल्लत होऊन पारंपरिक बाडांतून ते एकत्र लिहिले गेले व अर्वाचीन काळात तसेच छापले गेले. कालांतराने या उभय संतकवींच्या चरित्राचीही गल्लत होऊ लागली. विष्णुदासनाम्यासच लोक संत नामदेव समजू लागले. एकाचे चमत्कार दुसऱ्याच्या नावावर खपवू लागले. अशातच कीर्तनकारांनी त्यात स्वतःचा मालमसाला मिसळून दिला. त्यांच्या या असल्या कर्तृत्वाने नामदेव व ज्ञानदेव या संतांसंबंधी अनेक मिथकथा उभ्या राहिल्या आहेत.

वस्तुतः जनाबाई ही तुकारामकालीन कवयित्री होय. तिच्या काव्याची भाषा याला साक्ष आहे. ही विष्णुदासनाम्याची शिष्या असावी, असे तिच्या 'नामयाची दासी' या नाममुद्रेवरून दिसून येते. कीर्तनकारांनी तिला आद्य नामदेवांची दासी बनवून टाकले. क्षेत्रोपजीवी मंडळींनी तर तिची वाकळ, उखळ, मुसळ, जाते व भांडीकुंडीही मिळवून आणली! विष्णुदासनाम्याचे अनेक

अभंग शिखांच्या ग्रंथसाहेबात समाविष्ट झालेले आहेत, संत नामदेवांची मुखबानी म्हणून प्रसिद्ध असलेल्या झाडून साऱ्या अभंगांची भाषा ही सोळाव्या शतकातील हिंदी आहे. पंजाबातील नामदेव हा विष्णुदासनामाच असण्याचा अधिक संभव होय.

पंडितांची पोटदुखी

विष्णुदासनामा हा महान भक्त आणि भाषा-प्रभू होता. त्याला मराठीशिवाय हिंदी, दखनी, कोकणी, कन्नड, गुजराती या भाषाही अवगत होत्या. पंचगोपिकांच्या अभंगात (म. शा. गाथा, अ. क्र. २६३) तर त्याने पाच वेगवेगळ्या भाषांतील संभाषणच सादर केले आहे. त्याच्या पांडित्याची अलीकडे काही विद्वानांना पोटदुखी झाली व त्यांनी त्यास विप्र बनवून टाकले ! कोणत्याशा कामाईच्या आरतीत गो. का. चांदोरकारांना 'विप्र विष्णुदास' अशी नाममुद्रा आढळली. (भा. इ. सं. मं. पु. ९, पृ. ७०). पांडित्याचा वसा फक्त विप्रांनाच असू शकतो अशा समजूतीने त्यांनी त्या आरतीचे कर्तृत्व विष्णुदासनाम्यास बहाल केले व त्यास विप्र बनवून टाकले. एवढे बरे, की वि. ल. भावे यांनी या आरतीतील 'विप्र विष्णुदासा'चा 'प्रिय विष्णुदास' हा पाठभेद नोंदून ठेवला आहे (महा. सारस्वत, आ. ६, पृ. २१५)

नामदेवगाथ्यातील समाधि-प्रकरणांचा व तीर्थावळीचा मूळ कर्ता देखील हा विष्णुदासनामाच होय. तीर्थावळीतील भोजनावळीची वर्णने इतकी प्रत्ययकारी आहेत की ती वाचून महाराष्ट्र-भाषा-भूषण ज. र. आजगांवकर बेहद्द हरखून गेले. आपल्या नामदेव-चरित्रात ते म्हणतात, "या अभंगांची एकंदर रचना पाहिली म्हणजे ही वाणी कोणातरी ब्रह्मकुलोत्पन्न सुसंस्कृत आणि व्युत्पन्न पुरुषाची असली पाहिजे असे वाटल्याशिवाय रहात नाही" (पृष्ठ १५७). या संदर्भात, हे. वि. इनामदार, मु. श्री. कानडे वगैरे अर्वाचीन नामदेव-अभ्यासकांनी देखील चांदोरकर-आजगांवकरांचीच री ओढली आहे. इतिहासाचार्य राजवाडे आणि शि. म. परांजपे यांनी मात्र विष्णुदासनामा हा शिंपी असावा असे स्पष्ट मत नोंदविले आहे. स्वत: विष्णुदासनामा म्हणतो,

"लोखंडाचा विळा परिसासी लाविला ।
मागिलिया मोला मागूं नये ।।
दासी होती परि रायासी रतली ।
मागील ते बोली बोलों नये ।।
वेश्या होती तेचि पतिव्रता जाली ।
मागील ते बोली बोलों नये ।।
विष्णुदास नामा विठ्ठलीं रंगला ।
तो शिंपी वहिला म्हणों न ये ।।"

(शा. गा.; अ. क्र. १२३८)

शिंपी नामा

विष्णुदासनाम्यानंतर एकदोन शतकानी उदयास आलेला शिंपी ज्ञातीतील कवी 'शिंपी नामा' हा होय. मूळचा खेड-उंब्रज येथील हा कवी पंढरपुरास येऊन विठ्ठलभक्ती व काव्यरचना करू लागला. याने नामदेव-तुकारामादी अनेक संतांची चरित्रे लिहिली व विष्णुदासनाम्याच्या आख्यानांचा विस्तार केला. समाधी-प्रकरणांतून आणि नामदेवांच्या आत्मचरित्रात्मक अभंगांत याची बरीच कारागिरी आढळून येते. हा 'शिंपी नामा' या नाममुद्रेशिवाय 'नामदेव' अशीही मुद्रा वापरी व स्वत:स 'संतांचा दास' असे म्हणवी. नामदेवगाथ्यातील बव्हंश संतचरित्रांचा आणि पौराणिक आख्यानांचा कर्ता हा शिंपी नामाच होय. तुकारामतात्या घरत यांनी संपादित केलेल्या तुकारामगाथ्यातही (इ. स. १८८९) या शिंपी नाम्याचे काव्य समाविष्ट झालेले आहे (पृ. ५५ ते ७१). नामदेवगाथ्यात उत्तरकालीन संतांची चरित्रे का येतात याचे रहस्य या शिंपी नाम्याच्या कर्तृत्वात दडलेले आहे. हा प्राय: महीपतीचे अनुकरण करताना दिसतो. तीर्थावळीचाही याने विस्तार केला असे हा सांगतो (म. शा. गाथा, अ. क्र. ९६०, ९६१).

नामदेवांचे अनेकत्व

नामदेवगाथ्यातील या तीन नामदेवांचे कर्तृत्व इतिहासाचार्य राजवाडे यांच्या ध्यानात आले असावे असे दिसते. विष्णुदास नाम्यावरील आपल्या टिपणात ते म्हणतात,

"हा कवी एकनाथांच्या कालीं होता तेव्हां ह्याचे अभंग व ओव्या नामा शिंप्याच्या अभंगांत छापणें निव्वळ चूक आहे. शिवाय आवटयांच्या साकरी संप्रदायशुद्ध जुन्या बाडावरून छापलेल्या या नामदेवाच्या गाथ्यांत नामदेवानंतर बऱ्याच कालाने झालेले भानुदास, मिराबाई, कबीर; संताजी पवार रांजणगावकर, नरसी मेहेता, बोधलेबोवा धामणगावकर वगैरे संतांची चरित्रें छापली आहेत व ती नामा शिंप्याच्या नावावर छापिली आहेत ह्याचा अर्थ एवढाच की, हा संप्रदायशुद्ध साकरी गाथा अगदी अविश्वसनीय आहे. खेरीज ह्या संप्रदायशुद्ध गाथ्यातील भाषा नामदेवकालीनहि नाही व नामा विष्णुदास-कालीनहि नाही, निव्वळ वर्तमानकालीन आहे."
[भा. इ. सं. मं. वा. इ., शके १८३३, पृ. १२२]

संतचरित्रांचा कर्ता भिन्न असावा हे राजवाड्यांनी बरोबर ओळखले; परंतु नामा शिंपी (आद्य नामदेव) व संतचरित्रकार 'शिंपी नामा' (१८ वे शतक) या दोन नामदेवांची मात्र त्यांनी गल्लत केली आहे.

नामदेव कमीतकमी दोन असावे याची जाणीव मोरोपंतांना देखील होती. त्यांनी आपल्या सन्मणिमालेत नामदेव व नाम्या अशा दोन संतांची वेगवेगळ्या ठिकाणी स्तुती केली आहे. ६ व्या पदात "साधु विसोबा खेचर राखे चरणा-नतासि सुज्ञानें । केला कृतकृत्य क्षणमात्रे ज्या नामदेवे सुज्ञाने ॥" अशी खेचरशिष्य नामदेवाची स्तुती येते; तर ४६ व्या पदात "भक्ति-सुखादिक मानुनि मुक्तिसुख कदापि याचिना म्यां तें । अत्यद्भुत आयकिलें सद्वृंदीं नमुनि याचि नाम्यातें ॥" अशी विष्णुदास नामयाची भलावण येते. पंढरपूरच्या विठ्ठलाचे माहात्म्य वाढण्यास नामदेवांची भक्ती कारणीभूत झाली या वस्तुस्थितीची आदरयुक्त जाणीव मोरोपंतांना होती. अन्यत्र ते म्हणतात, "श्रीनारदमुनिचें जें सुमहद्व्रत तेंचि नामदेवाचें । याणें प्रसिद्ध केलें विठ्ठल हें भव्य नाम देवाचें ॥"

नामा यशवंत

नामदेवगाथ्यातील चौथा नामदेव हा 'नामा यशवंत' होय. महाराष्ट्र शासनाच्या नामदेव गाथ्यातील अभंग क्रमांक ७३५ आणि १४६६ यांमध्ये 'ऐसा नामा यशवंत विठोबाचा शरणागत' अशी याची नाममुद्रा आढळून येते. गाथ्यातील या दोन अभंगांशिवाय 'नामदेवाचें लग्न' या शीर्षकाचे १२४ पदांचे एक काव्य याच्या नावाने अन्यत्र छापलेले आढळते (प्रकाशक : क्षीरसागर आणि कंपनी, पुणे). या काव्याच्या शेवटी हा आपली पुढील-प्रमाणे माहिती देतो :

"म्हणे यशवंत सद्गुणी । गातो गायणी । वाणी गुण साधु संताला । रामनाम नका विसरूं त्याला ॥ करमाळें गांव दखण । देवी प्रसन्न । अल्ला मवलाली साह्य मजला । लागतो त्यांच्या मी चरणाला ॥"

करमाळ्याचा हा यशवंत नामा त्याच्या भाषे-वरून बराच अर्वाचीन वाटतो. त्याच्या काव्यावर उत्तर पेशवाईतील लावण्या-पोवाड्यांचे संस्कार झालेले दिसतात. देवीप्रमाणेच अल्ला-मौला-अली देखील यावर प्रसन्न झालेला दिसतो. याच्या नामदेवभक्तीवरून हा शिंपी असावा असे वाटते.

नामदेव परिवाराचे अभंग

नामदेवगाथ्यात या चार नामदेवांखेरीज नामदेवांचे नारा, विठा, गोंदा, म्हादा हे चार पुत्र, लिंबाई ही कन्या आऊबाई ही भगिनी, लाडाई ही सून या कुटुंबियांच्या नावावरील अभंगही संग्रहित केले जातात. यांच्याप्रमाणेच नामदेवांची दासी जनाबाई, स्नेही परसा भागवत व गुरू विसा खेचर यांच्या नावावर मोडणाऱ्या काव्याचाही अंतर्भाव होतो. विशेष म्हणजे या सर्व पारिवारिक मंडळींच्या काव्याची भाषा बरीच अर्वाचीन आहे.

नामदेवगाथ्याच्या रचनेच्या संदर्भात नामा पाठकाचे नाव वारंवार घेतले जाते; परंतु ते वृथा होय. या गाथ्यातील एकाही अभंगाचे कर्तृत्व नामा पाठकाचे नाही.

कालस्थल विवेक

नामदेवगाथ्यातील सर्व साहित्याचे सूक्ष्मपणे अवलोकन केल्यास असे दिसून येते की त्यात तहत तेराव्या शतकापासून अठराव्या शतका-

पर्यंतच्या सहाशे वर्षांत निर्माण झालेले पोथिकांचे सारस्वत एकत्रित केले गेले आहे. हे सर्व सारस्वत आद्य नामदेवांचेच आहे असे गृहित धरून त्यांच्या चरित्राविषयी, कार्याविषयी व एकंदर कालखंडाविषयी अनेक वाद आजवर खेळले गेले; परंतु ते भ्रांतिमूलक व अयथार्थ होत. या चार नामदेवांचे कालखंड वेगवेगळे आहेत. आद्य नामदेव हे ज्ञानदेव–समकालीन होत. विष्णुदास-नामा हा एकनाथ–समकालीन होय. वारकरी यालाच आद्य नामदेव समजू लागल्याने त्यांच्या घोषवाक्यात याची वर्णी एकनाथांनंतर लागू लागली. शिंपी नाम्याचा काळ पूर्व-पेशवाईचा, तर यशवंत नाम्याचा उत्तर–पेशवाईचा होय.

कालखंडांप्रमाणे या सर्व नामदेवांची जन्मस्थळेही भिन्न होत. आद्य नामदेवांचा जन्म पंढरपुरास झाला. त्याचे बालपणही पंढरपूर येथेच गेले. त्यांची कर्मभूमीही पंढरपूरच होय. आपल्या तीर्थाटणांद्वारे त्यांनी सगुण भक्तीचा प्रचार सर्व भारतभर केला. यांच्या सहवासातच योगी ज्ञानदेव हे संत ज्ञानदेव बनले. विष्णुदास-नाम्याचा जन्म मराठवाड्यातील नरसी–बामणी येथे झाला. यानेही आपल्या तीर्थाटणांद्वारे विठ्ठलभक्तीचा प्रसार सर्वदूर केला. याचीही कर्मभूमी पंढरपूर नगरी असली तरी याने पंजाबात राहून आपला संप्रदाय वाढविला असावा असे दिसते. भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंडळात उपलब्ध असलेल्या शके १५०३ च्या तीर्थावळीत याने एकट्याने केलेल्या भारतयात्रेचे वर्णन आलेले आहे (म. शा. गाथा, पृ. १०३५ ते १०४०). त्यात त्याने 'माझा स्वामी तो विठ्ठल हरी' अशी नाममुद्रा वापरली आहे. भाषिक आणि अन्य आधारांवरून जनाबाई ही विष्णुदास-नाम्याचीच शिष्या असावी असे दिसते. तिचा काळ तुकाराम–समकालीन होय. शिंपी नामा हा मूळचा खेड–उंब्रज येथील. याने आपले आयुष्य पंढरपूर येथे व्यतीत केले. यशवंत नामा हा सोलापूर जिल्ह्यातील करमाळे येथील होय. विठ्ठलभक्तीपेक्षा नामदेवभक्तीसाठीच हा विशेष प्रसिद्ध आहे.

नामदेवगाथ्याचे कर्तृत्व हे या चार नामदेवांचे आणि नामदेव–परिवाराचे आहे. भक्तिकाव्याचा तो एक अनमोल खजिना होय. त्यात अनेक व्यक्तींचे निर्देश आलेले आहेत. अनेक घटनांचे विस्तृत वर्णन आहे. अनेक कालनिर्देश आहेत. पौराणिक कथा आणि आख्याने आहेत. क्षेत्र-माहात्म्य सांगितले आहे. कुलवर्णन केलेले आहे. महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा तर तो ज्ञानकोशच होय. अशा या अत्यंत महत्त्वाच्या ग्रंथाचे शास्त्र-शुद्ध संशोधन आणि पुन:संपादन होणे ही आजची निकड आहे. त्यातूनच ज्ञानदेव–नामदेवांच्या कालखंडासंबंधीची कोडी उलगडू शकतात.

आर/१४, लक्ष्मी नगर
नागपूर – ४४० ०२२

वाचकांनो,

युगवाणीचा अंक वाचल्यानंतर त्यातल्या आपणास बऱ्या–वाईट वाटलेल्या बाबींवर नि:संकोचपणे आपल्या प्रतिक्रिया संपादकास कळवा. संपादकास आपल्या प्रतिक्रिया तोंडी कळविण्याकरिता कृपया राखून ठेवू नका. त्या मुक्तपणे इतरांकरताही वाटून द्या. युगवाणीस कळवा.

त्या प्रकाशित करणे युगवाणीस आवडेल. लक्षात घ्या की आपल्या या प्रतिक्रिया वर्तमान वाङ्मयीन संस्कृतीचे स्पंदन आहेत.

भारतीय साहित्यशास्त्रातील वक्रोक्ति सिद्धांत

डॉ. के. रा. जोशी

साहित्यशास्त्र हे सर्व प्रकारच्या साहित्याचा विचार करते. त्याला देशाची किंवा भाषेची बंधने नसतात. भारतीय साहित्यशास्त्र याचा अर्थ भारतापुरते मर्यादित साहित्यशास्त्र असा नसून भारतात विकसित झालेले, साहित्यसमीक्षेचे निकष, सिद्धांत सांगणारे शास्त्र असा होतो. त्यामुळे साहित्य म्हणवल्या जाणाऱ्या विश्वातील सर्व प्रकारच्या वाङ्मयाचे स्वरूप स्पष्ट व्हावे अशी अपेक्षा आहे. जगात शब्दरूप धारण करणारे लिखित किंवा मौखिक जे काही असेल ते सर्व वाङ्मयवाणीविलसित (वाचो विकारः वाङ्मयम्) होय. साहित्य हा त्या वाङ्मयाचा एक प्रकार. संस्कृत भाषेत यासाठी काव्य असा शब्द वापरतात. मराठीत काव्य म्हणजे प्रायः कविता किंवा पद्य (वृत्तबद्ध रचना) असे पुष्कळजण समजतात पण काव्य हे गद्यमयही असू शकते. उलट एखादे पद्य असले म्हणजे ते काव्य असतेच असे नव्हे. संस्कृतात अमरकोषासारखे शब्दकोष किंवा लीलावतीसारखे गणितग्रंथही पद्यबद्ध आहेत. पण त्यांना काव्य समजत नाहीत. नुसत्या वरच्या आकाराने भ्रम होऊ शकतो. म्हणून 'केवळ सर्ग असले की काव्य आणि अंक असले की नाटक असे बेधडक सांगणाऱ्या माणसावरून दिवेच ओवाळावे' अशी टीका महाकवी नीलकंठ दीक्षितांनी केली आहे.

काव्य म्हणजे ललित वाङ्मय

मराठीत ललित वाङ्मय या सदरात येणारे जे काही वाङ्मय असेल ते सर्व साहित्य होय. लघुकथा, दीर्घकथा, कादंबरी; कविता, खंडकाव्य, महाकाव्य, ललितनिबंध, गुजगोष्टी, प्रवासवर्णने, आत्मचरित्रे, श्रुतिका, नाटके किंवा इतरही लहानमोठे नाट्यबंध इत्यादी वाङ्मय प्रत्येकाची रचनापद्धती भिन्न असली तरी त्याचा समावेश साहित्यात होतो.

वक्रोक्तिजीवितकार कुंतक

हे साहित्य का म्हणविले जाते याचे उत्तर भारतीय साहित्य शास्त्रज्ञांपैकी ज्यांनी ज्यांनी दिले त्यात वक्रोक्तिजीवित हा ग्रंथ लिहिणाऱ्या कुंतकाचे स्थान अग्रगण्य आहे. राजानक कुंतक या नावानेही हा प्रसिद्ध आहे. राजानक ही पदवी काश्मीरातली. कुंतक हा काश्मीरचा. वक्रोक्तिजीवित हा त्याचा ग्रंथ, इ. स. ११०० च्या आसपासचा. वक्रोक्तिजीवित या ग्रंथात तीन घटक आहेत : कारिका, वृत्ती आणि उदाहरणे. कारिका म्हणजे शास्त्रसिद्धांत सांगणारे श्लोक. वृत्ती ही गद्यरूपात कारिकांचा आशय स्पष्ट करते. आणि उदाहरणे प्रत्यक्ष काव्यरूपात त्या विवेचनाचा अभिप्राय समजावून देण्यास साहाय्य करतात. यापैकी कारिका आणि त्यावरील वृत्ती ही कुंतकाची, पण उदाहरणे मात्र वेगवेगळ्या कवींच्या ग्रंथांतून उद्धृत केलेली. कारिका हा कुंतकाचा मूळ ग्रंथ. त्याला तो 'काव्यालंकार' म्हणतो. ग्रन्थस्यास्य अलंकार इत्यभिधानम् । (व. जी. प्रथम उन्मेश कारिका २–पृ. ८) वृत्तीचा उल्लेख मात्र वक्रोक्तिजीवित म्हणून करतो. (पुष्पिका प्रथम उन्मेष ३ पृ. १६८) संपूर्ण ग्रंथ हा चार उन्मेषातून क्रमशः ५८+३५+४६+२५ अशा एकूण १६४ कारिकांचा असा सध्या उपलब्ध आहे.

वाङ्मयाची निर्मिती दोन प्रकारची. एक स्वभावोक्ती (यथातथ्य वर्णन) आणि दुसरी वक्रोक्ती. कुंतकापूर्वी दंडीने असे विभाजन केले आहे. तो म्हणतो – भिन्नं द्विधा स्वभावोक्ति-र्वक्रोक्तिश्चेति वाङ्मयम् – काव्यादर्श (२–३६३) कुंतकाने यांपैकी स्वभावोक्तिवाद्यांचे म्हणणे पूर्वपक्ष म्हणून मांडले आहे. स्वभावोक्तिवादी म्हणतात – त्रैलोक्यातील पदार्थ जसे आहेत तसे जर वर्णन केले तर त्यात वैचित्र्य मूळचेच आहे. त्यापेक्षा वेगळेपण (अद्‌भुत) असे कोठून आढळ-

णार ? कारण; पळसाची फुले घ्या. ती मूळचीच लाल असतात (वस्तुतः सौंदर्य स्वाभाविक असते. ते स्वभाववर्णनाने प्रकट होते.) वक्रोक्तिप्रेमी मात्र वस्तूचे जे वेगळे वर्णन करतात, ते नुसते वरवरचे (कपिल्त) असते. 'मूळ वस्तू तशी मुळी नसतेच.' पुढे कुंतक सांगतो की; 'स्वभावोक्ति-वादी वरच्याप्रमाणे जो चुकीचा युक्तिवाद करतात त्याची मुळीच पत्रास न बाळगता मी साहित्यसागराचे सार असणारे अमृत काढून दाखविणार आहे. त्यामुळे साहित्याचे मूळ तत्त्व आणि त्याचे स्वरूप या दोन्ही गोष्टी रसिकांच्या मनात आगळा आनंद देतील.' (व.जी. पृ. ४)

कुंतकाचे काव्यलक्षण

पुढे काव्याचे लक्षण सांगताना कुंतक म्हणतो– काव्य रसिकांना आनंद देणाऱ्या, सुंदर (वक्रोक्ति पूर्ण) अशा कविकौशल्याने निर्माण केलेल्या रचना विशेषात व्यवस्थित ठेवलेल्या शब्द आणि अर्थ या दोघांना, संमिलित (सहितौ) स्वरूपात काव्य म्हणतात, कुंतकाची व्याख्या अशी आहे–

'शब्दार्थौ सहितौ वक्र कविव्यापारशालिनि ।
बन्धे व्यवस्दितौ काव्यं तद्विदाह्लाद कारिणि ॥
(वा जी. १.७)

शब्दार्थौ सहितौ काव्यम् ही–झाली काव्याची स्थूल व्याख्या. शब्द आणि अर्थ हे नित्य संबद्ध असतात त्यामुळे त्यांचा सहभाव सदैव असतो. शब्दावाचून अर्थ आणि अर्थावाचून शब्द कधीच जाणवत नाहीत. मग त्यांचा सहभाव असावा हे म्हणणे निरर्थक ठरते.

शब्दार्थौ सहितावेव प्रतीतौ स्फुरतः सदा ।
सहिताविति तावेव किमपूर्वं विधीयते ॥
(व. १–१६)

कुंतक म्हणतो, "हे खरे आहे. पण केवळ वाच्य–वाचक संबंधावर अवलंबून असणारे साहित्य आम्हाला सांगायचे नाही.

× × ×

शब्दार्थाचा हा जो सहभाव प्राचीन काळा-पासून साहित्य या शब्दाने प्रसिद्ध आहे. त्या शब्दार्थांच्या साहित्यात कवीच्या काव्य–कौशल्याची परमसीमा झालेली असते. पण ते नेमके काय हे आजपर्यंत एकाही विद्वानाला सुचलें नाही. वास्तव सरस्वतीच्या हृदयकमलातील मकरंदबिंदूच्या समूहाप्रमाणे शोभणाऱ्या सत्-कवींच्या उक्तीतून दरवळणारा परिमल प्रकट करणारे हे साहित्याचे मूलतत्त्व रसिक भ्रमरांच्या दृष्टीला आणून देत आहोत."

साहित्याचे स्वरूप

वस्तुतः कुंतकापूर्वी भामहाने शब्द व अर्थ यांचे साहित्य–सहभाव शब्दार्थौ सहितौ काव्यम् अशी काव्याची व्याख्या देऊन सुचविला. दंडीने काव्य लक्षण दृष्टार्थव्यवच्छिन्ना पदावली (रसिकांना हव्याहव्याशा वाटणाऱ्या अर्थानि युक्त पदसमूह) असे देऊन अर्थाच्या जोडीला शब्द हवा असे सांगितले. पुढे वामनाने गुणयुक्त, सामान्यतः अलंकारयुक्त, दोषरहित शब्दार्थ हे काव्य होत असे लक्षण केलें. त्यामुळे नुसती शब्दचमत्कृती अथवा नुसती अर्थचमत्कृती ही काव्याचे काव्यपण निर्धारित करू शकत नाही. कुंतकाच्या काव्य व्याख्येत भामह, दंडी आणि वामन या तिघांनीही ग्रथित केलेल्या विशेषांचा समावेश आहे. त्याच्या मते शब्द आणि अर्थ यांचे साहित्य (सहभाव) म्हणजे शब्द आणि अर्थ या दोघांचे पूर्ण सामंजस्य. हे सामंजस्य शब्द आणि अर्थ केवळ वाचक आणि वाच्य या सामान्य स्वरूपात एकत्र आल्यामुळे जाणवत नाहीं, तर ते विशिष्ट स्वरूपात जाणवते. हे वशिष्टय शब्दार्थात उत्पन्न होते ते वक्रोक्तीमुळे, गुणा-लंकाराच्या सुयोग्य जुळणीमुळे कुंतक म्हणतो सहृदयाच्या मनाला आह्लाद देण्यासाठी शब्द आणि अर्थ यांची परस्पराशीः पर्धा करणारी, परस्परात कुठेही अजिबात कमी जास्त पणा जाणवत नसल्यामुळे मनोहर वाटणारी विलक्षण जुळणी म्हणजे साहित्य.

(साहित्यमनयो : शोभा शालितां प्रतिकाप्यसौ ।
अन्यूनानतिरिक्त त्व मनोहारिण्यवस्थितिः ॥)
(व. जी. १–१७)

काव्याचा आधार शब्द आणि अर्थ आहेत. पण काव्यांत वाटेल ते शब्द ठेवून चालत नाहीत. कविमनातला अर्थ नेमका प्रकट करणारा शब्द विशिष्टच असावा लागतो. जसे बालकवींना

त्यांच्या 'फुलराणी' या कवितेत मऊशार स्पर्श असलेले, फुलराणीच्या बागडण्याला योग्य, तिच्या वैभवाला शोभेसे असे हिरव्या गार तृणाचे आस्तरण (गालिचा) वर्णन करावयाचे आहे. बालकवीने वर्णन केले आहे.

हिरवे हिरवे गार गालिचे
हरित तृणाच्या मखमालीचे

'मखमालीचे' या शब्दाइतका हरिततृणांचा मऊपणा, त्यावरील फुलांची रंगीबेरंगी मनोहर सजावट सूचित करणारा सुकुमार वर्णरचना असणारा नि वृत्तबंधात चपखल बसणारा अचूक शब्द दुसरा दुर्लभ आहे. अचूक शब्दाची निवड अशी असते.

वाचक शब्द व्यापक अर्थाचा

कुंतकाचा वाचक शब्द हा केवळ वाच्यार्थ (मुख्यार्थ) सांगणाराच नसतो तर व्यङ्गार्थ सांगणारा व्यञ्जक सुद्धा असतो. त्यामुळे वाचक याचा अर्थ होतो कवीला अभिप्रेत असणाऱ्या अर्थाचा प्रकाशक. मग तो अर्थ वाच्य, लक्ष्य किंवा व्यङ्ग्य काहीही असो.

काव्यातील शब्दाप्रमाणे अर्थही विशिष्टच असतो. विशिष्ट अर्थ याचा अभिप्राय असा आहे की पदप्रतिपाद्य अर्थाच्या अनेक छटा असल्या तरी असाच अर्थ शब्दांतून प्रकट व्हावा की ज्यामुळे एकप्रकारचे नावीन्य आणि रसपूर्ण वातावरण निर्माण होऊ शकेल. बालकवींच्या 'फुलराणी' याच कवितेचे उदाहरण घेतले तर फुलराणीचा मंगलविवाह रंगविण्यासाठी वातावरण निर्मिती व्हावी म्हणून फुलराणीच्या स्वप्नांचे बहारदार वर्णन करून विशिष्ट असा अर्थ कवीने वर्णिला आहे.

समर्थ रामदासांचे सुप्रसिद्ध 'भीमरूपी महारुद्रा' हे मारुतिस्तोत्र घेतले तरी –

ठकारे पर्वता ऐसा नेटका सडपातळू ।
चपळांग पाहता मोठे महाविद्युल्लतेपरी ॥

यासारख्या ओळींतून रामकार्यासाठी हवे ते दिव्य करण्याचा प्रचंड उत्साह धारण करणाऱ्या वीर मारुतीची वज्रदेही, धिप्पाड पण विजेसारखी चपळ आकृती डोळ्यासमोर उभी राहते. समर्थ रामदासांची शब्द आणि अर्थ यांची समर्थ निवड काव्यातील शब्द आणि अर्थ कसे असावे याची ओळख पटवून देते. चपखल शब्द आणि अर्थ हे एकजीव बनून रसिकांना कसा आनंद देतात याचे उदाहरण म्हणून कविवर्य श्री. नारायण मुरलीधर गुप्ते उपाख्य बी यांचीही कविता उल्लेखिता येईल. राम गणेश गडकरी यांच्या नाटकातील नाट्यसंवाद किंवा पु. भा. भावे यांचे लघुकथा-तील भाषावैभव शब्द आणि अर्थ याचे सामंजस्य स्पष्ट करतात. हेच सामंजस्य कुंतक शब्दार्थांचे साहित्य म्हणून वर्णितो.

(२) काव्यात हे शब्दार्थांचे साहित्य कसे निर्माण करावयाचे तर गुणांची आणि अलंकारांची योजना करून. त्यामुळे उत्पन्न होणारे शब्दसौंदर्य आणि अर्थसौंदर्य अहमहमिकेने एकमेकाशी स्पर्धा करीत असल्याचे वाटू लागते.

(३) हे कसे साध्य होते तर ते कवीच्या रचनाकौशल्याने. काव्यातील अर्थाची रचना व्यवहारातील शब्दार्थरचनेपेक्षा वेगळी असते. कुंतकाच्या शब्दात वक्रतापूर्ण असते. वक्रतापूर्ण असणे किंवा वक्र असणे म्हणजे अलंकारयुक्त असणे. कुंतक म्हणतो की कवीने शब्द आणि अर्थ वक्रतापूर्ण रचनेने व्यवस्थित जुळविलेले असतात. (वक्रकविव्यापारशालिनि बन्धे व्यवस्थितौ).

(४) ही संपूर्ण सुघटित रचना म्हणजे शब्द आणि अर्थ, उभयतांचे साहित्य (परस्परानुकूल सहभाव), कविकौशल्य (गुणालंकाराच्या योजनेद्वारे प्रकट झालेले) आणि रचना (सर्वांची व्यवस्थित जुळणी) ही सहृदयांच्या मनाला आनंद देणारी असली पाहिजे. काव्यलक्षणात ग्रथित केलेल्या वरील चिंतनावरून कुंतकाचे म्हणणे सांगावयाचे झाल्यास 'काव्य म्हणजे कवीने केलेली कौशल्यपूर्ण शब्दरचना. अशी रचना की जी शब्दसौंदर्य आणि अर्थसौंदर्य यांच्या एका विलक्षण अन्योन्यानुकूल जुळणीमुळे (साहित्याने) काव्यमर्मज्ञाला आनंदित करते.'

काव्यातील संप्रदायाचे स्वरूप

कुंतकाच्या वक्रोक्तीचा विचार करताना काव्यामध्ये अलंकार, रीती, रस, ध्वनी, वक्रोक्ती, औचित्य इत्यादींपैकी एकेका अंगाला महत्त्व

देणारे वेगवेगळे स्वतंत्र संप्रदाय आहेत. असा समज मोठ्या प्रमाणावर प्रचलित आहे. त्यामुळे इतर अंगांना त्यांच्या विचारसरणीत स्थान नाही अशी समजूत होते. काही काव्यमीमांसक अलंकार विचारातून काव्यतत्त्वाचा विचार प्रगत होत होत अलंकार, गुण, रीती, रस; ध्वनी, वक्रोक्ती, औचित्य इत्यादीद्वारा यथाकाल विकसित होत गेला असे मानतात. डॉ. ग. त्र्यं. देशपांडेसारखे काव्यमीमांसक असे साधार दाखवून देतात की साहित्यशास्त्रात संप्रदायाची कल्पना करणे बरोबर नसून भामह, दंडी, वामन, आनंदवर्धन, कुंतक, क्षेमेन्द्र इत्यादी मंडळी एका विशिष्ट अंगावर भर देणारी वाटली तरी त्यांना इतर अंगांची कल्पना नव्हती हे म्हणणे बरोबर नाही. कारण अलंकाराचा विचार मांडणारा भामह असो की दंडी असो त्यालाही वक्रोक्ती, रस. औचित्य इत्यादींची जाण होती हे त्यांच्याच ग्रंथावरून दिसून येते. हा अभिप्राय योग्य आहे.

दृष्टिकोणामुळे भिन्नता

मग काव्यविचार करणारे हे साहित्यमीमांसक वेगवेगळ्या मार्गाचे पथिक का वाटतात ? याचे कारण त्यांनी निवडलेला दृष्टिकोन होय. काव्याकडे दोन दृष्टींनी पाहिले जाते. एक दृष्टी निर्मितीची आणि दुसरी आस्वादाची. कवीच्या दृष्टीतून काव्याकडे जेव्हा पाहावयाचे तेव्हा काव्य निर्माण करताना सामग्री कोणती घ्यावी, कशी पारखावी, काव्यवस्तूची सजावट कशी करावी. ती आनंददायी करावयाची तर कोणती काळजी घ्यावी या सर्व बाबींचा सूक्ष्म विचार करावा लागतो. तदनुसार काव्यचिंतन करणाऱ्यांच्या वर्गात येतात भामह, दंडी, वामन, कुंतक क्षेमेन्द्र. पण काव्याकडे रसिकांच्या दृष्टीतून पाहावयाचे म्हटले म्हणजे काव्याचे जाणवणारे विशेष कोणते, काव्य कोणत्या पद्धतीने रसिकांच्या मनावर प्रभाव पाडते, रसिकांना आनंद कसा होतो, त्या आनंदाचे स्वरूप काय याचा विचार करावा लागतो. हा विचार प्राधान्याने करणारे काव्यमीमांसक आहेत. लोल्लट, शंकुक, भट्टनायक, आनंदवर्धन, अभिनवगुप्त, महिमभट्ट इत्यादी, काही ग्रंथकार मात्र काव्याचा कवी आणि रसिक या दोहोंच्या दृष्टींचा उपयोग करून काव्यविषयक सर्वांगीण चिंतन करते झाले. यात मम्मट, भोज, विश्वनाथ, अजय दीक्षित, पं. जगन्नाथ इत्यादी येतात.

समुद्रबंधाचा दिशानिर्देश

या रीतीने काव्यविषयक विचार झाला असल्याची काही जाणीव प्राचीन ग्रंथकारांपैकी अलंकार सर्वस्व या रुय्यकाच्या ग्रंथावर टीका लिहिणाऱ्या समुद्रबंधाने (११३५–११५५) इ. दाखविली आहे. शब्दार्थौ सहितौ काव्यम्, (एकमेकाला अनुकूल जुळणी झालेले (सहित) शब्द आणि अर्थ यांना काव्य म्हणतात.) या काव्यलक्षणाचे स्पष्टीकरण करताना ' शब्द आणि अर्थ यांचा सहभाव किंवा साहित्य असणारे याचा अर्थ होतो विशेष प्रकारचे शब्दार्थ. शब्द आणि अर्थ यांचे हे वैशिष्ट्य कधी शब्दार्थगत धर्मातून कधी शब्दार्थाच्या परिणाम घडवणाऱ्या क्रियेतून (व्यापारातून) किंवा शब्दार्थाद्वारे सूचित होणाऱ्या व्यङ्गार्थातून अशा एकूण तीन विकल्पातून संभवते. शब्द आणि अर्थ यांचे धर्मद्वारा असणारे वैशिष्ट्य गुणांच्या किंवा अलंकारांच्या माध्यमातून एकूण दोन प्रकारे उत्पन्न होते. दुसऱ्या पक्षानुसार शब्द आणि अर्थ यांचे वैशिष्ट्य कवीच्या प्रतिपादनाच्या शैलीमुळे किंवा शब्द आणि अर्थ यांच्या रसिकमनाला आनंद देण्याच्या क्षमतेमुळे असे दोन प्रकारे समजून घेता येते. (व्यङ्गार्थाद्वारे शब्दार्थाचे वैशिष्ट्य हा होतो पाचवा प्रकार) यांपैकी गुणद्वारा काव्यातील शब्दार्थांचे वैशिष्ट्य कसे उत्पन्न होते हा विचार उद्भटानी मांडला. अलंकार रूपाने शब्दार्थांचे वैशिष्ट्य वामनाने समजावून सांगितले. कवीची चातुर्यपूर्ण वर्णन शैली (कविभणिति.) शब्दार्थांचे वैशिष्ट्य कसे निर्माण करते हा मार्ग वक्रोक्तिजीवितकार कुंतकाने दाखविला. शब्द आणि अर्थ रसिकांना आनंद देण्याच्या दृष्टीने कसे असावे लागतात हे भट्टनायकाने मांडले आणि शब्दार्थांचे वैशिष्ट्य व्यङ्ग्य मुखाने कसे असते याचे निरूपण आनंदवर्धनाने केले. याप्रमाणे शब्दार्थांचे साहित्य पाच प्रकारांनी विचारात घेतल्यामुळे काव्यमीमांसेचे हे पाच प्रधान पक्ष उत्पन्न झाले हे समुद्रबंधाचे स्पष्टीकरण निश्चितच विचारणीय आहे.

जाणवणारा निष्कर्ष


वरील प्रकाराचे पुन्हा विश्लेषण केले तर गुण, अलंकार, कविचातुर्यपूर्ण शैली हे तिन्ही विचार कवीला समोर ठेवून काव्यरचनेच्या बाबतीत मार्गदर्शन करावे म्हणून दिसतात. शब्दार्थांचे भोगीकृत्व (काव्यानंदजनकत्व) आणि व्यङ्ग्यबोध सामर्थ्य हे दोन्ही पक्ष काव्याचा रसिकाच्या दृष्टीने विचार करणारे आहेत हे जाणवते. यात विचारात न घेतला गेलेला क्षेमेंद्राचा काव्यगत औचित्यविचार हाही कविजनांना समोर ठेवून केलेला आहे. त्यामुळे गुण, अलंकार कविशैली आणि औचित्य हे कवीच्या भूमिकेतून काव्याचा विचार करणाऱ्या ग्रंथकारांनी यशस्वी काव्यनिर्मितीसाठी समोर ठेवले आहेत; तर भट्टनायक, आनंदवर्धन प्रभृतींनी डोळस रसिकाची भूमिका स्वीकारून काव्याकडे पाहिले आहे. त्यामुळे गुण, अलंकार, रीती, ध्वनी, औचित्य आदी संप्रदाय विशेष होत किंवा हा साहित्य शास्त्र विकासाचा क्रम आहे असे दोन्ही मतप्रवाह समाधानकारक दिसत नाहीत. रीतीला महत्त्व देणारा ग्रंथकार रसाची जाण असणारा आहे तर रसतत्त्व जाणणारा रीतीचेही महत्त्व समजतो असे दिसून येते. फरक हा कवी किंवा रसिक यांना समोर ठेवून केलेल्या विवेचनाने दिसतो. हा विचार अधिक समर्पक वाटतो.

कुंतकाचे वैशिष्ट्य

कुंतक हा जणू कवीचा मार्गदर्शक. तो कवींना उत्तम काव्यरचना कशी करावी हे सुचवितो. त्याच्या काव्यलक्षणात वक्रोक्तिपूर्ण कविकौशल्याने नटलेल्या रचनेत परस्पराशी सहभावाचे असणारे शब्दार्थ म्हणजे काव्य अशा अर्थाची शब्दयोजना केली आहे. यावरून हे स्पष्ट आहे की कुंतक हा कविकौशल्याला फार महत्त्व देतो. अर्थात त्याने कवीला समोर ठेवूनच सर्व विवेचन केले आहे हे स्पष्ट जाणवते.

कुंतकाच्या वक्रोक्तीचे स्वरूप

वक्रोक्तीचा मराठीत सरळ वाच्यार्थ होतो वाकडी उक्ती. स्वभावोक्ती म्हणजे साधी सरळ उक्ती. वक्रोक्ती अगदी तिच्या उलट असते. कवीची उक्ती एका अर्थाने खरेच वाकडी असते. उदाहरणार्थ स्वभावोक्ती वस्तूच्या यथातथ्य वर्णनाने होते. तर वक्रोक्तीचा प्रवास हा वळणावळणाचा असतो. मुखाचे वर्णन कवी मुख कमलासारखे सुंदर आहे असे करतो. मुख हा वर्ण्य विषय (उपमेय) आहे. कवीला मुखाचे सौंदर्य खुलवून सांगावयाचे आहे. म्हणून तो म्हणतो मुख कमलासारखे सुंदर आहे. म्हणजे नुसते मुख सुंदर आहे असे न म्हणता कवीने श्रोत्याला प्रथम कमल या सुप्रसिद्ध उपमानाची आठवण करून दिली. त्यामुळे रसिकाला मुखाच्या सौंदर्याची कल्पना देणे शक्य झाले. याप्रमाणे कवीचे वर्णन (मुख) उपमेयापासून (कमल) उपमानाकडे वळले आणि पुन्हा दोघांच्याही साधारण धर्मसौंदर्य याचा निर्देश करीत ते उपमेयाच्या ठिकाणी स्थिर झाले. यावरून कवीचा प्रवास



असा वाकड्या वळणाचा दिसून येईल. अर्थात् हे वाकडे वळण कवींच्या कौशल्याचा उपयोग होऊन झाले पाहिजे. नाही तर चंद्र खडूसारखा पांढरा असतो हेही वर्णन काव्यमय समजले जाईल. कुंतकाच्यामते सर्व लोकात प्रसिद्ध असलेल्या प्रकाराहून अगदी आगळ्या प्रकारची वर्णनशैली (अभिधा) ही वक्रोक्ती होय. ही कशी असते तर ती असते वैदग्ध्यभंङ्गीभणिती. वैदग्ध म्हणजे विदग्धता. विदग्धता म्हणजे कवीचे काव्यरचनेतले कौशल्य. त्या कौशल्याचे जे आगळे सौंदर्य (भङ्गी), त्याने युक्त अशा कविकौशल्याचा उपयोग करून केले जाणारे वर्णन (आगळी वेगळी अभिधा) म्हणजे वक्रोक्ती होय. कुंतकाचे शब्द असे आहेत.

वक्रोक्तिः प्रसिद्धाभिजनव्यतिरेकिणी विचित्रैवाभिधा । वैदग्धं विदग्धभावः कविकर्मकौशलम्, तस्य भङ्गा विच्छित्तिः, तया भणितिः । विचित्रैवाभिधा वक्रोक्तिसच्यते ।

(हि. व. जी. १–१० ची वृत्ती पृ. ५१)

वरील व्याख्येनुसार रसिकांच्या मनाला आनंद देणारी, सर्वसामान्याच्या द्वारा वापरली न जाणारी, कवीचा प्रतिभाचमत्कार जिच्यातून जाणवतो अशी वर्णनशैली म्हणजे वक्रोक्ती.

त्यामुळे वक्रोक्तीसंबंधीचे तीन विशेष स्पष्ट होतात :

(१) काव्याची शैली शास्त्र आणि लोकव्यवहार यात वापरल्या जाणाऱ्या शैलीपेक्षा निश्चितपणे वेगळी असते.

(२) काव्य हे कविकर्म आहे. याचा अर्थ असा होतो की कवीची प्रतिभा आणि त्याचा स्वभाव यामुळे काव्य उत्पन्न होते.

(३) कवीची प्रतिभा म्हणजे पूर्वजन्मीच्या आणि या जन्मीच्या संस्कारांनी होणाऱ्या परिणामांनी परिपुष्ट झालेली कवीची काव्यनिर्माणशक्ती.

(प्राक्तनाद्यतन – संस्कार – परिपाक – प्रौढा प्रतिभा काचिदेव कविशक्तिः)

वक्रोक्तीने अभिप्रेत असणाऱ्या काव्यमार्गाचे वेगळेपण नीलकंठासारखा कवी वेगळ्या शब्दात मोठ्या रेखीवपणे पण काव्यमय पद्धतीने सांगतो. तो म्हणतो, कवींची ही काव्य निर्माणाची पद्धत काही आगळीच असते. कारण वक्रोक्ती (स्वभावोक्ती–यथातथ्योक्ती नव्हे) ह्याच येथील अलंकार ठरतात. वाच्यार्थ बाधित होणे यावरच या मार्गाची उत्कृष्टता ठरते. (कवीला अभिप्रेत) अर्थाचे प्रतिपादन करावयाचे झाले तर अभिधा (यथातथ्य वर्णन) ह्याच येथील दोष समजला जातो !

वक्रोक्तयो यत्र विभूपगानि
वाच्यार्थबाधः परम–प्रकर्षः ।
अर्थेषु बोध्येष्वभिधैव दोषः
सा काचिदन्या सरणिः कवीनाम् ।। (शिव १)

याप्रमाणे वक्रोक्ती हे काव्याचे अलंकरण ठरते.

उभावेतापलंकार्यो तयोः पुनरलंकृतिः ।
वक्रोक्तिरेव—

(शब्द आणि अर्थ हे आहेत अलंकार्य. म्हणजे ज्यांना अलंकृत करावयाचे ते आणि त्याचा खरा अलंकार आहे केवळ वक्रोक्ती) काव्यात जे काही सुंदर किंवा चमत्कृतिपूर्ण वाटते त्याचे मुख्य कारण आहे वक्रोक्ती. म्हणूनच काव्यसौंदर्य ज्यांच्यामुळे उत्पन्न होते त्या सर्वांना कुतकाने वक्रोक्तीच्या प्रकारात समाविष्ट केले आहे. कवी प्रतिभासामर्थ्याने आपली कृती चमत्कृतिपूर्ण करण्यासाठी ज्या लहान मोठ्या युक्ति–प्रयुक्तींचा वापर करतो ते सर्व वक्रोक्तीचे उपभेद ठरतात. यास्तव कुंतकाने एकीकडून काव्यातील शब्दांच्या घटक वर्णरचनेपासून तर प्रबंधरचनेपर्यंत आणि दुसरीकडून उपसर्गः प्रकृती प्रत्यय या पदावयवापासून तर महाकाव्यापर्यंत सर्वांना वक्रोक्तीच्या कवेत घेतले आहे. आनंदवर्धनाने ध्वनीचा मापदंड वापरून सर्वप्रकारच्या काव्यप्रकारांची व्यवस्था लावली कुंतकाने वक्रोक्तीचा वापर करून सर्व काव्यप्रकारांची निर्मिती कशी होते हे सांगितले. ध्वनिकार रसिकांच्या दृष्टिकोणातून काव्यचर्चा करतो तर वक्रोक्तिजीवितकार ह्या चमत्कार कविदृष्टीने कसा निर्माण करावयाचा हे सांगतो.

वक्रोक्तीचे भेद–प्रभेद

कुंतकाने वक्रोक्तीचे मुख्य सहा भेद केले आहेत. काव्याचा लघुत्तम घटक वर्ण तर त्याचे महत्तम रूप महाकाव्य या क्रमाने ते विकसित केलेले आहेत. जसे– (१) वर्णविन्यासवक्रता; (२) पदपूर्वार्धवक्रता, (३) पदपरार्धवक्रता, (४) वाक्यवक्रता, (५) प्रकरणवक्रता; (६) प्रबन्धवक्रता.

वर्णविन्यासवक्रता

ज्या काव्यरचनेच्या पद्धतीत एक, दोन अथवा अधिक वर्ण (व्यंजने) थोडया थोडया अंतराने पुनरावृत्ती करून पुनःपुनः योजिले जातात तिला म्हणतात वर्णविन्यास वक्रता.

एको द्वौवहवो वर्णा बध्यमानाः पुनः पुनः ।
स्वल्पान्तरास्त्रिधा प्रोक्ता वर्णविन्यासवक्रता ।।

इतर आलंकारिक या प्रकाराला अनुप्रास समजतात असा निर्देश कुंतकाने स्वतःच केला आहे.

'हिरवे हिरवे गार गालिचे हरित तृणाच्या मखमालीचे' ही बालकवींची ओळ घेतली तर या ठिकाणची ह, र, ग, त, म, या व्यंजनाची पुनरावृत्ती वर्णविन्यासवक्रतेचे उदाहरण म्हणून लक्षात घेता येईल पण याशिवाय वर्णरचनेचे जे चमत्कार इतरांनी वैदर्भी, गौडी, पांचाली किंवा उपनागरिका, परुषा, कोमली या वृत्तींच्या

(रीतींच्या) अंतर्गत किंवा यमक अलंकाराच्या अंतर्गत आणले आहेत त्या सर्वांना वर्णविन्यास-वक्रतेचे प्रकार म्हणून कुंतकाने वर्णिले आहे. काव्याचा प्रथम आधार शब्दगत वर्ण आहेत. त्या वर्णांच्या रचनेच्या अनेक चमत्कारांना एका वर्णविन्यास वक्रतेच्या आत जागा देऊन कुंतकाने एका आगळ्या पद्धतीने काव्यशास्त्ररचनेचा प्रयत्न केला आहे.

पदपूर्वार्धवक्रता

वर्णानंतर काव्याचे दुसरे घटक आहे पद. पद म्हणजे अनेक वर्णांचा समुदाय असतो. पदाचे दोन भाग होतात. एक असतो प्रकृती (मूळ शब्द) आणि दुसरा असतो प्रत्यय. ही पदे दोन प्रकारची (१) सुबन्त (क्रियापदाहून भिन्न साधी शब्दरूपे) (२) तिङन्त (क्रियापदे) त्यामुळे प्रकृतीचे (मूळ शब्दांचे) दोन प्रकार संभवतात : एक प्रतिपदिक आणि दुसरा धातू. यामुळे पदपूर्वार्धवक्रता म्हणजे प्रातिपदिक आणि धातू यांची वक्रता. (कवीचे प्रतिपदिक आणि धातू यांच्या निवडीत दाखविलेले कौशल्य)

ही पदपूर्वार्धवक्रता आठ प्रकारांनी संभवते.

(१) रूढिवैचित्र्यवक्रता, (२) पर्यायवक्रता, (३) उपचारवक्रता, (४) विशेषणवक्रता (५) संवृत्तिवक्रता, (६) वृत्तिवक्रता, (७) लिङ्गवैचित्र्यवक्रता (८) क्रियावैचित्र्यवक्रता

पदपूर्वार्धवक्रता समजून घेण्यासाठी रूढि-वैचित्र्यवक्रतेचे उदाहरण घेऊ या.

जेव्हा शब्दाच्या रूढ अर्थाहून अगदी भिन्न अर्थाचा किंवा उत्तम धर्मांचा अध्यारोप शब्दाच्या अर्थावर गर्भितरूपाने असतो तेव्हा कुंतकाच्या मते रूढिवैचित्र्यवक्रता होते. (हिवजी २-८-९) उदाहरणार्थ कवी म्हणतो; "अहोगुणांना तेव्हाच गुण म्हणतात जेव्हा सहृदय लोक त्यांना गुण म्हणून मान्यता देतात. कमळे ही खरी कमळे तेव्हाच ठरतात की जेव्हा रविकिरणांनी त्यांचा विकास होत असतो."

कमळे ही खरी कमळे होतात यातील दुसरा कमळ शब्द (प्रतिपदिक) लक्षात घऊ या. दुसऱ्या कमळ शब्दाचा मूळ अर्थ आहे जलात उत्पन्न होणारे विशिष्ट फूल. पण आता त्या कमल शब्दाचा अर्थ विलक्षण सुगंध आणि सौंदर्य यांनी युक्त असलेले कमळ असा होतो. हा मूळ शब्दाचा अर्थ नव्हे पण कवीच्या योजनेने तो तसा जाणवतो.

जेव्हा सीतावियोगाचे दुःख सोसणारा राम पुष्पसुकुमार मनाच्या सीतेची वियोगानुकूल स्थिती आठवून म्हणतो की; 'माझे ठीक आहे. मी राम आहे. मी सर्व सहन करू शकतो. (रामोऽस्मि सर्वं सहे) पण सीतेची स्थिती कशी बरं असेल ? राम याचा मुख्यार्थ आहे. दशरथाचा ज्येष्ठ पुत्र. आता तो तितपतच न राहता राज्यत्याग, बंधु-वियोग, पितृमरणदुःख, वनगमन, वननिवास अशी दुर्धर दुःखे सहन करण्याची सवय असलेला कठोर हृदयी राम असा अर्थ होतो.

इतर आलंकारिकांनी लक्षणेच्या आणि व्यंज-नेच्या प्रयोगाने होणारे चमत्कार म्हणून ज्या अर्थविशेषांचे वर्णन केले आहे त्यापैकी अनेकांचा यात समावेश होतो. विशेषतः उपचार वक्रतेमध्ये सादृश्यावर आधारित गौणी लक्षणेच्या भाषेतील प्रयोगांची असंख्य उदाहरणे समाविष्ट होतील कवी ग्रेस यांची कविता उपचारवक्रतेचे ठळक उदाहरण म्हणून लक्षात ठेवण्यासारखी आहे.

३. पदपरार्धवक्रता

पदाचा उत्तरार्ध असतो प्रत्यय. त्यामुळे पदपरार्धवक्रतेला प्रत्ययवक्रता असेही म्हणतात. कुंतकाने हिचे सहा प्रकारात विभाजन केले आहे– (१) कालवैचित्र्यवक्रता, (२) कारकवक्रता, (३) संख्यावक्रता अथवा वचनवक्रता, (४) पुरुषवक्रता; (५) उपग्रहवक्रता, (६) प्रत्ययवक्रता. यापैकी कालवैचित्र्यवक्रता म्हणजे जे कालाचा वापर औचित्याच्या दृष्टीने आगळे सौंदर्य धारण करतो असे कविकौशल्य म्हणजे कालवैचित्र्यवक्रता.

उदाहरणार्थ एक विरही म्हणतो. (पाव-साळयात रस्त्यावर सर्वत्र पाणी साचल्यामुळे) ज्यांच्यातला उंचसखलपणा पार दिसेनासा झाला आहे, ज्यावर फार सांभाळून पावले टाकावी लागतात असे रस्ते इतःपर (रथांना सोडाच पण) मनोरथांनासुद्धा दुर्लंघ्य होऊन जातील.

(भविष्यन्ति) मूळ श्लोकात आलेल्या होऊन जातील या अर्थाच्या 'भविष्यन्ति' या पदातला भविष्यकालवाचक 'स्व' प्रत्यय प्रियाविरहाने कातर बनलेल्या माणसाच्या वर्षाकालीन अत्यंत कारुण्यपूर्ण स्थितीची सूचना देत आहे.

(कुंतकाच्या मते पदवक्रतेचे उपसर्गवक्रता आणि निपातवक्रता असे दोन भेद संभवतात पण पदवक्रता या भेदाचा स्वतंत्र उल्लेख मूळ भेदात दिसत नाही.)

४. वाक्यवक्रता

परस्पराशी संबद्ध असणाऱ्या (अन्वित) पदसमूहाला म्हणतात वाक्य. सुकुमार, विचित्र आणि मध्यम त्या काव्यरचनामार्गानुसार येणारे शब्द, अर्थ, गुण आणि अलंकार यांच्या सौंदर्याहून भिन्न अशा विशेष शैलीने भाव प्रकट करण्याच्या कविकौशल्याला म्हणतात वाक्यवक्रता. उदाहरणार्थ 'सृष्टीच्या आरंभापासून उत्तमोत्तम कवींनी आपापल्या प्रतिभासामर्थ्यानुसार सारभूत अशा एकापेक्षा एक सरस कल्पना उचलल्या असतानासुद्धा अनंत नव्या नव्या कल्पनांचे स्फुरण सुरूच असल्यामुळे ज्याचे अजून मुखसुद्धा उद्घाटित झाले नाही असे हे वाक्सौंदर्य !'

या उदाहरणांतून पद्यकर्ता कवी आजपर्यंत काव्याचे खरे रहस्य कुणालाही न कळल्यामुळे जे इतर कुणालाही जमले नाही असे प्रकट करण्यासारखे पुष्कळ कल्पनावैभव आपल्याजवळ असल्याचे साभिमान सूचित करीत आहे.

५. प्रकरण वक्रता

प्रबंधाचा एक भाग म्हणजे प्रकरण. प्रबंध म्हणजे संपूर्ण कथावस्तूचा रचनाविशेष. त्याचे एक अंग किंवा त्यातील एखादा प्रसंग म्हणजे प्रकरण. या प्रकरणावर अवलंबून असणारे किंवा त्या प्रकरणातून आगळे सौंदर्य प्रकट करणारे कविकौशल्य म्हणजे प्रकरणवक्रता. प्रकरणवक्रतेचे एकूण ९ भेद नोंदलेले आहेत :

(१) भावपूर्णस्थितीची निर्मिती (२) मुळात नसलेला प्रसंग कल्पिणे (३) विद्यमान कथानकात बदल करणे (४) प्रधान घटनेशी संबद्ध इतर घटनांची उपकार्य-उपकारक या नात्याने सुसंगत जुळणी करणे (५) एखाद्या विशिष्ट प्रकरणाला खूप खुलविणे (६) महाकाव्यासारखे प्रबंध रचले जात असताना जलक्रीडादी प्रसंगांचे विशेष विस्ताराने वर्णन (७) प्रधान उद्देश्याच्या सिद्धीसाठी एखाद्या रमणीय गौण प्रसंगाची निर्मिती करणे (८) गर्भांक-(नाटकाच्या आत नवा नाट्यप्रसंग) समाविष्ट करणे (९) प्रकरणांची पूर्वापर क्रमाने नीट जुळणी करणे.

यातील भावपूर्ण स्थितीची निर्मिती म्हणून प्रकरणवक्रतेचा पहिला प्रकार उदाहरणादाखल पाहू या. पुढील उदाहरण कालिदासांच्या रघुवंशकाव्यातले आहे. रघुकौत्संवादात कालिदासाने अशी स्थिती निर्माण केली, की कौत्स आणि रघू या दोघांच्याही मनाची उदात्तता बघून रसिक थक्क होतात. कौत्साने द्यावयाची १४ कोटी सुवर्णमुद्रांची गुरुदक्षिणा त्याला मिळवून द्यावी म्हणून यज्ञात सर्वस्वाची दक्षिणा देऊन निष्कांचन बनलेला सम्राट रघू कुबेरावर स्वारी करायला निघण्याच्या सिद्धतेत असतो. इतक्यात त्याच्या कोषात अंतरिक्षातून सुवर्णाची रास पडल्याचे कळते आणि मग एक अपूर्व विवाद सुरू होतो. रघू ती सर्व धनराशी कौत्साला देऊ इच्छितो. तर कौत्स गुरुदक्षिणेपेक्षा एक कवडीही अधिक नको असा हट्ट धरून बसतो. कालिदास म्हणतो-अयोध्येतील नागरिकांना त्या दोघांचाही मनोनिश्चय अभिनंदनीय वाटत होता. एकीकडे गुरुदक्षिणेपेक्षा अधिक काहीही घेण्याविषयी निःस्पृह असा याचक दिसत होता आणि दुसरीकडे याचकाने मागितले त्यापेक्षाही अधिक देण्यासाठी तत्पर असणारा राजा होता.

जनस्य साकेत निवासिनस्तौ
द्वावप्यभूतामभिनन्द्यसत्त्वौ ।
गुरुप्रदेयाधिक निःस्पृहोऽर्थी
नृपोऽर्थिकामादधिकप्रदश्च ॥

कालिदासाने मन हेलावून सोडणारी प्रसंगनिर्मिती करून दोन्ही पात्रांच्या चारित्र्याचा उत्कर्ष चित्रित केला. त्यामुळे 'रघुवंश' महाकाव्य प्रभावी होण्यासाठी मदत झाली.

८. प्रबंधवक्रता

प्रबंध म्हणजे महाकाव्य, नाटकप्रभृती रचनाबंध. रचनाबंधाच्या सर्वविध सौंदर्यनिर्मितीत वापरले जाणारे कविकौशल्य म्हणजे प्रबंधवक्रता,

प्रबंधवक्रतेचे एकूण सहा भेद आहेत.

(१) मूळ रसात परिवर्तन—जसे कथानकाचे मूळ असणाऱ्या महाभारतात शांतरस असला तरी महाभारताच्या कथांशाने निर्मिलेल्या वेणी-संहारनाटकात भट्टनारायणाने वीररसाची योजना केली आहे.

(२) नायक चरित्राचा परमोत्कर्ष दाखविणाऱ्या घटनेने कथानकाचा शेवट.

(३) कथानकाच्या मध्यातच दुसऱ्या कोठल्या तरी कार्याने प्रधानकार्य सिद्ध करणे.

(४) नायकाला एकापेक्षा अधिक फलांची प्राप्ती होणे.

(५) प्रधानकथाभागाचे सूचक शीर्षक प्रबंधाला देणे.

(६) एकाच मूळ कथानकावर आधारले जाणारे प्रबंधवैचित्र्य.

वक्रतेचे वरील प्रधान सहा भेद त्यांच्या उपभेदासह स्थूलरूपाने दर्शविले आहेत. या सर्व विवेचनातून वक्रतेचा सिद्धांत आणि त्याची व्यापकता याची रूपरेषा अंकित करण्याचा प्रयत्न आहे.

पण हा कुंतकाचा वक्रोक्तिविचार पुढे अनुयायांच्या अभावी विकसित झालेला नाही. साहित्यशास्त्रात वक्रोक्ती हा शब्द तसा फार जुना आहे. भामहाने वक्रोक्तीची कल्पना अतिशयोक्तीच्या स्वरूपाने मांडली होती. ही अतिशयोक्तीच कवींच्या प्रतिभाविलासाचे विविध अलंकारांचे स्वरूप धारण करते ही नोंद भामहाने केलेली होती. अर्थालंकारातून अतिशयोक्तीचा या ना त्या रूपाने वापर होतो ही बाब इतरही आलंकारिकांना मान्य होती, पण पुढे हीच वक्रोक्ती मम्मटादी काही आलंकारिकाच्या मते एक विशिष्ट शब्दालंकार या स्वरूपात संकुचित रूप धारण करती झाली. कुंतकाने मात्र वक्रोक्ती ही काव्याचे अलंकरण आहे. त्यामुळे काव्यशोभा वाढवणारे जे जे काही गुण, अलंकार, ध्वनी, रस, वृत्ती, औचित्य इत्यादी नावांनी इतर आलंकारिकांनी दर्शविलेले असेल ते वक्रोक्तीच्या माध्यमातून मांडून कुंतकाने एक आगळी दृष्टी दिली. प्रतिभेची ही एक अपूर्व चमक होती यात शंका नाही. पण ज्या उद्देशाने—विशेषतः कवींनी काव्यनिर्मिती करताना काय भान ठेवावे हे शिकविण्याच्या दृष्टीने हा ग्रंथ लिहिला तो उद्देश साध्य होणे शक्य झाले नाही.

तसे पाहिले तर कुंतक हा जसा काव्य-निर्मितीच्या अंगाने विचार करणारा आलंकारिक आहे तसाच तो स्वयंप्रज्ञ रसिकही आहे. सहृदयाच्या दृष्टिकोणातून अनेक स्थळी मार्मिक चर्चा करून त्याने काव्यसौंदर्याचे बारकावे उलगडून दाखविले आहेत. पण त्याच्या ग्रंथामुळे विशदार्थ आणि रेखीव मांडणीच्या अभावी कविजनांना वक्रोक्तिमार्ग सुगम होऊ शकला नाही. आणि रसिकांनाही वक्रोक्तिसिद्धांताची मांडणी सर्वांगपूर्ण म्हणून संतोष देऊ शकली नाही. यामुळे हस्तिदंताच्या गाईप्रमाणे वक्रोक्ती दर्शनीय वाटली पण तिचा व्यावहारिक उपयोग संभव झाला नाही. वक्रोक्ती ही श्लेष किंवा काकूच्या आधाराने होणारा शब्दच्छलावर अवलंबून असलेला चमत्कृतिपूर्ण शब्दालंकार किंवा लक्षण अथवा व्यंजना यांचा उपयोग असलेली सुंदर वर्णनशैली एवढ्याच अर्थाच्या मर्यादेत वक्रोक्ती प्रचारात राहिली.

२/२, एम. आय. जी. कॉलनी
बंजारीनगर, नागपूर ४४०००३

संदर्भ ग्रंथ सूची

(१) हिन्दी वक्रोक्तिजीवित– सं. डॉ. नगेन्द्र. हिंदी अनुसंधान परिषद, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली की ओरसे आत्माराम एण्ड संस, काश्मीरी गेट, दिल्ली – ६, १९५५

(२) नीलकंठ दीक्षित व त्यांची काव्यसंपदा ले. डॉ. के. रा. जोशी. नागपूर विद्यापीठ प्रकाशन, नागपूर, १९७७ ■

टिपण

वाङ्मयाची अक्षरता

डॉ. भास्कर गिरधारी

'वाङ्मयाची अक्षरता' म्हणजे वाङ्मयाची, साहित्याची शाश्वतता, चिरंजीवता, टिकाऊपणा नाशित्व होय. अक्षरवाङ्मय म्हणजे 'अक्षय' वाङ्मय. समीक्षकांना आणि रसिकांना नेहमीच हा पडलेला प्रश्न आहे, की कोणते वाङ्मय अक्षर असते ? ते का आणि कशामुळे अक्षर बनलेले असते. या संदर्भातच साहित्यकृती चांगली आणि साहित्यकृती श्रेष्ठ अशीही चर्चा झालेली आहे. इंग्रजीमध्ये यालाच Good Literature and best Literature म्हटलं गेलेलं आहे. Good Literature म्हणजे चांगले साहित्य. या गटात बऱ्याच जुन्या नव्या साहित्यकृतींचा समावेश करता येईल. पण श्रेष्ठ साहित्य; ज्याला Best Literature म्हटलेलं आहे. त्याचा मात्र गंभीरपणे विचार केला तरी झटकन नाव पुढं येत नाहीत.

इथं पहिल्यांदा प्रश्न पडतो की कोणत्या साहित्याला श्रेष्ठ साहित्य, अक्षर साहित्य म्हणता येईल ? नेमकी त्याची कसोटी कोणती ? अक्षरवाङ्मयाचे गुणविशेष नेमके कोणते ? अक्षर वाङ्मयाचे निकष कोणते ? वाङ्मयाची अक्षरता म्हणजे नेमके काय ? याचा विचार प्रारंभी स्पष्ट करून घेतला म्हणजे आपल्याला अक्षर वाङ्मयाच्या प्रेरणा कोणत्या ? स्वरूप कसं असतं ? आणि असं अक्षर वाङ्मय कोणकोणत्या साहित्यकृतीला म्हणता येईल ? त्याचे निर्माते-जन्मदाते कोण ? याचाही तपशीलानं विचार करता येईल. जी साहित्यकृती आपल्या वर्तमान काळात लोकप्रिय असते आणि भावी काळातही तिची लोकप्रियता टिकून राहते अशा साहित्यकृतीत वाङ्मयातील अक्षरता आहे असं आपल्याला म्हणता येईल. याचं उदाहरण मराठीतील घ्यायचं झालं तर आपल्याला 'ज्ञानेश्वरी'चं घेता येईल. आज ७०० वर्षे लोटली तरी ज्ञानेश्वरीची वाङ्मयीन रुची टिकून आहे. याचा अर्थ ज्ञानेश्वरी अजरामर, शाश्वत, वाङ्मयधर्म असलेली साहित्यकृती आहे.

स्थळकाळावर मात करून कालातीतता आणि वैश्विकता (Universalisation) जेव्हा साहित्यकृतीला प्राप्त होतं, तेव्हा ती अक्षर कलाकृती आपण मानतो. ज्ञानेश्वरीतील आशयसंपन्नता, वाङ्मयमूल्ये आणि जीवनमूल्ये ही आजही आपल्याला तेवढीच आवाहन करणारी, आव्हान देणारी वाटतात. म्हणूनच ज्ञानेश्वरीमध्ये वाङ्मयाची अक्षरता सामावलेली आहे असं आपण म्हणू शकतो. असाच विचार आपण भारतीय आणि पाश्चात्य, श्रेष्ठ म्हणून गणल्या गेलेल्या लेखकांच्या संदर्भातही करतो. त्यांचीही काही नमुनादाखल उदाहरणं आपल्याला घेता येतील. कविकुलगुरू कालिदास, यांचं 'अभिज्ञानशाकुंतलम्' हे नाटक, 'रघुवंश', 'कुमारसंभव', ही महाकाव्ये आणि 'मेघदूता'सारखे चिररुचिर खंडकाव्य, अक्षर वाङ्मयाची उदाहरणे म्हणून घेता येईल. भासाचे 'प्रतिमा', 'स्वप्नवासवदत्तम्' या सारख्या नाटकांचा आणि भवभूतीच्या 'उत्तररामचरित' नाटकाचा या संदर्भात उल्लेख करता येईल. भवभूतीला आत्मविश्वास होता म्हणूनच त्याचं 'काळ अनंत आहे आणि पृथ्वी विपुल आहे. माझ्या ललित कृतीतील

मर्म ओळखणारा रसिक मला आज लाभला नाही तरी हरकत नाही पण पुढं केव्हा तरी असा रसिक खचितच लाभेल.' असे प्रतिपादन केले आहे.

मराठीमधील तुकारामाची, रामदासांची कविता यात समाविष्ट करता येईल. मराठीतील अलिकडच्या काळातील 'संगीत सौभद्र', 'एकच प्याला', 'नटसम्राट' या सारख्या काही नाटचकृतीतही वाङमयाच्या अक्षरतेची बीजे आढळतील. पाश्चात्य साहित्यात शेक्सपिअरची 'हॅम्लेट', 'ज्युलिअस सीझर', 'ऑथेल्लो', 'किंग लियर' ही नाटके, अर्नेस्ट हेमिंग्वे यांचे 'ओल्ड मॅन अँन्ड द सी', टॉलस्टॉयचे 'अॅना करिनिना', यांचा विचार वाङमयातील अक्षरतेच्या संदर्भात करावा लागतो. 'पॅराडाईज', लॉस्ट 'वॉर अॅन्ड पीस', 'डॉल्स हाऊस'-सारख्या कलाकृतीतही अक्षरता आढळते. या सर्वच पौर्वात्य आणि पाश्चिमात्य श्रेष्ठ लेखकांच्या लेखनकृतींचा उदाहरणादाखल उल्लेख केला म्हणजे साहित्यातील अक्षरतेचा शोध घेण्याचा मार्ग खुला होतो. या लेखकांमध्ये असे कोणते विशेष आहेत ? आणि त्यांच्या साहित्यकृतीची अशी कोणकोणती वैशिष्टये आहेत ? की ज्यामुळे आपण त्यांच्या या लेखनात अक्षरता अवतरलेली आहे; असं म्हणू शकतो. याचा बारकाईनं अभ्यास केला म्हणजे पुढील विवेचन सुलभ होतं. येथे वस्तुनिष्ठता आणि सार्वत्रिकता या लेखनात प्रत्ययाला येते. जीवनाचा व्यापक आणि मानवी मनाचा मूलगामी शोध लेखकाने आपल्या अंतःप्रेरणेतून, वृत्ती गांभीर्यातून घेतलेला असतो. प्रा. श्री. के. क्षीरसागर यांनी आपल्या 'टीका विवेका'त म्हटल्याप्रमाणे 'वाङ्मयीन मूल्यांच्या विवेचनाशी विशेष संबद्ध असा टीकाविषयक प्रश्न म्हणजे 'अक्षर' वाङमयाचा प्रश्न होय. 'Classic' किंवा 'अमर' साहित्य असंही त्याला म्हणतात. प्रा. ना सी. फडके यांनी 'अक्षर' हा शब्दप्रयोग सर्वप्रथम रूढ केला. काळाच्या भट्टीत तावून सुलाखून निघालेलं, निर्विवादपणे श्रेष्ठ दर्जाचं साहित्य म्हणजे 'क्लासिक लिटरेचर' किंवा अक्षर वाङमय होय. हीच कल्पना त्यात अनुस्यूत आहे. वाङमयातील अक्षरता ती होय. वाङमयाच्या अक्षरतेबद्दल उलटसुलट विचारप्रवाहही आढळतात. दूरदर्शन; ध्वनिचित्रफिती, संवाद माध्यमांच्या आजच्या सुलभतेमुळे सार्वत्रिक होणं आज काहीसं सोपं झालं आहे. पूर्वीच्याकाळी 'कीर्तन'माध्यमाच्या परंपरेतून 'मोरोपंत'–'वामनपंडित' सर्वतोमुखी झाले होते. पण त्यावरूनही वाङमयीन 'अक्षरता' ठरविता येणार नाही; कारण काही चांगल्या, श्रेष्ठ लेखकांना त्यांच्या हयातीत तर नाहीच पण नंतरही कधी मानमान्यता लाभत नाही; म्हणून त्यांचं वाङमय कनिष्ठ प्रतीचं ठरत नसतं.

वाङमयातील अक्षरता पारखायची असेल तर त्यासाठी उत्तम उदाहरण म्हणून 'रामायण', 'महाभारता'सारख्या, 'वाल्मिकी', 'व्यासां'च्या आर्ष महाकाव्यांची घेता येतील. 'रामायण' आदर्शवादी आणि 'महाभारत' वास्तववादी असले तरीसुद्धा हजारो वर्षे उलटूनही त्यांची लोकप्रियता यत्किंचितही कमी झालेली नाही. त्यातील व्यक्तींचे आणि जीवनाचे कुतुहल यत्किंचितही कमी होत नाही. मानवी जीवनाचे गंभीर चित्र रंगविणारी, परिणामकारक, भवसमृद्ध महाकाव्ये म्हणून त्यांची अक्षरवाङमयात गणना करावी लागेल. 'उपजीव्य' ग्रंथ म्हणूनही या ग्रंथांमध्ये अनेक लेखक कलावंतांना कथा आणि व्यक्तिरेखा पुरविण्याचे सामर्थ्य, प्रेरणा देण्याचे सामर्थ्य या दोन ग्रंथात आजतागायत टिकून आहे. पक्षी जसे मोठ्या वृक्षावर सुखनैव पोट भरू शकतात; पर्जन्य जसा सर्वांना संतुष्ट करतो तसे या ग्रंथांनी सर्व रसिकांना आणि लेखक कलावंतांनाही जगविले आणि जागविले आहे. कवींना आणि काव्यांना शेकडो वर्षे जीवन पुरविण्याची; रामायण–महाभारताइतकी शक्ती जगातील दुसऱ्या एखाद्या काव्यात क्वचितच आढळेल. 'प्रिन्सिपल्स् ऑफ लिटररी क्रिटीसिझम्' या ग्रंथात आय. ए रिचर्डस् यांनी वाङमयातील अक्षरता श्रेष्ठतेशी संबंधित असते, याबद्दल साशंकता प्रदर्शित केली आहे. साहित्याला अक्षरत्व प्राप्त होण्यासाठी मूलभूत वाङमयीन गुण असण्याची आव-

श्यकता असते. तुम्ही काही काळ सर्व लोकांना फसवू शकाल, सर्वकाळ काही लोकांना फसवू शकाल पण 'सर्व काळ सर्व लोकांना फसवू शकणार नाही' हा सुप्रसिद्ध न्याय वाङ्मयाच्या अक्षरतेच्या विचारातही महत्त्वाचा आहे. कदाचित काही काळ चांगल्या, श्रेष्ठ साहित्य-कृतीकडे लोकांचे दुर्लक्ष होईलही, एखाद्या कलाकृतीने काही लोकांना भुरळही पडेल. पण सर्वकाळ सर्व लोकांच्या, चोखंदळ रसिकांच्या मनावर जी साहित्यकृती प्रभुत्व गाजवील तिला निःसंशय अक्षर साहित्यात मोडणारी साहित्यकृती म्हणायला हरकत नाही. याचे उदाहरण 'रामायण', 'महाभारत' सांगता येईल. मात्र प्रा. श्री. के. क्षीरसागर नाटकाला जे काहीसे कमी लेखतात आणि महाकाव्याला त्यातील प्रचंड व्यापक जीवनानुभवामुळे मोठे मानतात ते मान्य होण्यासारखे नाही. कारण शेवटी कोणतीही साहित्यकृती ही कोणत्यातरी आकृतीबंधाच्या आधारानं त्या माध्यमातूनच अवतरत असते तिथं जीवनानुभव महत्त्वाचा असतो. त्या साहित्यकृतीने स्वीकारलेला घाट (Form) महत्त्वाचा नसतो. या अर्थाने शाकुंतल, हॅम्लेट आणि मेघदूत किंवा जी. ए. कुळकर्णी यांची कथाही वाङ्मयातील अक्षरता प्रत्ययाला आणून देते असे म्हणता येईल. पिढ्यान् पिढ्यांच्या रसिकतेनं हे आपल्याला, उपरोक्त; कलाकृतींनी दाखवून दिलेलं आहे. तात्काळ प्रसिद्धीच्या झोतात आलेले लेखक आणि त्यांचे साहित्य भावी काळातही रसिकांची मने जिंकून राहील असे भाकीत आपल्याला करता येणार नाही. वृत्तपत्रे, चित्रपट, ध्वनिमुद्रित, ध्वनिप्रसारण, ध्वनिचित्रण, दृकश्राव्य माध्यम यांच्या सर्रास वास्तव्यामुळे त्वरित यश आजच्या काळात एखाद्या लेखकाला, आणि त्याच्या लेखन-कृतीला लाभू शकेलही पण शेवटी 'काळाच्या कठोर कसोटी'ला टिकण्याची क्षमता या लेखनात असेलच असं म्हणता येणार नाही. आज 'सर्वांनी दुःखी' होणे एक वेळ सोपे आहे पण गुणमूलक शाश्वतता कलाकृतीला लाभणं महाकठीण आहे.

अर्थात केवळ चिरंजीवित्व ही एकमेव वाङ्मयीन श्रेष्ठतेची कसोटी मानता येत नसली तरी असे साहित्य वाङ्मयीन गुणांनी युक्त असते म्हणूनच ते काळाच्या कसोटीला उतरते. 'रामायण', 'महाभारत' आणि 'ज्ञानेश्वरी'च्या उदाहरणातून हे दिसते की कसोटीवर ते टिकले, कारण त्यात सखोल आणि सर्वंकष जीवनचित्र भवितव्य, सूचकता, आशय आणि अभिव्यक्तीची श्रेष्ठता जाणवली. 'रामायण', 'महाभारता'ची विव्वल प्राचीनता आणि धार्मिकता याला कारणीभूत नाही तर त्यातील मानवी मनाचं आणि जीवनाचं अननुभूत, प्रेरक चित्रण, समर्थ जीवनानुभूतीची तेवढीच समर्थ अभिव्यक्ती कारणीभूत आहे. शांत, गंभीर आणि विशाल काव्यविश्वाला आणि संपन्न काव्यशैलीला त्याचे श्रेय द्यावे लागेल. वाङ्मयातील ही अक्षरता सर्वच साहित्यकृतींच्या बाबतीत समान दर्जाची, समान गुरुत्वाची असणार नाही म्हणून आपल्याला ज्ञानेश्वरी आणि मेघदूत यांच्या अक्षरत्वात विभिन्न प्रचिती येते.

यथे आणखीही एक विचार संभवतो. कलात्मक सौंदर्याचा उगम वस्तुत: निसर्गचिंतनातूनच आहे. 'The begining of all my own right, art-work in life depended not on my love of art, but mountains and sea.' ही 'रस्किन'सारख्या सौंदर्यशास्त्रकाराने दिलेली कबुली मनन करण्यासारखी आहे. कवीच्या किंवा कलावंताच्या चिंतनाचा प्रमुख विषय निसर्ग हाच असला पाहिजे. त्यातच कलेचे सौंदर्य आणि शाश्वतता सामावलेली असते. अन्यथा कलेपेक्षा कारागिरीतच तिचं रूपांतर होण्याची भीती असते. वाङ्मयातील व्यक्तिनिष्ठा (Subjectivity) जेव्हा वस्तु-निष्ठतेत, (Objectivity)त रूपांतरित होते तेव्हा 'अभिज्ञान शाकुंतलम्' या नाटकातील 'अर्थोहि कन्या परकीय एव।' हा अनुभव व्यक्तिगत पातळीवरील 'कालिदासा'चा किंवा कोणी 'कण्व'मुनींचा अनुभव न राहता तो जेव्हा सर्वासर्वांचा अनुभव बनतो, तेव्हा साहित्यकृतीला सार्वकालीनत्व, चिरंजीवित्व लाभते. स्थळकाळाची बंधनं उरत नाहीत. त्यावर मात करून, स्थलकालातीतता, अक्षरता, वाङ्मयात अवतरते. प्रा. ना. सी. फडके यांनी, 'जे पुनःप्रत्ययाचा आनंद

देते ते वाङ्मय शाश्वत होय' असे म्हटले आहे. यामध्ये अतिव्याप्तीचा दोष आढळतो. प्रचारकी आणि बोधवादी साहित्यात त्यांना अक्षरता प्रत्ययाला येत नाही असे येथे सुचवावयाचे आहे. साहित्यात कलात्मकता, उत्कटता, उदात्तता, मूलभूतता, रसोत्कटता यांना विशेष महत्त्व आहे.

ज्या वाङ्मयात अत्यंत कसदार जीवनानुभव, जीवनमूल्याधिष्ठित संपन्न आशय आढळेल, मूलभूत भावनांना आवाहन असेल आणि या समृद्ध आशयाची तेवढीच समृद्ध अभिव्यक्ती असेल तर त्या वाङ्मयात अक्षरता प्रत्ययाला येईल. त्याचा आस्वाद खऱ्या रसिकांना पुन:पुन्हा घ्यावासा वाटेल इतकी त्याची गोडी अवीट असेल. शुद्ध; सरल, अलिप्त, आशयाला थेट भिडणारी भाषाशैली विशाल, उदार, उदात्त जीवनदर्शन घडविणारा आशय, जीवनचित्रणाचे माध्यम; अनंत पिढ्यांनी प्रकट केलेला आदर यावरून त्या वाङ्मयातील अक्षरता सिद्ध होईल. या सगळ्या कसोट्यांवर रामायण, महाभारत; ज्ञानेश्वरी, इलियड, ऑडिसि यासारखी काव्येच निदान आजतागायत तरी श्रेष्ठ आणि अक्षरवाङ्मय म्हणून टिकलेली आहेत आणि रसिकांच्या मनावर आपले अधिराज्य गाजवीत आहेत. ज्या ललितकृती 'अक्षर' म्हणून एका राष्ट्राकडून जतन झालेल्या असतात त्या कोणत्याही राष्ट्राने केव्हाही जतनच कराव्यात अशा योग्यतेच्या असतात. एका राष्ट्राला केवळ नव्हे, तर एकंदरीत मानव जातीलाच जिव्हाळा वाटावा अशी अक्षर वाङ्मयाची महती आहे.

प्रमुख संदर्भ :

१. मराठी समीक्षा : संपा. रा. श्री. जोग व इतर दोन, मुंबई विश्वविद्यालय (१९५२)

२. टीकाविवेक : श्री. के. क्षीरसागर, पॉप्युलर प्रकाशन, पहिली आवृत्ती (१९६५)

(मुंबई आकाशवाणीच्या सौजन्याने)



श्रीपाद भालचंद्र जोशींच्या "लघुसंकलनातील कविता"
– दोन प्रतिक्रिया –

: १

डॉ. श्रीपाल सबनीस

मार्च–एप्रिल १९९२ च्या युगवाणीच्या अंकात 'लघुसंकलन' या उपक्रमा-बद्दलची माहिती प्रकाशित झाली असून सोबत त्या लघुसंकलनातील श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्या सहा कविता व त्यावरील डॉ. वि. स. जोगांचे भाष्यही प्रकाशित झाले होते.

'लघुसंकलना'तील श्रीपाद भालचंद्र जोशींच्या त्या कवितांवर डॉ. श्रीपाल सबनीस तसेच प्रा. मधु जामकर यांनी केलेले भाष्य येथे प्रकाशित करीत आहोत.

'आपण मित्रा, फटाके' ही एकच आशयघन कविताही श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्या अस्सल प्रतिभेच्या कलात्मकतेचा प्रत्यय देऊन, त्यांचे कवी म्हणून असणारे श्रेष्ठत्व सिद्ध करण्यास पुरेशी ठरावी !

कवितेच्या शिर्षकामध्ये नाट्य आहे. कारण त्यात मित्रांचा संवाद आहे. या कवितेचा आशय एका व्यापक वेदनेने न्हाऊन निघालाय. फटाक्यांना स्वतःच्या जीवनाचा समजलेला अर्थ, त्याच्यासह कोणत्याही संवेदनक्षम मनाला अंतर्मुख करतो. फटाक्यांच्या आवाजात दिवाळी साजरी करणारी माणसं, फटाक्यांच्या संपलेल्या अस्तित्वाची काळजी करीत नसतात. त्यांना त्यांचा स्वतःचा आनंदच महत्त्वाचा वाटतो. पण स्वतःच्या चैनीसाठी आपण दुसऱ्यांचे आयुष्यच सपवतो याची चिंता वाटण्याचे त्यांना कारण वाटत नाही. या चैनबाज माणसांच्या आनंदाचा बळी ठरलेला फटाका आपले आत्मनिवेदन करताना तो जणू 'फटाका' या समुहाचीच वेदना मांडत राहतो.

'फुटता फुटता' तुटुन जाणे, फुटल्यावरही तार खुपसून पुन्हा उध्वस्त होण्यासाठी सज्ज होणे, कातडी सोलून घेऊन धूर होईस्तोवर फुटत राहणे हो अटळतेची मालिका फटाक्यांना भोगणे आवश्यकच आहे. कारण माणसाची आनंदाची हौस, चैनबाजीत रूपांतरित होऊन स्वतःच्या स्वार्थासाठी खेळ म्हणून इतरांचे अस्तित्व उध्वस्त करण्यात समाधान मानते.

प्रश्न आनंदाच्या उर्मी बाळगण्याचा नाहीच ! स्वतःच्या मोजेसाठी इतरांचे आयुष्य बळी देण्याचा अट्टाहास मूल्यात्मक कसा ठरावा ? श्रीपाद भालचंद्र जोशींची ही कविता सखोल चिंतन घेऊन उभी आहे. ती केवळ फटाक्यांची कविता नाही. तो 'फटाका'सदृश्य किंवा 'फटाक्यांचे' जीवन जगणाऱ्या सामान्य माणसांची मुख्यतः कविता आहे. समाजातील शोषक स्वतःच्या इच्छेखातर सामान्यांचे जीवन 'फटाक्या'प्रमाणेच उडवतात, उध्वस्त करतात.

ही कविता आनंद आणि वेदना, सुख आणि दुःख यांच्यातील विरोधाबरोबरच गुंतागुंतही अभिव्यक्त करते. त्याचप्रमाणे शोषक–शोषित यांच्यातील शोषण प्रक्रियेवरही प्रकाश टाकते–नव्हे शोषितांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आदिम साम्यवादी गणसमाजापासून भविष्यकाळातील सर्व स्तरावरील श्रमिकांच्या हुंदक्यांना, या कवितेने आपल्या पोटात घातले आहे.

अनुक्रमणिका

माणसांच्या जगात बहुसंख्य माणसे–विशेषत: श्रमिक 'फटाक्यां'चेच जीवन जगतात. त्यांचे जगणे आणि मरणे, खुशालचेंडू जीवन जगणाऱ्या धेंडाच्या–धनदांडग्याच्या इशाऱ्यावर अवलंबून आहे. गरिबांच्या जीवनाची होळी पेटवून आपली दिवाळी साजरी करणारी सनातन मानवी हित परंपरा, कवीने निषेधार्ह ठरविली आहे. सामान्य माणसाचे प्रतीक म्हणून 'फटाके' या कवितेत अर्थपूर्ण ठरतात. मार्क्सवादाचा टिळा न लावता, लाल झेंड्याचा जयघोष न करताही ही कविता, जगातील सर्व दरिद्री, गरिब जनतेच्या वेदनांचा जाहिरनामा कथन करते आहे. म्हणून आशयाच्या दृष्टीने या कवितेचे मूल्य निश्चितपणे श्रेष्ठ आहे.

लौकिक व्यवहारातील एका साध्या वास्तवतेचा रूपकात्मक अविष्कार होताना ही कविता, विश्ववेदनेशी आपली नाळ सिद्ध करते.

'फटाक्यां'नी असेच इतरांच्यासाठी अकारण स्वत:ला का उध्वस्त करून घ्यावे ? सामान्य माणसांना बळी देऊन मिळणारा आनंद खरोखरच 'आनंद' असतो का ? त्यांचे मूल्य कोणते ? स्वत:च्या आनंदासाठी दुर्बलता बळी देण्याऐवजी त्यांच्याही जीवनात आनंद निर्माण करून संपूर्ण जगच आनंदमय करता येईल काय ? अशा अनेक प्रश्नांची निर्मिती ही कविता करते. कवी श्रीपाद जोशी यांना 'फटाक्या'बद्दलच सहानुभूती आहे. म्हणूनच सर्वसामान्यांच्या कैवारातून–त्यांच्या वेदनेची काव्यात्म कहाणी कवी मांडतो. कवितेत गद्यमयता अधिक असली तरी ती जाणवत नाही. वि. स. जोगांनी या कवितेला 'उपरोधिका' म्हटलेय. पण उपरोधापेक्षा या कवितेतील गडद नि व्यापक वेदनाच अधिक बलशाली झाली आहे. उपरोधाची एक छटा म्हणजे कविता नव्हेच !

उपरोधिकाच म्हणायचे असेल तर 'वटहुकूम' या कवितेला म्हणता येईल. कारण 'घरापर्यंत बॉम्बचे तुकडे' येऊनही 'राज्यात मात्र कायदा आणि सुव्यवस्था उत्तम आहे' असा जहरी उपहास कवी नोंदवतो. बॉम्बस्फोटांची वास्तवता एकूण मानवी जीवनाचीच असुरक्षितता सिद्ध करीत आहे. म्हणूनच लुळे–पांगळे होणे, देह धारातीर्थी ठेवणे अटळ आहे. कवी, या पार्श्वभूमीवर 'श्रद्धांजलीचा आगाऊ ठराव वाचून दाखविण्याचे' आवाहन करतो. सर्वोच्च नागरिक स्वत:ला संबोधणारा हा कवी, स्वाक्षरीने वटहुकुम काढण्याची भाषा करतो. तोडण्याचे–तुटत राहण्याचे, स्वत:च स्वत:चे तुकडे करण्याचे प्रशिक्षण घेण्याची सक्तीही या वटहुकुमात करण्यात यावी हा विचार, वर्तमान राजकीय वास्तवावरील बोलके भाष्य आहे.

'वटहुकूम' या कवितेचे 'आतंक' या कवितेशी आशय–सूत्राच्या संदर्भातील (अतूट) नाते आहे पण 'आंतक' ही कविता काही गूढवादी संदर्भांनी संमिश्र परिणाम सिद्ध करते. 'प्रत्येकाच्या पायामध्ये दोर बांधला आहे' किंवा 'कोण कुठून हा कशास येतो' या सारख्या काव्यपंक्ती गूढता सांगू लागतात. पण खलिस्तानवादी शीख, स्वतंत्र काश्मिरवादी मुस्लीम या आतंकवाद्यांचे स्मरण या कवितेने करून दिले आहे. पण इथेच या कवितेच्या आशयाची व्याप्ती संपत नाही .पृथ्वीवरचा प्रत्येक माणूसच इथे आतंकवादी आहे, या भीषण वास्तवतेला ही कविता शब्दांच्या कवेत घेते आणि सांगते "जो तो भिडतो प्रत्येकाला; पाठीवरती पोटावरती, सुरा खुपसुनी जो तो आहे प्रत्येकाच्या ओठावरती" मग शीख वा मुस्लीम आतंकवाद्यांनाच दोष का द्यायचा ? आणि दोष देणारेही आतंकवादीच नाहीत काय ? संदर्भ वेगळा असेल ! पण प्रत्येकजण अतिरेकी होऊन माणसावर सुरा उगारतो. माणुसकीच्या पोटात कोणत्याही कारणाने सुरा खुपसणारा आतंकवादीच मग्हे का ? अशी ही कविता मन अस्वस्थ करून टाकते.

'वसाहत : व्यवस्थितपणे पुरलेल्यांची' या कवितेतही चिंतनाचे एक वेगळेच सूत्र आले आहे. स्वार्थाच्या हव्यासातून माणसं वजाबाकी करून घेतात–वजाबाकीत जातात. माणसांच्या वसाहती वाढताहेत. पण माणसात जिवंतपणाचा प्रत्यय येत नाहीय. स्मशानभूमीत माणसं हारीने व्यवस्थित

जशी पुरावीत तसे ही गांवं माणूसकीची मूल्ये हरवून स्वार्थाच्या मातीत पुरून घेतलेल्या माणसांच्या वसाहती बनल्या आहेत. कवी मर्ढेकरांना 'पृथ्वी' हीच 'तिरडी' झाल्याची अनुभूती आली, त्याची आठवण ही कविता वाचताना येते. मग माणसांच्या वसाहती जर अशा मुर्दाड झाल्यात तर टोळीयुगापासून विसाव्या शतकापर्यंतचा संपूर्ण मानवाच्या संस्कृतीचा-तत्वज्ञान, कला, साहित्याचा प्रवास आणि प्रवासातील मूल्यात्मक कमाई वाया गेली काय ? हा प्रश्नही मनाला छळत राहतो.

'कोण घरी परतलेला नाही अजून' या कवितेत निसर्ग आणि माणूस तसेच श्रीमंत आणि गरीब, या संघर्षात दुर्बल माणूसच पराभूत होतो. रस्त्यावरील धुळीत तुडवले जाणारे 'पादत्राण' सामान्य माणसाचेच असते. ते त्याच माणसाचेही प्रतीक आहे. म्हणून 'मिणमिणत्या वस्तीत' घरी कोण अजून परतला नाही ? हा चिंताजनक प्रश्न कवीला पडलेला आहे. कवीला या प्रश्नाचे उत्तर माहितही आहे. ज्याच्या जीवनाचा विस्कोट झालाय, तो गरीब माणूसच सबलांच्या हिंसाचारात हरवतो-मरतो. श्रीमंताच्या-साम्राज्यवाद्यांच्या 'मस्तीत' बळी पडतो. तो घरी अजून नव्हे केव्हाच परतणार नसतो !

'आतला घोडा' ही कविता, 'माणूसच घोडा झालाय' असेच जणू सांगते. शक्ती-सामर्थ्य आहे पण दिशाच नाही-ध्येयच नसेल तर घोडयाच्या-घोडयासारख्या, सामर्थ्याला काय अर्थ ? आणखी एक प्रश्न निर्माण होतो. सगळीच माणसं घोडा आहेत का ? — मला तसे वाटत नाही. श्रीपाद भालचंद्रांच्या कविता श्रेष्ठ दर्जाच्या चिंतनिका आहेत. प्रतिमा, अलंकार, कल्पनाविलास यांच्या अभावावर मात करणारे वैचारिक सामर्थ्य या कवितांनी पचविले आहे. गद्यमयात ही त्यांची मर्यादा ठरावी ! ■

सप्तशृंगी कॉलनी,
विद्यावर्धिनी परिसर, धुळे-४२४००१

: २ :

प्रा. मधू जामकर

श्रीपाद भालचंद्र जोशी,

स. न. वि. वि.

लघुसंकलनातील तुमच्या कविता आल्या. डॉ. जोगांचे भाष्य वाचले. अल्प शब्दात डॉ. जोगांनी आशयघन विचार मांडले आहेत. पण त्याहीपेक्षा तुमची 'आपण मित्रा, फटाके' आणि 'आतला घोडा' या दोन कविता उत्तम वाटल्या.

कवितेत केवळ उपरोध असून चालत नाही तर काव्यांतर्गत लयीने कवी बरोबर वाचकांचाही अविभाज्य अंग झाला पाहिजे. तुमच्या कवितेत केवळ उपरोधी शैली नसून तो एक कलामूल्यांचा कणा होऊन येतो.

गुंतागुंतीच्या जीवनात 'सामाजिक बांधीलकी' हे एक थोतांड होत असतांना तुमच्या कवितेने वेळीच तिला कलात्मक आवर घालून कलेच्या माध्यमातून सामाजिक ऋण व्यक्त केले हे विशेष. त्यामुळेच तुमची कविता मुक्तछंदात असूनही ती आम्हाला जवळची वाटते कारण तिने भावजीवनाची लय ओलांडलेली दिसत नाही.

आपला
मधु जामकर

समकालीन साहित्य

प्रा. स. त्र्यं. कुलली

समकालीन साहित्याच्या संकल्पनेबाबत मराठीत तशी फारशी चर्चा झालेलीच नाही. प्रस्तुत लेखकाने समकालीन साहित्याच्या आशयाची वैशिष्ट्ये तसेच समकालीन साहित्याच्या संकल्पनेच्या संबंधाने काही विचार मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

समकालीन साहित्य या संकल्पनेवर या लेखाच्या निमित्ताने मराठीला उपकारक अशी मूलभूत चर्चा घडून यावी व या संकल्पनेचे विविध आयाम उलगडावेत असा मानस आहेच. अशा चर्चेस प्रवृत्त करणाऱ्या प्रतिक्रिया वा मूळ विचार असणारे लेखन या निमित्ताने प्राप्त व्हावे ही अपेक्षा.

समकालीन साहित्याची व्याख्या कशी करायची ? कालकक्षा कोणती ? त्यासाठी निकष कोणता वापरायचा ? या प्रश्नांची विविध उत्तरे मिळतात.

भारतीय समाजाच्या संदर्भात समकालीन साहित्य म्हणजे स्वातंत्र्योत्तर साहित्य, असेही सांगण्यात येते. काळाच्या दृष्टीने विचार केल्यास स्वातंत्र्यप्राप्ती ही भारताच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाची घटना आहे. शेकडो वर्षांची गुलामगिरी झुगारून संपूर्ण देश इतिहासात प्रथमच राजकीयदृष्ट्या स्वतंत्र, सार्वभौम झाला. कोट्यावधी भारतीयांना हेलावून टाकणारी ही घटना. देशाच्या राजकीयच नव्हे तर वाङ्मयीन–सांस्कृतिक जीवनातही या घटनेचे असाधारण महत्त्व आहे. म्हणून मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचे स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर असे दोन भाग मानावेत, हे मत पटण्यासारखे आहे.

मराठी साहित्याच्या स्वरूपावरही या घटनेचा प्रत्यक्ष परिणाम झाला आहे. लोकशाही राज्यव्यवस्था, सार्वत्रिक शिक्षण, पंचवार्षिक योजना, नेहरूंचा समाजवादी आदर्श, भाषावार राज्यरचना यांचे साहित्यावर दूरगामी परिणाम झाले. ग्रामीण भागाला जाग आली. तळच्या जाती, उपेक्षित समाज, यांना हक्काची जाणीव झाली; प्रादेशिक भाषांना महत्त्व प्राप्त झाले. परिणामी मराठी साहित्यात नवे वाङ्मयप्रवाह, नव्या जाणिवांचे लेखक उदयास आले.

तात्पर्य, काळाच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण राष्ट्रीय घटना व वाङ्मयीन दृष्टीने नव्या जाणिवांना जन्म देणारी घटना म्हणून भारतीय स्वातंत्र्याचा कालबिंदू समकालीन मराठी साहित्यात प्रारंभबिंदू मानावा; असे एकमत आहे.

दुसरे महायुद्ध ही देखील एक जागतिक महत्त्वाची घटना असून तिने जगाच्या अनेक क्षेत्रात उलथापालथ केली. जगाचा राजकीय नकाशा बदलला; ब्रिटिश साम्राज्यशाहीचा ऱ्हास व अमेरिकन साम्राज्यशाहीचा उदय, समाजवादी राष्ट्रांची निर्मिती, वसाहतींच्या देशातील स्वातंत्र्य लढे असे आमूलाग्र बदललेले राजकीय चित्र तर दुसरीकडे युरोपचा विध्वंस, ५ कोटींची प्राणहानी; बेघर, बेकार, अनौरस, अपंग, मनोरुग्ण यांची प्रचंड संख्या आणि हे पाहून निराश, अगतिक झालेला, जीवनावरील विश्वास गमावून पराभूत झालेला माणूस हे सामाजिक क्षेत्रातील दारुण चित्र.

जाणिवेच्या क्षेत्रातही पडझड झाली. नैतिक मूल्यांचा ऱ्हास झाला. उदात्त जीवनाला काही अर्थ नसून ते क्षुद्र व भंगूर असल्याची विदारक अनुभूती आली.


मार्क्स, फ्राइड, रसेल, आइनस्टाइन, सार्त्र यांचे विविध क्षेत्रातील संशोधन व विचार यामुळे मानवी दृष्टीला नवी परिमाणे प्राप्त झाली.

या सर्व गोष्टींचे परिणाम जागतिक साहित्यावर झाले; तसे मराठी साहित्यावरही झाले. मनोविश्लेषण, नेणीवप्रधानता, प्रतिमाप्राधान्य, दुर्बोधता, अश्लीलता इत्यादी प्रवृत्ती महायुद्धोत्तर साहित्यात दिसू लागल्या. युद्धपूर्व साहित्यापेक्षा ते वेगळे दिसू लागल्याने त्याला 'नवसाहित्य' अशी व्यापक संज्ञा प्राप्त झाली. मर्ढेकर, गाडगीळ, चित्रे, जी. ए. इत्यादी नवसाहित्य लिहिणारे लेखक मराठीत उदयास आले.

सारांश, जागतिक महत्त्वाची घटना व नव वाङ्मयीन प्रवृत्ती-प्रवाहांना जन्म देणारी घटना म्हणून द्वितीय महायुद्धोत्तर साहित्य हे समकालीन साहित्य मानावे, असे काहींचे म्हणणे.

समकालीन साहित्याची व्याख्या बाह्य घटकांनी करण्यापेक्षा मराठी साहित्यातील कर्तृत्ववान साहित्यिकाच्या लेखनावरून करावी, असे एक मत आहे. या मतानुसार अर्वाचीन मराठी साहित्याने जे नवीन वळण घेतले त्याला आपण नवसाहित्य म्हणतो, नवसाहित्याची वैशिष्टये प्रामुख्याने ज्यात दिसतात आणि पुढील वाङ्मयावर ज्याचा खोल ठसा उमटलेला आहे, असा नवसाहित्याचा प्रातिनिधिक लेखक म्हणजे मर्ढेकर! त्यांनी मराठी काव्यात नवा आशय व नवी अभिव्यक्ती आणली. त्यांचे अनुकरण पुढीलांनी केले, म्हणून मर्ढेकरांना युगप्रवर्तक मानून त्यांच्या नंतरचे साहित्य ते समकालीन साहित्य मानावे, असे एक मत आहे.

अलिकडचे साहित्य ते समकालीन साहित्य; आपल्या पिढीचे साहित्य ते समकालीन साहित्य; वर्तमानकालीन साहित्य ते समकालीन साहित्य अशाही व्याख्या करण्यात येतात. या व्याख्या संदिग्ध असल्याने त्यांचा विचार करण्याचे कारण नाही. कारण वस्तुनिष्ठ निकष येथे स्वीकारलेला नाही.



समकालीन मराठी साहित्याची व्याख्या करताना व त्याची कालकक्षा ठरविताना आपल्याला दोन निकष लावावे लागतील. दोन दृष्टिकोनातून विचार करावा लागेल. (१) वाङ्‌मयीन दृष्टया. व (२) कालदृष्टया.

कालदृष्टया विचार केल्यास समकालीन वास्तवाचे प्रतिबिंब ज्यात पडले आहे ते समकालीन साहित्य असे म्हणता येईल. पण समकालीन वास्तव म्हणजे काय आणि ते एकच, एकसंध आहे का ? समकालीन वास्तव म्हणजे वाचकांच्या भोवतालचे वर्तमानकालीन आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक वास्तव. हे वास्तव एकसंध नसते. उदा. आर्थिक दृष्टया पाहिल्यास समाजात श्रीमंत, गरीब, मध्यमवर्ग असे थर दिसतात. सामाजिकदृष्टया जातींची उतरंड व स्त्री–पुरुष विषमता दिसते. सांस्कृतिकदृष्टया नागर, ग्रामीण, आदिवासी समूह दिसतात.

इथे माणसे आजही आदिम अवस्थेत, प्राणी पातळीवर जगतात; काही अजूनही मनाने रामायण, शिवाजीच्या काळात वावरतात; तर त्याचवेळी राकेश शर्मा अंतराळात क्षेप घेत असतो.

तात्पर्य, भारतातील कुठलेच वास्तव एकेरी नसून ते शोषक–शोषितात विभागलेले आहे. त्याला अनुसरुन आहे त्या स्थितीचे समर्थन करणारे 'जैसे थे' वादी व परिस्थिती बदलली पाहिजे म्हणणारे परिवर्तनवादी असे वैचारिक स्तर आपल्याला दिसतात.

प्रश्न असा की, यापैकी कोणत्या वास्तवाचे चित्रण करणारे साहित्य समकालीन साहित्य मानायचे ? त्याचा काळ आणि वैशिष्ट्ये कशी ठरवायची ?

उत्तर असे की, काळाचा निकष एका मर्यादेपर्यंत उपयुक्त आहे. त्याचा तेवढ्यापुरता उपयोग करून नंतर त्याला दुसऱ्या निकषाची जोड द्यायची. उदा. भूतकालीन जीवनाचे म्हणजे इतिहासातील किंवा पौराणिक काळातील जीवनाचे दर्शन घडविणारे साहित्य समकालीन साहित्य मानू नये. याचा अर्थ ते निकृष्ट असते असा नव्हे. शिवाय गतकाळाचे नवे अर्थन करणारे (न्यू इंटरप्रिटेशन), नव्या जाणिवांनी त्याकडे पाहणारे साहित्य, त्याचा विषय भूतकालीन असला तरी ते समकालीन साहित्य मानावे लागेल. उदा. बाबुराव बागूलांच्या 'सूड' कादंबरीतील जीवन मध्ययुगीन असूनही ती समकालीन ठरते. कारण नवे अर्थन. जी. एं. च्या कथेतील वातावरण ऐतिहासिक, सरंजामी असूनही त्या कथा समकालीन साहित्यात मोडतात. कारण लेखक त्याकडे अस्तित्ववादी नजरेने, नव्या जाणिवांनी पाहतो. विद्याधर पुंडलिकांची 'चक्र' समकालीन साहित्यात, तिचा विषय महाभारतकालीन असूनही, जमा होईल. परंतु स्वामी, यंत्रावेगळा, क्षेप, श्रीमान योगी, मृत्युंजय, तो राजहंस एक समकालीन साहित्य ठरणार नाही. कारण समकालीन जीवनसंदर्भाचे परिमाण, नव्या जीवन जाणिवांचा स्पर्श त्यांना झालेला नाही.

तसेच अत्याधुनिक किंवा ताज्या घटनेवरील 'लेटेस्ट' पुस्तके म्हणजे समकालीन साहित्य नव्हे. म्हणून वरील निकषानुसार बाबा कदम, कुमुदिनी रांगणेकर, चंद्रकांत काकोडकर वगैरे थोर साहित्यिक दर महिन्याला ताज्या विषयावरील नवी कोरी कादंबरी लिहितात म्हणून त्यांचे साहित्य समकालीन साहित्य ठरणार नाही. कारण ते वास्तवाचे एकेरी, वरवरचे, सवंग आणि गतानुगतिक चित्रण करतात.

समकालीन जीवनाचे वास्तव चित्रण ज्यात आहे म्हणजे दुहेरी वास्तव ज्यात व्यक्त झाले आहे ते समकालीन साहित्य मानावे. वर्तमानकालीन समाजजीवनाचे वर्णीय–जातीय वास्तवाचे चित्रण करणारे साहित्य समकालीन साहित्याच्या संज्ञेस पात्र ठरेल.

ज्याप्रमाणे गतकालीन जीवनाचे दर्शन घडविणारे साहित्य समकालीन साहित्य ठरू शकत नाही तसेच दूरच्या भविष्यातील जीवन चित्रित करणारेही. उदा. 'विप्लवा'सारख्या कादंबरीत अरुण साधू साम्यवादी समाजातील माणसांचा स्वभाव रेखाटू पाहतात. पण

साम्यवादी समाज हे समकालीन वास्तव नव्हे. ते स्वप्नस्थ वास्तव आहे ! जयंत नारळीकर 'प्रेषित'मध्ये परग्रहावरील माणसाचे पृथ्वीवरील आगमन रेखाटतात.' अशा प्रकारचे चित्रण हे उद्याचे वास्तव निश्चित आहे, पण समकालीन नव्हे. कारण एका व्यक्तीची मानसिकता म्हणजे समाजाची मानसिकता नव्हे. समुदायाची एक सामुहिक दृष्टी असते व तिचा एक विशिष्ट पल्ला (रेंज) असतो. एक व्यक्ती फार पुढचे पाहू शकेल. अख्खा समाज तसे पाहू शकत नाही. म्हणून लक्ष्मण लोंढे, निरंजन घाटे, नारायण धारप, राजेंद्र बर्वे इत्यादींचे विज्ञानकथा, अतिमानसशास्त्रावर आधारित साहित्य समकालीन साहित्य म्हणता येणार नाही.

समकालीन साहित्याच्या काळाचा निकष ठरविताना काळाच्या पोटात गडप झालेला भूतकाळ व अज्ञात असलेला भविष्यकाळ ही दोन टोके टाळून वर्तमानकालीन जीवनाचे चित्र रेखाटणारे साहित्य हे समकालीन साहित्य मानावे.

भारतीय स्वातंत्र्य, दुसरे महायुद्ध, नवसाहित्य, मर्ढेकर हे कालबिंदू घेतले आणि त्यांची सरासरी काढल्यास साधारणत: १९४० ते ५० पासूनच्या साहित्याला समकालीन साहित्य मानावे लागेल. मग कोणी त्याला स्वातंत्र्योत्तर म्हणेल किंवा द्वितीय महायुद्धोत्तर म्हणेल. पण मर्ढेकरोत्तर म्हणता येणार नाही. कारण मर्ढेकरी प्रवाह प्रभावी असला तरी तो समकालीन साहित्यातील एक प्रवाह आहे; एकमेव नव्हे.

समकालीनत्वाचा निकष ठरविण्यासाठी कालतत्त्वापेक्षा मूल्यांचे किंवा जाणिवांचे तत्त्व अधिक महत्त्वाचे आहे. हे तत्त्व वाङ्मयीन आहे. प्रत्यक्ष कलाकृतीमधे त्याचे दर्शन घडते. म्हणून वाङ्मयीनदृष्टया विचार करताना साहित्यकृतीच्या आशयातून अभिव्यक्ती–रूपातून जी मूल्ये, ज्या जाणिवा प्रकट होतात त्यांचे कालतत्त्वापेक्षा अधिक महत्त्व आहे.

समकालीन साहित्याच्या आशयाची वैशिष्टये खालील प्रमाणे सांगता येतील –

(१) वास्तवता (२) समग्रता (३) आधुनिकता.

(१) **वास्तवता :** मानवी जीवनाकडे स्वप्नरंजनात्मकदृष्टीने पाहता येते किंवा वास्तववादी नजरेनेही पाहता येते. स्वप्नरंजनवादी नजरेने पाहिल्यास जीवनाचे एक सुंदर, स्वप्नील, हळुवार परंतु आभासमय दर्शन घडते. जीवनात सर्व काही आलबेल आहे; आकाशात ईश्वर आणि पृथ्वीवर माणूस सुखात आहे; सर्व समस्या संपल्या आहेत; फुले फुलली आहेत, चांदणे पसरले आहे; दु:ख–दैन्य कोठेच नाही असे वाटू लागते. एखाद्या व्यक्तीचा हा प्रत्यय प्रामाणिक असेलही पण तो वास्तव असणार नाही. स्वप्नरंजनात्मक साहित्य आपल्या क्षुद्र सुखदु:खाचे अवडंबरजविते; आपल्यावरून जगाची कल्पना करते; आपल्या यशात आत्मसंतुष्ट राहते. त्या साहित्यात खोली नसते, उथळपणा असतो. उंची नसते, खुजटपणा असतो. वास्तवाचा प्रखर प्रकाशझोत पडताच त्याचे रंग वितळू लागतात.

मराठीतील बहुतेक प्रस्थापितांचे व नवशिक्यांचे साहित्य असे स्वप्नरंनात्मक आहे. वर्तमान वास्तवाच्या डोळयाला डोळा भिडवण्याऐवजी ते त्याच्याकडे पाठ फिरवते. स्वत:ला संकुचित व सुरक्षित कोषात गुरफटून घेते. नाहीतर चक्क भूतकाळात पळत सुटते. वास्तवापासून दूर पळणारे ते पलायनवादी साहित्य असते. आपल्याला बोचणारे, सलणारे प्रश्न अस्तित्वातच नाहीत, अशी सोयीस्कर समजूत हे लेखक करून घेतात. कटू वास्तवाचा घोट गिळण्याची पाळी आलीच तर लवकरच आपले काल्पनिक सुख अस्तित्वात येईल. असे स्वप्नरंजनवादी लेखकांना वाटते. भविष्याला सामोरे जाण्याऐवजी ते भूतकाळाकडे वळतात आणि परंपरेच्या कलेवराला कवटाळतात. मराठीत मध्यंतरी आलेले ऐतिहासिक, पौराणिक कथा–कादंबऱ्यांचे उदंड पीक स्वप्नरंजनवादी साहित्याचे चांगले उदाहरण आहे. बाळ कोल्हटकर, पु. ल., मधुसूदन कालेलकर, वसंत कानेटकर, यांची नाटके; गो. नि. दांडेकर, रणजीत देसाई, शिवाजी सावंत, ना. स. इनामदार,

बाबा पुरंदरे यांच्या कथा, कादंबऱ्या; मराठीतील तथाकथित 'इनोदी' साहित्य; घटनाप्रधान, भडक, रंजक ग्रामीण साहित्य आणि प्रेम विषयावरील बहुतेक कविता ही आणखी काही उदाहरणे.

वास्तवाचे हुबेहूब, फोटोग्रॅफिक चित्रण म्हणजे खराखुरा वास्तववाद नव्हे. उदा. मराठीत झोपडपट्टी जीवनावरील माहिमची खाडी, हातमट्टी अशा बऱ्याच कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या आहेत. पण इथे वास्तवाचे मूल्यरहित चित्रण आहे. आपण काहीतरी धीटपणे लिहीत आहोत, असे 'थ्रील' मनातल्या मनात लेखकाला वाटत असते.

वर्तमानातील चालू प्रश्न व घटना, तात्कालिक समस्या हाताळणारे लेखन समकालीन साहित्य नव्हे. म्हणजे असे की, जोशी–अभ्यंकर खून खटला गाजतो आहे का ? लिही त्याच्यावर नाटक किंवा कथा. नानावटी प्रकरण गाजते आहे काय ? मग पाड त्या प्रकरणावरील 'अपराध मीच केला' हे गल्लाभरू नाटक.

मर्यादित विषयाला, समस्येला व्यापक तत्त्वाशी जोडल्याशिवाय, तात्कालिकाला सार्वकालिकाशी जोडल्याशिवाय समकालिनत्वाचा दर्जा अशा लेखनाला प्राप्त होऊ शकत नाही. तेच वास्तववादी साहित्य, समकालीन साहित्य समजल्या जाते. जे वास्तवाची समीक्षा करते, चिकित्सा करते; वास्तवातील विसंगतीवर बोट ठेवते तर कधी प्रहार करते; वास्तवातील अन्याय, विषमता कुरूपता यांचा निषेध करते व सुंदराचे जयगीत गाते. वास्तवाचे वरवरचे चित्रण न करता भेदक दृष्टीने त्याचे सडके अंतःकरण, त्यातील अंतर्विरोध दर्शविते. अशा प्रकारे टीकात्मक किंवा आत्मलोचक वास्तववादाचे (क्रिटीकल रिॲलिझम) तीक्ष्ण शस्त्र हाती घेऊन वास्तवाचे अंतरंग स्पष्ट करणारे साहित्य समकालीन साहित्य ठरेल. मर्ढेकर, मुक्तिबोध, नारायण सुर्वे, बाबूराव बागूल, अरुण साधू, ढसाळ, भालचंद्र नेमाडे, भाऊ पाध्ये, सतीश आळेकर, गौरी देशपांडे, अनिल अवचट, आनंद यादव, दया पवार आदींचे साहित्य या प्रकारात येते.

(२) समग्रता : वास्तवतेबरोबर समकालीन साहित्याच्या आशयाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे समग्रता (टोटॅलिटी). म्हणजे जीवनाचे साकल्याने आकलन करण्याचा प्रयत्न करणे. विविध पातळ्यांवरून मानवी जीवनाकडे पाहणे. विविध कोनातून आयुष्याचे पैलू न्याहाळणे. व्यक्ती–समाज–परिस्थिती यांचे परस्पर संबंध ताण–तणाव, त्यातील गुंतागुंत समजून घेणे. माणसाचे मन समग्रतेने जाणून घेण्याचा प्रयत्न करणे. मर्ढेकरांच्या संज्ञाप्रवाहात्मक कादंबऱ्या व कविता, गाडगीळांच्या मनोविश्लेषणप्रधान कथा, कमल देसाई यांच्या लघुकादंबऱ्या, एलकुंचवारांची विविध गंडांची (कॉम्प्लेक्स) दर्शने घडविणारी नाटके व एकांकिका, जी. एं. च्या कथा, तेंडुलकरांची नाटके व एकांकिका यात मानवी मनाचा शोध घेतलेला दिसतो.

समग्रतेसाठी अंतर्मनाबरोबर माणसाच्या भोवतालचे भौतिक, सांस्कृतिक पर्यावरणही चित्रित करावे लागते. आर्थिक–सामाजिक–राजकीय पार्श्वभूमीच्या संदर्भात कथानक व पात्रांना उभे करावे लागते. सांस्कृतिक पार्श्वभूमी समजून घेण्यासाठी विविध धार्मिक मते, राजकीय विचारप्रणाली, विविध तत्त्वज्ञानाचे व्यूह आत्मसात करावे लागतात. त्यासाठी लेखकाला समाजशास्त्र, अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान, इतिहास व राजकारण यांचा व्यासंग ठेवावा लागतो. मुक्तिबोध, मर्ढेकर, जी. ए., भालचंद्र नेमाडे, सुर्वे, अरुण साधू यांच्या साहित्यात असा प्रयत्न दिसतो.

(३) आधुनिकता : समकालीन साहित्याच्या आशयाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे आधुनिक जाणीव (मॉडर्न कॉन्शसनेस). लेखकाच्या जाणिवेची मूस आधुनिक आहे की नाही, ज्या मनःकोषातून त्यांचे साहित्य निर्माण होते त्याला आधुनिक संवेदनशीलतेचा (मॉडर्न सेन्सिबिलिटी) स्पर्श झाला आहे की नाही हे समकालीन साहित्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असते. म्हणून १९८७ सालीही गुलाबराव महाराजांसारखी रचना करणारे किंवा गजानन महाराजांवर कविता लिहिणारे

लोक असले तरी त्या वाङ्मयाचा समकालीन साहित्यात समावेश करता येणार नाही. कर्मठ धार्मिकतेवर आधारलेले, अंधश्रद्धाळू व धार्मिकदृष्टया मने चिथावणारे वाङ्मय समकालीन साहित्य ठरणार नाही. कारण धर्मनिरपेक्ष दृष्टिकोन (सेक्युलर ॲटिट्यूड) ही आधुनिकतेची खूण असते. समकालीन साहित्यिक धर्माची लेबले डोक्यावर लावत नसतो. धर्माचा गाभा असलेली सामाजिक नीती व माणुसकी यांना आधुनिक मानवी मूल्यांची जोड देऊन, ज्ञानविज्ञान संस्कारित माणूस म्हणून, एक विश्वनागरिक म्हणून, केवळ माणूस म्हणून समकालीन साहित्यिक जगण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे संकुचित जात जमातवादी आणि प्रादेशिक अहंकार बाळगणारे साहित्य समकालीन साहित्याच्या संज्ञेस पात्र ठरणार नाही. गाव, जिल्हा, प्रांत यांच्याच कक्षेत न घोटाळता आणि त्यांना आंधळया, संकुचित अभिमानाचे विषय न करता राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घटना-प्रवाहांचा वेध समकालीन साहित्य घेत असते. सरंजामशाही, हुकुमशाही, गुलामगिरीचे समर्थन करणारे आणि जात, जमात, संप्रदाय यातच फिरणारे साहित्य समकालीन साहित्य ठरणार नाही.

सारांश, इहलोकवादी, बुद्धिवादी, विज्ञाननिष्ठ, धर्मनिरपेक्षतावादी, लोकशाहीवादी, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीयतावादी जाणिवा प्रकट करणारे साहित्य हे समकालीन साहित्य होय. कारण वरील जाणिवा आधुनिकतेची लक्षणे होत; आणि आधुनिक मानसिकता (मॉडर्न मेंटॅलिटी) ही समकालीन साहित्याची पूर्व अट आहे. मराठीतील प्रमुख प्रवाहांपैकी अस्तित्ववादी प्रवाह, नवसाहित्याचा प्रवाह, मार्क्सवादी आणि दलित साहित्याचा प्रवाह हे समकालीन साहित्यात मोडतील. परंतु ग्रामीण व जनसाहित्य प्रवाहातील आधुनिक वृत्ती प्रकट करणारेच साहित्य तेवढे समकालीन साहित्यात समाविष्ट होईल. बाकीचे नाही.

समकालीन साहित्याच्या आशयाची वैशिष्टये पाहिल्यानंतर शेवटच्या महत्त्वाच्या निकषाकडे वळू. हा निकष आहे मूल्यांचा किंवा मूल्ययुक्त जाणिवांचा. किंबहुना समकालीन मूल्यांचा अथवा मूल्यगर्भ जाणिवांचा आविष्कार ज्यात होतो ते समकालीन साहित्य, असे म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही.


मूल्यांच्या पातळीवर उभ्या मराठी वाङ्मयात आपल्याला सरळ दोन तट दिसतात. प्रतिगामी-पुरोगामी, परंपरावादी-सुधारणावादी, भूतकालसन्मुख-वर्तमानसन्मुख, जीवनसापेक्षतावादी-जीवन-निरपेक्षतावादी, यातील प्रतिगामी, परंपरावादी, भूतकालसन्मुख धारा ही समकालीन धारा ठरू शकत नाही. कारण तिची जीवनमूल्ये सरंजामी असतात. त्यातील जाणिवा सरंजामशाहीच्या युगाला, मध्ययुगाला शोभतील अशा जीर्ण कालबाह्य आणि मागासलेल्या असतात. सरंजामशाही भारतात केव्हाच इतिहासाच्या पोटात गडप झाली आहे. (जरी तिचे अवशेष विकृत स्वरूपात दिसत असले तरी.) समकालीन साहित्यास लायक ठरण्यासाठी त्या साहित्यातून किमान भांडवली जाणीव तरी व्यक्त झाली पाहिजे. कारण भांडवली जाणीव निदान आधुनिक जाणीव तरी आहे. तिच्या आधीच्या आदिम, गुलामी, सरंजामी ह्या समाजव्यवस्था व त्यांच्या मूल्यांचा पुरस्कार करणाऱ्या जाणिवा आधुनिक नसल्याने ते साहित्य समकालीन ठरणार नाही. समाजवादी जाणीव व्यक्त करणारे साहित्य निःसंशयपणे समकालीन ठरेल. कारण समाजवादी व्यवस्था हे जागतिक वास्तव असून ती अद्यावत जाणीव आहे. किंबहुना मूल्यदृष्टया ती सर्वात प्रगत व श्रेष्ठ जाणीव आहे. मात्र साम्यवादी समाजाचे चित्र सुंदर व उदात्त वाटले तरी ते वास्तव ठरणार नाही. कारण जागतिक पातळीवर साम्यवादी समाजाची (वर्ग-राज्यरहित, पूर्ण विकसित नवा माणूस असलेला व अतिप्रचंड उत्पादना-मुळे जगण्यासाठी फारच थोडा वेळ श्रम करून उरलेला वेळ सांस्कृतिक-वैचारिक अभिक्रियांमधे व्यतित करणारा समाज) स्थापना झालेली नसल्याने त्याचे चित्रण करणारे साहित्य समकालीन साहित्य ठरणार नाही.

मराठीत समाजवादी जीवन जाणीव मुक्तिबोध, करंदीकर, सुर्वे, ढसाळ, प्रकाश जाधव, मनोहर वाकोडे यांच्या काव्यात; अरुण साधू, अनिल बर्वे, शांताराम गरुड यांच्या कादंबऱ्यात, गोदावरी परुळेकर आणि पार्वतीबाई भोर आदींच्या आत्मचरित्रात आढळते.

निखळ सौंदर्यवादी दृष्टीने निसर्ग कविता किंवा प्रेमकविता लिहिणारे रेगे, इंदिरा संत, महानोर, ग्रेस, पाडगावकर यांचे साहित्य समकालीन साहित्यात न मोडण्याचे कारण असे की त्यांनी समकालीन जीवन संदर्भ टाळलेले असतात. एव्हढेच नव्हे तर समाज व्यवहार निरपेक्ष, जीवन निरपेक्ष भूमिका घेतलेली असते. आणि समकालीन साहित्य तर समाज वास्तवाच्या पायावर, जीवनाच्या भूमीवर पाय रोवून उभे असते. समाज आणि जीवननिरपेक्ष समकालीन साहित्य हा वदतोव्याघात आहे.

मूल्यगर्भ जाणीवेच्या दृष्टीने अस्तित्ववादी प्रवाह, मार्क्सवादी प्रवाह, दलित आणि जनसाहित्य प्रवाहातील काही लेखकांचे साहित्य समकालीन साहित्य ठरेल. पण या पातळीवरही दोन धारा दिसतात. व्यक्तिकेंद्रित, निराश मानवतावादी आणि समाजकेंद्रित, आशावादी–मानवतावादी. पहिल्या प्रवाहात मर्ढेकर, जी. ए.; चित्रे, कमल देसाई, खानोलकर, तेंडुलकर, एलकुंचवार आणि दुसऱ्या प्रवाहात मुक्तिबोध, सुर्वे, ढसाळ, नेमाडे, भाऊ पाध्ये, बाबुराव बागूल, यशवंत मनोहर, अरुण साधू, इत्यादी लेखक आहेत.

दोन्ही प्रवाहातील लेखक मराठीतील समर्थ साहित्यिक आहेत. पण मूल्यदृष्टया दुसरा प्रवाह बरा वाटणे शक्य आहे. कारण माणसांना जगायचे आहे. सुख–शांतीची स्वप्ने घेऊन भविष्याकडे जायचे आहे. मृत्यू, दुःख, विनाश पचवून उमलायचे आहे. माणसाची जीवनेच्छाच तशी प्रबळ आहे. म्हणून आशावादी मानवतावाद हे माणसाच्या जगण्याच्या मूलभूत प्रवृत्तीशी निगडित असे मूल्य आहे. जीवन प्रवाहाची दिशा दाखविणारे मूल्य आहे. ■



गझलचे छंदःशास्त्र : एक अभ्यास

भाग – २

आनंद आड़े

गझलच्या क्षेत्रात नवोदित तरुण कविमित्रांनी प्रवेश केला ही आनंदाची बाब आहे. यांची गझल लिहिण्याची अभिरुची वाखाणण्यासारखी आहे. 'दाद' देण्यासारखी आहे. परंतु दुर्दैवाने गझलच्या योग निर्मितीसाठी गझलच्या छंदाबद्दल पुरेशी किंवा मुळीच माहिती नसल्यामुळे मार्गदर्शनाअभावी हा दमदार वर्ग घुटमळत राहिला. त्यांच्या विचारांना, कल्पनांना आणि अनुभूतींना एक चांगला गझलकार म्हणून जन्माला येण्यासाठी छंदांच्या 'Outlet' ची नितांत आवश्यकता भासत होती. उपयुक्त Outlet सापडत नव्हते म्हणून दुर्दैवाने अनुकरण करण्याशिवाय त्यांच्याजवळ दुसरा मार्ग नव्हता. हा त्यांचा दोष नाही. कारण गझलच्या एकूण छंदांविषयी सविस्तर सखोल माहिती उपलब्ध झालेली नव्हती. त्यांच्यासाठी गझलच्या एकूण छंदाविषयी माहिती उपलब्ध व्हावी म्हणून हा अभ्यासासह प्रयत्न केला आहे.

'गझल'चे छंदशास्त्र : एक अभ्यास, नवोदित तरुण पिढीला हमखासपणे उपयोगी ठरेल याची खात्री आहे.

पहिल्या भागात आपण उर्दूच्या १९ सालिम छंदांची माहिती मिळवून त्यापैकी १० छंदांच्या इतर उपछंदांविषयी अभ्यास केला. आता उरलेल्या ९ उर्दू छंदांविषयी अभ्यास करू या.

छंदाचे नाव, गण, वजन व मात्रा

(१) 'तबील' मुसम्मन सालिम छंद. यात १४ अक्षरे व २४ मात्रा असतात.

गण : फऊलुन – मफाईलुन – फऊलुन – मफाऊलुन्

वजन : ल गा गा – ल गा गा गा – ल गा गा – ल गा गा गा

मात्रा १ २ २ – १ २ २ २ – १ २ २ – १ २ २ २

उदा. : किसी को – मुआसी से – बचाता – चला हूँ मैं ४ गण

खुशीयाँ – बखूबी से – मनाता – चला हूँ मैं ४ गण

पाप की नदी (१) (२) (३) (४)

(२) 'मुसम्मन मकबूझ' (उप) छंद यात १४ अक्षरे व २३ मात्रा असतात.

गण : फऊलुन् – मफाईलुन् – फऊलुन् – मफाइलन्

वजन : ल गा गा – ल गा गा गा – ल गा गा – ल गा ल गा

मात्रा : १ २ २ – १ २ २ २ – १ २ २ – १ २ १ २

उदा. : फसाना – सुनाना था – सुनाके – चले गये

खुशीयाँ – मनानी थी – मना के – चले गये

(३) 'अरुज मकबूज़ अर्ब सालिम' (उप) छंद (१) १४ अक्षरे २३ मात्रा असतात.
(२) १४ अक्षरे २४ मात्रा असतात.

१ ल्या चरणातील गण : फ ऊ लु न् – म फा इ लु न् – फ ऊ लु न् – म फा इ लु न्
१ ल्या वजन : ल गा गा – ल गा गा गा – ल गा गा – ल गा ल गा
मात्रा : १ २ २ – १ २ २ २ – १ २ २ – १ २ १ २
२ ऱ्या चरणातील गण : फ ऊ लु न् – म फा ई लु न् – फ ऊ लु न् – म फा ई लु न्
२ ऱ्या वजन : ल गा गा – ल गा गा गा – ल गा गा – ल गा गा गा
मात्रा : १ २ २ – १ २ २ २ – १ २ २ – १ २ २ २

(४) 'मुसम्मन मकफूफ' (उप) छंद : यात १४ अक्षरे व २२ मात्रा असतात.
गण : फ ऊ ल न् – म फा ई लु – फ ऊ लु न् – म फ ई लु
वजन : ल गा गा – ल गा गा ल – ल गा गा – ल गा गा ल
मात्रा : १ २ २ – १ २ २ १ – १ २ २ – १ २ २ १

(५) मुसम्मन मकसूर (उप) छंद : यात १२ अक्षरे व २० मात्रा असतात.
गण : फ ऊ ल न् – म फा इ ल – फ ऊ ल न् – म फा इ ल
वजन : ल गा गा – ल गा गा – ल गा गा – ल गा गा
मात्रा १ २ २ – १ २ २ – १ २ २ – १ २ २

या वहर (छंदा) मध्ये व मराठीच्या 'भुजंग प्रयात' या छंदात विलक्षण साम्य असल्याचे दिसून येते.

भुजंगी छंदाचो लक्षणे : (अ) प्रत्येक चरणात १२ अक्षरे, (आ) यती ६ व्या अक्षरावर.
(इ) (भुजंग प्रयाती य चारीहि येती)

गण : य, य, य, य.

उदा. : गणादीश जो ईश सर्वा गुणांचा
मुळारंभ आरंभ तो निर्गुणांचा
नमूं शारदा मूळ चत्वार वाचा
गमू पंथ आनंत या राघवाचा

ग णा धी । श जो ई । श स र्वा । गु णां चा
ल गा गा । ल गा गा । ल गा गा । ल गा गा
∪ – – । ∪ – – । ∪ – – । ∪ – –
य य य य (य गण ४ वेळा)

(६) 'मुसम्मन असलन' (उप)छंद : यात १४ अक्षरे, २२ मात्रा असतात.
गण : फ उ लु न् – म फा ई ल न् – फ उ लु न् – म फा ई ल न्
वजन : ल ल गा – ल गा गा गा – ल ल गा – ल गा गा गा
मात्रा : १ १ २ – १ २ २ २ – १ १ २ – १ २ २ २

(७) मुसम्मन असरम (उप) छंद : यात १२ अक्षरे; २० मात्रा असतात.
गण : फ उ लु – म फा ई ल न् – फ उ लु – म फा ई ल न्
वजन : गा ल – ल गा गा गा – गा ल – ल गा गा गा
मात्रा : २ १ – १ २ २ २ – २ १ – १ २ २ २
अथवा – फाअ | – ,, – | – ,, – | – ,, | सारख्याच मात्रा आहेत.
मात्रा : २ १ |

अनुक्रमणिका

(८) मुसम्मन मुसब्बग (उप) छंद : यात १६ अक्षरे २६ मात्रा असतात.

गण : फ ऊ ल न् – म फा ई ला न् – फ ऊ ल न् – म फा ई ला न्

वजन : ल गा गा – ल गा गा गा ल – ल गा गा – ल गा गा गा ल

मात्रा : १ २ २ – १ २ २ २ १ – १ २ २ – १ २ २ २ १

(९) वरील छंद–पण गणात फरक आहे. यात १६ अक्षरे २६ मात्रा असतात.

गण : फ ऊ ला न् – म फा ई ल न् – फ ऊ ला न् – म फा ई ल न्

वजन : ल गा गा ल – ल गा गा गा – ल गा गा ल – ल गा गा गा

(१०) मुसब्बग चा तिसरा प्रकार : यात १८ अक्षरे, २३ मात्रा असतात.

गण : फ ऊ ला न् – म फा ई ला न् – फ ऊ ला न् – म फा ई ला न्

वजन : ल गा गा ल – ल गा गा गा ल – ल गा गा ल – ल गा गा गा ल

मात्रा : १ २ २ १ – १ २ २ २ १ – १ २ २ १ – १ २ २ २ १

छंद : मराठी गझलसाठी योग्य छंद आहेत. कारण शेवटच्या गणात हलंत नाही.

(१) 'करीब मुसद्दस सालिम' छंद : या छंदाचा उर्दूमध्ये फारच कमी प्रमाणात उपयोग झाला आहे. इराणी गझलकारासाठी उपयुक्त छंद आहे. ही बहर यूसुफ नीशापुरी यांच्या पसंतीची असून 'मझारिअ' छंदाशी मिळतीजुळती आहे. 'मकसर' आणि 'महझूक'च्या एकत्र उपयोगाला छंदकारांनी मान्य केले आहे.

या छंदात १२ अक्षरे व २१ मात्रा असतात.

गण : म फा ई लु न् – म फा ई लु न् – म फा ई लु न् (षटगण)

वजन : ल गा गा गा – ल गा गा गा – ल गा गा गा

मात्रा : १ २ २ २ – १ २ २ २ – १ २ २ २

(२) मुसद्दस मकफूफ सास्तिम छंद : यात १२ अक्षरे व १९ मात्रा असतात.

गण : म फा ई लु – म फा ई लु – फा इ ला तु न् (षटगण)

वजन : ल गा गा ल – ल गा गा ल – गा ल गा गा

मात्रा १ २ २ १ – १ २ २ १ – २ १ २ २

(३) करीब–'मुसद्दस मकफूफ मकसूर' छंद : यात १२ अक्षरे, १८ मात्रा असतात.

गण : म फा ई ल – म फा ई लू – फा इ ला तु (षटगण)

वजन : ल गा गा ल – ल गा गा ल – गा ल गा ल

मात्रा १ २ २ १ – १ २ २ १ – २ १ २ १

(४) प्रकार दुसरा : या छंदात शेवटचे गण 'फाअलन्' येत असते. यात ११ अक्षरे व १७ मात्रा असतात.

गण : म फा ई ल – म फा ई लु – फा अ ल न्

वजन : ल गा गा ल – ल गा गा ल – गा ल गा

मात्रा १ २ २ १ – १ २ २ १ – २ १ २

(५) मुसद्दस अखरब (उप) छंद : यात १० अक्षरे व १७ मात्रा असतात.

१. गण : म फ ऊ लु – म फ ऊ लु – फा इ ला तु न्

वजन : गा गा ल – गा गा ल – गा ल गा गा

मात्रा : २ २ १ – २ २ १ – २ १ २ २

२. गण : म फ ऊ लु – म फ ऊ लु – फा अ ली या न् (यात ११ अक्षरे, १८ मात्रा.)
वजन : गा गा ल – गा गा ल – गा ल गा गा ल
मात्रा : २ २ १ – २ २ १ – २ १ २ २ १
यात दुसरा प्रकार 'मुसब्बग' आहे.

(६) 'मुसद्दस अखरब मकफूफ' (उप) छंद : यात ११ अक्षरे व १८ मात्रा असतात.
गण : म फ ऊ लु – म फा ई लु – फा अ ला तु न्
वजन : गा गा ल – ल गा गा ल – गा ल गा गा
मात्रा : २ २ १ – १ २ २ १ – २ १ २ २

(७) 'मुसद्दस अखरब मकसूर' (उप) छंद : यात ११ अक्षरे, १७ मात्रा असतात.
गण : म फ ऊ लु – म फा ई लु – फा इ ला न
वजन : गा गा ल – ल गा गा ल – गा ल गा ल
मात्रा : २ २ १ – १ २ २ १ – २ १ २ १

(८) 'मुसद्दस अखरब महजूफ' (उप) छंद : यात १० अक्षरे १६ मात्रा असतात.
गण : म फ ऊ लु – म फा ई लु – फा अ ल न्
वजन : गा गा ल – ल गा गा ल – गा ल गा
मात्रा : २ २ १ – १ २ २ १ – २ १ २
मराठी गझलसाठी उपयुक्त छंद आहे.

(९) 'मुसद्दस अखरब अश्तर' (उप) छंद : यात १० अक्षरे, १७ मात्रा असतात.
गण : फा इ ल न् – फा ई ल न् – फा अ ला तु न्
वजन : गा ल गा – गा ल गा – गा ल गा गा – (षटगण)
मात्रा : २ १ २ – २ १ २ – २ १ २ २

(३) 'बसीत' छंद : या छंदाचा आणि या छंदाच्या उपछंदांचा अरबी शायरीत उपयोग झाला आहे. तसे पाहिले तर या बसीत छंदाच्या उपछंदांचा थोड्याबहुत प्रमाणात उर्दू शायरांनी उपयोग केला आहे. हा छंद कष्टसाध्य आहे.

(१) 'बसीत मुसम्मन सालिम' छंद : यात १४ अक्षरे, २४ मात्रा असतात.
गण : मु स त फ अ लु न् – फा इ लु न् – मु स त फ अ लु न् – फा इ लु न् ४ गण
वजन : गा गा ल गा – गा ल गा – गा गा ल गा – गा ल गा ४ गण
मात्रा : २ २ १ २ – २ १ २ – २ २ १ २ – २ १ २

(२) 'मखबून रुकनसानी' (उप) छंद : यात १२ अक्षरे, २२ मात्रा असतात.
गण : मु स त फ इ लु न् – फ इ लु न् – मु स त फ इ लु न् – फ इ लु न्
वजन : गा गा ल गा – गा गा – गा गा ल गा – गा गा (अष्टगण)
मात्रा : २ २ १ २ – २ २ – २ २ १ २ – २ २

(३) मखबून रुकन अव्वल (उप) छंद : यात १२ अक्षरे, २० मात्रा असतात.
गण : म फा इ ल न् – फ इ ल न् – म फा इ ल न् – फ इ ल न्
वजन : ल गा ल गा – गा गा – ल गा ल गा – गा गा
मात्रा : २ १ १ २ – २ २ – १ २ १ २ – २ २

(४) 'मुसम्मन मतवी' (उप) छंद : यात १४ अक्षरे, २२ मात्रा असतात.

गण : मु फ त इ ल न् – फा इ ल न् – मु फ त इ ल न् – फा इ ल न्
वजन : गा ल ल गा – गा ल गा – गा ल ल गा – गा ल गा
मात्रा २ १ १ २ – २ १ २ – २ १ १ २ – २ १ २

(५) 'मुसम्मन मकतूअ रुकन अव्वल' (उप) छंद : यात १२ अक्षरे, २२ मात्रा आहेत.

गण : म फ ऊ ल न् – फा इ ल न् – म फ ऊ ल न् – फा इ ल न्
वजन : गा गा गा – गा ल गा – गा गा गा – गा ल गा
मात्रा : २ २ २ – २ १ २ – २ २ २ – २ १ २

(६) 'मुसम्मन मकतूअ रुकन' दुसरी (उप) छंद : यात १२ अक्षरे, २२ मात्रा असतात.

गण : मु स त् फ इ ल न् – फ इ ल न् – मु स त फ इ ल न् – फ इ ल न्
वजन : गा गा ल गा – गा गा – गा गा ल गा – गा गा
मात्रा : २ २ १ २ – २ २ – २ २ १ २ – २ २

(७) 'मुसम्मन हर दो रुकन' (उप) छंद : यात १० अक्षरे, २० मात्रा असतात.

गण : म फ ऊ ल न् – फ अ ल न् – म फ ऊ ल न् – फ अ ल न्
वजन : गा गा गा – गा गा – गा गा गा – गा गा
मात्रा : २ २ २ – २ २ – २ २ २ – २ २

(८) 'मुसम्मन अलक्ष हर दो रुकनी' (उप) छंद : यात ६ अक्षरे, १२ मात्रा आहेत.

गण : फ इ लु न् – फ अ् – फ इ लु न् – फ अ्
वजन : गा गा – गा – गा गा – गा
मात्रा : २ २ – २ – २ २ – २
वरच्या ओळीत चार गण व खालच्या ओळीत चार जण.

(९) 'मुसम्मन अलक्ष रुकन अव्वल' (उप) छंद : यात १८ मात्रा, १० अक्षरे आहेत.

गण : फ इ ल न – फा इ ल न – फ इ ल न – फा इ ल न ४ गण
वजन : गा गा – गा ल गा – गा गा – गा ल गा
मात्रा : २ २ – २ १ २ – २ २ – २ १ २

(१०) 'मुसम्मन मखलूअ' (उप) छंद : यात १२ अक्षरे; २० मात्रा असतात.

गण : मु स् त फ अ ल न् – फ् अ ल – मु स् त फ अ ल न् – फ अ् ल ४ गण
वजन : गा ल गा गा – गा ल – गा ल गा गा – ल गा ४ गण

(११) 'बसीत मुसद्दस सालिम' (उप) छंद : यात ११ अक्षरे, १९ मात्रा आहेत.

गण : मु स् त फ अ ल न् – फा अ ल न् – मु स त फ अ ल न् ३ गण
वजन : गा ल गा गा – गा ल गा – गा ल गा गा
मात्रा : २ १ २ २ – २ १ २ – २ १ २ २

(१२) मुसद्दस मत्तवी (छंद) : यात ११ अक्षरे व १७ मात्रा आहेत.

गण : मु फ त अ ल न् – फा इ ल न् – मु फ त अ ल न् ३ गण
वजन : गा ल ल गा – गा ल गा – गा ल ल गा ३ गण
मात्रा : २ १ १ २ – २ १ २ – २ १ १ २

(४) 'सरीअ' छंद : हा छंद उर्दूमध्ये कमी प्रमाणात प्रचलित आहे. पोटछंदांचा सुद्धा वापर कमी झालेला आहे. सालिम छंदातील गण स्थिर नसल्याने, त्यात बदल होत असल्याने रचना करणे अशक्य वाटते. हा छंद कष्टसाध्य आहे. उर्दूमध्ये या छंदाचा 'रुकन मतवी'चा उपयोग करण्यात आला आहे. परंतु–'सालिम' – फारच कष्टाने ! पण अशा अवघड छंदासाठी आपण योजिलेले वजन 'गा' गुरूसाठी, व 'ल' लघुसाठी असल्याने अगदी सहज साध्य होण्यासारखे आहे. उर्दू आणि फारसीमध्ये रुकन आणि त्या संबंधात पुष्कळ बंधने आहेत. आपल्या मराठी भाषेत तसे नाही. त्यामुळे अडचण येऊ शकत नाही. 'लघु'ची आपण एकच मात्रा मोजतो. अर्धी मात्रा मोजीत नाही.

(१) 'सरीअ–मुसद्दस सालिम' छंद : यात १२ अक्षरे व २१ मात्रा असतात

गण : मुस तफ् अ लुन् – मुस तफ्इलुन् – मफ ऊ लातु ३ गण असतात.
वजन : गा गा ल गा – गा गा ल गा – गा गा गा ल
मात्रा : २ २ १ २ – २ २ १ २ – २ २ २ १

(२) 'मुसद्दस मोकूफ' (उप) छंद – यात २१ मात्रा, १२ अक्षरे असतात.

गण : मुस त,फइ लन् – मुस त,फइ लन् – मफ ऊ ला न् ३ गण × ३. असतात.
वजन : गा ल गा गा – गा ल गा गा – गा गा गा ल
मात्रा : २ १ २ २ – २ १ २ २ – २ २ २ १

२(१) मुसद्दस मकसूद मोकूफ : यात ११ वर्ण, २० मात्रा असतात.

गण : मुस त फइ लन् – मुस त फइ लन् – मफ ऊ लन् षटगण
वजन : गा ल गा गा – गा ल गा गा – गा गा गा
मात्रा : २ १ २ २ – २ १ २ २ – २ २ २

(२) गण : मुफ् त इ लन् – मुफ् त इ लन् – फा इ ला न यात १२ वर्ण, व
वजन : गा ल ल गा – गा ल ल गा – गा ल गा ल १८ मात्रा असतात.
मात्रा : २ । । २ – २ । । २ – २ । २ ।

(३) (३) गण : मु फ त इ ल न – मु फ त इ ल न् – फा इ ला न् यात १२ अक्षरे व
वजन : गा ल गा ल – गा ल गा ल – गा ल गा ल १८ मात्रा आहेत.
मात्रा : २ १ २ १ – २ १ २ १ – २ १ २ १

(३) (४) गण : मु फ त् इ ल न् – मु फ त इ ल न् – फा इ ल न् यात ११ वर्ण, व
वजन : गा ल ल गा – गा ल ल गा – गा ल गा १७ मात्रा आहेत.
मात्रा : २ १ १ २ – २ १ १ २ – २ १ २

(४) 'मुसद्दस मकसूफ मखबून' (उप) छंद : यात ११ अक्षरे व १९ मात्रा आहेत.

गण : मु स त् फ इ लु न् – मु स् त फ इ लु न् – फा इ ल न्
वजन : ल गा गा गा – ल गा गा गा – गा ल गा
मात्रा : १ २ २ २ – १ २ २ २ – २ १ २

(५) 'मुसद्दस मतवी मकतूअ मजद्धुअ् (उप) छंद : यात ९ वर्ण, १५ मात्रा असतात.

(१) गण : मु फ त अ ल न् – म फ ऊ ल न् – फा अ्
वजन : गा ल ल गा – गा गा गा – गा ल
मात्रा : २ १ १ २ – २ २ २ – २ १

(२) गणं : मु फ त अ ल न् – म फ ऊ ल न् – फ अ् यात ८ वर्णं व १४ मात्रा असतात.
वजन : गा ल ल गा – गा गा गा – गा
मात्रा : २ १ १ २ – २ २ २ – २

(६) 'मुसद्दस् मखबून मतवी मकसूफ छंद : यात ११ वर्ण, १७ मात्रा असतात.
गण : म फा इ ल न् – म फा इ ल न् – फा इ ल न्
वजन : ल गा ल गा – ल गा ल गा – गा ल गा
मात्रा : १ २ १ २ – १ २ १ २ – २ १ २

(७) 'मुसद्दस मखबून मोकूफ' (उप) छंद : यात १२ वर्ण, १८ मात्रा आहेत.
गण : म फा इ ल न् – म फा इ ल न् – फा इ ला न्
वजन : ल गा ल गा – ल गा ल गा – गा ल गा ल
मात्रा : १ २ १ २ – १ २ १ २ – २ १ २ १

(८) 'मसद्दस मकतूअ् मजद्दअ' (उप) छंद : यात ८ वर्ण, १५ मात्रा असतात.
गण : म फ ऊ ल न् – म फ ऊ ल न् – फा अ्
वजन : गा गा गा – गा गा गा – गा ल
मात्रा : २ २ २ – २ २ २ – २ १

(९) 'मुसद्दत मनहूर' छंद : यात ७ वर्ण, १४ मात्रा असतात.
गण : म फ ऊ ल न् – म फ ऊ ल न् – फ अ्
वजन : गा गा गा – गा गा गा – गा
मात्रा : २ २ २ – २ २ २ – २

उपरोक्त 'सरीर मुसद्दस सालिम' छंदात तीन गण आहेत. आणि प्रयोग म्हणून तिसरा गण वगळून केवळ 'गा गा ल गा' – 'गा गा ल गा' – या वजनात – तालात गझल लिहिता येते. प्रयोग करण्यात काहीच हरकत नाही. उर्दूत तसे होत आहे. अनुकरण म्हणून नव्हे तर कै. उ. रा. गिरी यांनी तसा प्रयोग आपल्या 'वसा' या काव्यात केला आहे व त्यांनी 'गा गा ल गा' हे वजन दोन वेळा घेऊन काव्य रचना केली आहे.

उदा:– वेडाच मी, वेडीच तू
वेडीच स्वप्ने आपुली
वेड्याच आभाळाकडे
वेडी निघे ही बाहुली

कै. उ. रा. गिरी

(क्रमशः)

सवय

सवयीने बऱ्याच गोष्टी शिकता येतात
असे आजी सांगत होती
तिला चालता येत नव्हते
तरी बाळासारखी रांगत होती

सवय आतड्याला चूप करते
हळूहळू नंतर भूक मरते
पुढे आसवेही आटून जातात
लक्तरांची दुकाने थाटून जातात
डोळ्यांना सवय होते पाहण्याची

जिभेला चूप राहण्याची
नंतर अंधाराचे काही वाटत नाही
होते हळू हळू सवय
मरण जवळ येते जसे
वाढत जाते वय.

■

महापूर

विना दरवाजा खिडकीच्या झोपडीत
आम्ही लहानाचे मोठे झालो
कोणत्याही रस्त्यास आमची झोपडी
जोडलेली नव्हती
तरीही त्या झोपडीशी
आमची नाळ तोडलेली नव्हती
एक दिवस सूर्याच्या किरणांवर चढून
आम्ही या जगाच्या खोल आणि
विशाल प्रवाहात उडी घेतली
दूर दूर वाहत आलो
तसे या महापुराचाच एक भाग झालो
दगड, धोंडे हे आमचे पुरातील सोबती
महापुरात आम्हाला कोरडे शब्दही भेटले
आमच्याशी विनाकारण बरेच जण खेटले
हळू, हळू आम्हाला सवय होत गेली
धक्के खाण्याची, धक्के देण्याची
दुधात पाणी, पाण्यात दूध पिण्याची
आता आमच्या घराला खिडक्या, दरवाजे
आणि दाराजवळ रस्ता झाला
विजेचा खांब, उजेड दारात आला
बाहेर प्रकाशाच्या पुरात माणूस वाहत गेला
घरा-घरात तसा अंधार झाला.

■

एकांत

डस्टरने फळा पुसावा
तसे त्याने स्वतःला आतून
पुसून घेतले आणि तो स्वतःवर
दिलखुलास हसला
फाडलेल्या कवितांचे तुकडे जाळीत
हात शेकीत बसला

एकांताच्या गर्दीत हरवला
म्हणजे तो स्वतःला विसरून
असे काही-बाही करतो
अनेकदा मेला तसा
पुन्हा एकदा मरतो.

वामन निंबाळकर

□□

जोडव्यांचा धाक

गोकुळात
कृष्णाई
वेडीपिसी
जाईजुई

फुललेली
रातराणी
नागाचा
कंठमणी

चाफेकळी
जिचं नाक
जोडव्यांचा
तिला धाक.

महावीर जोंधळे

प्रस्तावना : काही मूलतत्त्वे

डॉ. राजेंद्र डोळके

'प्रस्तावना' हा प्रकार गेल्या काही वर्षांपासून बराच वादग्रत राहिलेला असून दोन्ही बाजूंनी प्रस्तावना नाकारणे ही आपआपल्या प्रतिष्ठेची बाब केलेली आढळते.

प्रस्तावनेचे देणे-घेणे हा त्यामुळे सखोल चर्चेचा भाग झालेला आहे. डॉ. राजेंद्र डोळके यांनी या विषयावर मांडलेले विचार येथे प्रकाशित करीत असून त्यावर अभ्यासपूर्ण प्रतिक्रिया अपेक्षित आहेत.

प्रस्तावना शब्दाचे अर्थ व परंपरा

प्रस्तावना हा शब्द मूळ संस्कृतातील. त्याचा धात्वर्थ (प्र + स्तु स्तुती) म्हणजे स्तुती करणे व (प्र + स्तु) मांडणे असा आहे. ह्या शब्दाला इंग्रजीत कसकसे अर्थ आहे हे आपटे कोषावरून कळून येते.

(1) Causing to be praised or mentioned, praising, praise

(2) Beginning, commencement

(3) An introduction, preface, exordium (in general)

(4) An introductory dialogue (the prologue) at the beginning of a drama

मराठीत ह्या शब्दाचा अर्थ आरंभ, उपक्रम, सुरुवात, प्रसंगोचित, निरूपण, मांडणे असा सापडतो. हा शब्द प्राचीन आहे. शूद्रकाच्या 'मालतीमाधव' ह्या संस्कृत नाटकात हा शब्द 'आर्यबालचरिताप्रस्तावनाडिंडिम' व 'प्रस्तावना इयं कपटेनाटकस्य' याप्रमाणे आढळतो. इतरत्रही प्राचीन संस्कृतात हा शब्द आढळतो. प्राचीन मराठीत प्रस्ताव हा शब्द प्रस्तावना या अर्थाने 'ज्ञानेश्वरी', 'स्मृतिस्थळ', 'वृद्धाचार', 'रुक्मिणीहरण' (सामराज), 'श्रीकृष्णचरित्र' (महानुभावीय) वगैरे ग्रंथात आढळतो.

एकाने दुसऱ्याच्या ग्रंथाला प्रस्तावना लिहावी हा प्रकार प्राचीन काळात आढळत नाही. ग्रंथलेखक स्वतःच ग्रंथारंभी ग्रंथाची भूमिका, विषय, पूर्वसुरींचे ऋण, स्वतःविषयी वाटत असलेला आत्मविश्वास, विनय, ग्रंथाचे आधार वगैरे गोष्टी लिहित असत.

प्रस्तावना कोणाकडून घेतल्या जाते

सर्वसामान्य संकेत असा रूढ आहे की ज्या व्यक्तीकडून प्रस्तावना घेतल्या जाते ती व्यक्ति लेखकाहून त्या विषयात ज्येष्ठ व श्रेष्ठ असते. विषयाच्या बाबतीत नसली तरी निदान वयाने तरी ती व्यक्ति लेखकाहून ज्येष्ठ असते. याला काही अपवादही असतात. उदा. : डॉ. रा. चिं. ढेरे यांच्या 'चक्रपाणि' ह्या पुस्तकाला नरहर कुरुंदकर यांनी लिहिलेली प्रस्तावना. केवळ वैयक्तिक स्नेहाखातरही साहित्य क्षेत्रातील फारसे अधिकारी नसलेल्या व्यक्तींकडूनही प्रस्तावना घेतली जाते. उदा. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या 'अवशेष' या पुस्तकाला श्री. वि. ह. कुळकर्णी यांनी लिहिलेली प्रस्तावना. मराठीत पतीच्या पुस्तकाला पत्नीने प्रस्तावना लिहिल्याचीही काही उदाहरणे आहेत. त्यापाठीमागे भावनिक कारणापेक्षा अन्य दुसरे कोणतेही कारण नसते. कधीकधी आपल्यापेक्षा वयाने लहान परंतु त्या विषयातील व्यासंगी अशा व्यक्तीचीही प्रस्तावना घेतल्या जाते. उदा. रियासतकार सरदेसाई यांनी 'नानासाहेब पेशवे' या पुस्तकाला घेतलेली इतिहासकार शेजवलकर यांची प्रस्तावना. हा लेखकाच्या मनाचा निश्चितच

मोठेपणा होय. त्याप्रमाणे लेखक व प्रस्तावनाकाराच्या साहित्यिक व भावनिक संबंधाची यादी आणखीही वाढविता येईल. परंतु ज्या व्यक्तीकडून प्रस्तावना घेतल्या जाते ती व्यक्ति सामान्यत: लेखकापेक्षा वयाने व साहित्यिक विद्वत्तेने ज्येष्ठ असते हे सर्वमान्य मत ग्राह्य धरण्यास हरकत नाही. अनेक विद्वान जेव्हा जाणीवपूर्वक दुसऱ्याची प्रस्तावना घेणे नापसंत करतात तेव्हा त्यात स्वत:पेक्षा दुसऱ्याला विद्वान न समजणे हीच भावना दडलेली असते ही वस्तुस्थिती नाकारण्यात अर्थ नाही. ना. सी. फडक्यांनी दीडशेच्या वर पुस्तके लिहिली. परंतु ' अल्ला हो अकबर ' ही त्यांची अगदी पहिलीच कादंबरी सोडली तर त्यांच्या इतर कोणत्याही पुस्तकाला प्रस्तावना आढळत नाही. (' अल्ला हो अकबर 'ला रा. द. रानडे यांनी प्रस्तावना लिहिली आहे. फडक्यांनीही कोणाच्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिल्याचे माझ्या पाहण्यात नाही.)

प्रस्तावनेचे प्रकार

प्रस्तावनेचे प्रामुख्याने दोन प्रकार पडू शकतात. एक म्हणजे एखादे प्राचीन काव्य संशोधून त्याला संशोधनात्मक, रसग्रहणात्मक वा विवेचनात्मक प्रस्तावना व दुसरी म्हणजे एखाद्याच्या कथा-काव्य-लेख संग्रहाला किंवा नाटक, कादंबरीला लिहिलेली प्रस्तावना. डॉ. वि. भि. कोलते यांनी १४-१५ महानुभावीय ग्रंथ संपादिले आहेत. व त्यांना विवेचक विस्तृत प्रस्तावना लिहिल्या आहेत. काव्याच्या मिळालेल्या हस्तलिखितांची माहिती, संहितासंपादनाचे धोरण, इतर महानुभावीय ग्रंथात आढळून येणाऱ्या उल्लेखांच्या सहाय्याने लेखकाबद्दल माहिती, ग्रंथ व लेखक यांचे काळ इत्यादि माहिती देऊन पुढे काव्याचे रसग्रहण इ. विषय सामान्यत: डॉ. कोलते यांच्या प्रस्तावनेत चर्चिले असतात. वा. ना. देशपांडे यांनी ' स्मृतिस्थळ ' व ' आद्य मराठी कवयित्री ' या ग्रंथांना लिहिलेल्या प्रस्तावना उत्कृष्ट आहेत. त्यांच्या प्रस्तावनांनी ग्रंथ संपूर्णत: उजळून निघतात. ' सूत्रपाठा 'ला श्री. ह. ना. नेने यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेचाही एक चांगली प्रस्तावना म्हणून उल्लेख करावा लागेल. ' ज्ञानेश्वरी 'चे निरनिराळे अध्याय तर आतापर्यंत किती जणांनी संपादित केले याची मोजदादच नाही. राजवाडे, डॉ. हर्षे, मंगळकर व केळकर (९ वा अध्याय) यासारख्या काही लेखकांकडून ' ज्ञानेश्वरी 'ला सखोल प्रस्तावना लाभल्या आहेत. अलीकडे संतकवी, पंडितकवी व महानुभाव कवी यांची काव्ये अभ्यासक्रमात आलटून पालटून लागत असल्यामुळे जी काव्ये लागतात त्या काव्यांना लगेच काही विद्वान आपल्या पूर्वसुरींची मेहनत वापरून शालेय प्रस्तावना लिहितात. अशा काही प्रस्तावनांचा पुढे उल्लेख करतो, डॉ. रा. चिं. ढेरे यांनी नरेंद्राच्या अपूर्ण ' रुक्मिणीस्वयंवरा 'ला व श्रीचक्रधर निरूपित ' श्रीकृष्णचरित्रा 'ला लिहिलेली प्रस्तावना, डॉ. व. वि. पारखे यांनी ' स्मृतिस्थळा 'ला व श्रीचक्रधरनिरूपित ' श्री. च.'ला लिहिलेली प्रस्तावना. प्रा. म. ना. अदवंत व प्रा. भालचंद्र खांडेकर यांना ' ज्ञानेश्वरी 'च्या अनेक अध्यायांना (१२, १५, १६, १७ वगैरे) लिहिलेल्या प्रस्तावना.

काही प्राचीन ग्रंथांच्या निमित्ताने मराठीला सखोल व स्वतंत्र प्रस्तावना लाभल्या आहेत. त्या ग्रंथाच्या रसग्रहणाच्या भानगडीत न पडता त्या काव्यानुषंगाने निर्माण होणाऱ्या काही प्रश्नांवर स्वतंत्र संशोधन व विवेचन या प्रस्तावनांत आहे. इतिहासाचार्य राजवाडे यांनी ' राधामाधव विलासचंपू ' व ' महिकावतीची बखर ' या दोन्ही ग्रंथांच्या प्रस्तावनेत महाराष्ट्राच्या वसाहतीवर व समाजजीवनावर उत्कृष्ट प्रकाश पाडला आहे. ' दमयंतीस्वयंवरा 'च्या प्रस्तावनेत अ. का. प्रियोळकर यांनी, ' विवेकसिंधू 'च्या प्रस्तावनेत कृ. पा. कुळकर्णी यांनी व ' ज्ञानेश्वरी 'च्या बाराव्या अध्यायाच्या प्रस्तावनेत श्री. ना. बनहट्टी यांनी पाठचिकित्सेबद्दल सखोल विवेचन केले आहे. नरेंद्राच्या संपूर्ण ' रुक्मिणी स्वयंवरा 'च्या प्रस्तावनेत डॉ. सुरेश डोळके यांनी प्राचीन ग्रंथांचा कालनिर्णय करण्याकरिता विविध पद्धतींचे दिग्दर्शन केले आहे.

प्राचीन ग्रंथ संशोधणे व एखाद्याच्या कथा-काव्य-लेख संग्रहाला प्रस्तावना लिहिणे या दोन प्रकारांमधलाही एक लहानसा प्रकार प्रस्तावनेचा आहे. एखाद्या व्यक्तीचे हस्तलिखित मिळवून किंवा एखाद्या लेखकाच्या लिखाणातले महत्त्वाचे साहित्यिक वा सामाजिक गुण ओळखून ते पुस्तक प्रकाशित वा पुनर्प्रकाशित करून त्या ग्रंथांना प्रस्तावना लिहिणे हा तो प्रकार होय. कॉ. एस. ए. डांगे यांनी इतिहासाचार्य राजवाडे यांच्या 'भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास' ह्या पुस्तकाला प्रस्तावना लिहून मार्क्स-एंगल्सचा इतिहासविषयक सिद्धांत अचूक असून त्याला खात्रीलायक पुरावा भारतीय शास्त्रांतून मिळू शकतो हे या ग्रंथाच्या निमित्ताने सांगण्याचा प्रयत्न केला. सावरकरांनी जोसेफ मॅझिनीच्या चरित्राला प्रस्तावना लिहून इटालीत ज्याप्रमाणे राज्यक्रांती झाली त्याचप्रमाणे राज्यक्रांती हिंदुस्थानातही झाली पाहिजे हा विचार तत्कालीन तरुणांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न केला. 'प्राचीन गीतभांडारा'ला डॉ. ना. ग. जोशी यांनी प्रस्तावना लिहून संतसाहित्यातील कलागुणांवर प्रकाश पाडण्याचा प्रयत्न केला. 'अप्रकाशित गडकरी'ला प्रस्तावना लिहून आचार्य अत्र्यांनी लेखकाच्या कलानिर्मितीवर मार्मिक प्रकाश पाडला आहे.

प्रस्तावनेचे उद्दिष्ट

प्रस्तावनेचा मुख्य उद्देश लेखकाची स्तुती करणे किंवा कौतुक करणे. प्रस्तावना या शब्दातील धात्वर्थही स्तुती करणे हाच होय, हे वर आलेच आहे. हा उद्देश वर वर्णन केलेल्या प्राचीन काव्याला वा एखाद्याच्या हस्तलिखिताला प्रस्तावना लिहिण्यामागे फारसा नसतो. प्राचीन काव्य संशोधनात त्याला काव्यावर विविध अंगांनी जास्तीत जास्त प्रकाश पाडायचा असतो तर एखाद्याचे हस्तलिखित विशिष्ट हेतूने संपादिले जाते. परंतु एखादा लेखक आपल्या पुस्तकाला जाणीवपूर्वक आपल्यापेक्षा अधिकारी व्यक्तीची प्रस्तावना घेतो त्यावेळी आपल्या पुस्तकाची तरफदारी त्याने वाचकांसमोर करावी हा त्याचा उद्देश असतो. ग्रंथारंभी किंवा ग्रंथाच्या शेवटी पुस्तकाबद्दल इतरत्र आलेले अनुकूल अभिप्राय जोडण्यामागेही हाच उद्देश असतो. लेखक अगदीच नवोदित असेल तर एखाद्या मोठ्या माणसाच्या तोंडून स्वतःचे गुणगान करून घ्यावे हा त्याचा उद्देश असतो. कुसुमाग्रज हे मुळात थोर कवी. परंतु आपल्या सुरुवातीच्या काळात त्यांनी आपल्या 'विशाखा' काव्यसंग्रहास खांडेकरांची प्रस्तावना घेतली होती व कुसुमाग्रजांचा बोलबाला होण्यास खांडेकरांची ही प्रस्तावना प्रामुख्याने कारणीभूत झाली होती. अनेक नामवंत गायक वादक केवळ नाममात्र एखाद्या प्रसिद्ध उस्तादाचा गंडा बांधून त्याला आपला गुरू करतात यापाठीमागे अमक्या मोठ्या कलाकाराचा शिष्य म्हणून लोकांनी आपल्याला ओळखावे ही भावना दडलेली असते; काहीशी तीच भावना प्रस्तावना घेण्यामागे असते. सारांश, आपण लिहिलेल्या पुस्तकाची तारीफ ही त्या क्षेत्रातील एखाद्या विद्वानाच्या लेखणीतून लोकांना कळावी हा प्रस्तावनेचा सामान्यतः प्रधान उद्देश असतो.

प्रस्तावना म्हणजे समीक्षण, रसग्रहण वा परीक्षण नव्हे

समीक्षा म्हणजे साहित्यकृतीचे डोळसपणे केलेले आस्वादयुक्त परिशीलन. एखाद्या वाङ्मय-कृतीतील रस उलगडून दाखविणे, यातील सौंदर्य-स्थळांचे दर्शन घडविणे म्हणजे रसग्रहण. तर काहीशी 'वाङ्मय काक' ही भूमिका घेऊन केलेले कलाकृतीचे मूल्यमापन म्हणजे परीक्षण. व्यवहारात वापरताना आपण या संज्ञा सरधोपट-पणे वापरतो. परंतु त्यांमध्ये असा सूक्ष्म फरक आहे. प्रस्तावनेत त्या तीनही गोष्टी अपेक्षित नाहीत. हे काम समीक्षकाचे, रसग्रहणकर्त्याचे वा परीक्षकाचे आहे. प्रस्तावनाकाराचे काम म्हणजे प्रसंगोचित योग्य निरूपण करून लेखकाचे कौतुक करावे हे आहे. हा उद्देश अर्वाचिन मराठीतील सुरवातीच्या काही पुस्तकांच्या प्रस्तावनांमध्ये योग्य रीतीने साध्य झाल्याचा आढळून येतो. परंतु नंतर नंतर मात्र हा उद्देश मागे पडून त्याला प्राधान्याने वाङ्मयीन टीकेचेच स्वरूप आल्याचे आढळून येते. कोणत्याही वाङ्मयप्रकाराचे एकच एक काटेकोर रूप फार काळ टिकत नाही. कारण

नवीन विचारांच्या प्रतिभावान व विद्वान लोकांकडून त्यात कळत न कळत बदल होऊन त्यांस मान्यता मिळते. तरी देखील प्रस्तावना हा वाङ्मयप्रकार अविकृत स्वरूपात कायम राखणे काही कठीण नाही. मराठीतल्या प्रस्तावना ह्या सामान्यतः परीक्षणात्मक किंवा भलेबुरे समर्थन करण्याऱ्याच असतात. एखाद्या ग्रंथाला प्रस्तावना असली की त्या ग्रंथाचे परीक्षण करण्याचे काम कमालीचे सोपे होऊन जाते. त्याला ग्रंथ व्यवस्थितपणे वाचण्याचीही आवश्यकता रहात नाही. त्यातून प्रस्तावनाकार एखादी बडी आसामी असली तर त्याची मते पटली नसून देखील परीक्षक त्याविरुद्ध बोलायला धजत नाही. असे व्हायला नको म्हणून प्रस्तावनाकाराने आपल्या भूमिकेपासून, आपल्या मूळ उद्देशापासून दूर न जावे हेच उचित आहे.

प्रस्तावनाकाराच्या मर्यादा

प्रस्तावना घेण्यामागचा उद्देश एखाद्या विद्वानाकडून आपली तारीफ करून घ्यावी हा असल्यामुळे प्रस्तावनाकाराला साहजिकच काही मर्यादा पडतात. प्रस्तावनाकार हा त्या विषयाचा सामान्यतः विद्वान असतो. तरीदेखील त्याने आपली विद्वत्ता अमर्याद स्वरूपात व्यक्त करण्याचा मोह टाळला पाहिजे. प्रस्तावना म्हणजे केवळ विद्वत्तेचे प्रदर्शन नव्हे. त्याला संबंधित विषयाबद्दलची विद्वत्ता, विचार एखादा स्वतंत्र लेख लिहूनही दाखविता येऊ शकेल त्यासाठी एखाद्या पुस्तकाची 'प्रस्तावना' हे स्थळ नव्हे. म्हणूनच 'एखादे पुस्तक, जेवढे गाजले त्याहीपेक्षा त्याची प्रस्तावना जास्त गाजली' ह्या बहुचर्चित मुद्यामध्ये प्रस्तावनाकाराच्या विद्वत्तेचा गौरव असला तरी प्रस्तावना या प्रकारचे त्याने पालन केले असे म्हणता येत नाही.

दुसरे असे की, प्रस्तावनेत लेखकाबद्दल प्रतिकूल टीका ही जवळजवळ नसावी. एखाद्या प्रस्तावनाकाराला लेखकाची मते पटली नाहीत, किंवा त्याला त्या ग्रंथात भरपूर दोष आढळले, किंवा प्रस्तावनाकाराच्या दृष्टीने ग्रंथ अतिशय चिल्लर किंवा टाकाऊ असला तर उत्तम मार्ग म्हणजे त्याने प्रस्तावना लिहू नये हाच होय. जे काही प्रतिकूल त्याला लिहावयाचे असेल ते त्याने स्वतंत्र लेख लिहून करावे. त्यासाठीही 'प्रस्तावना' हे स्थळ नव्हे. कारण ग्रंथकार आपल्यापेक्षा विद्वान माणसाची प्रतावना घेतो ते त्याने आपल्या पुस्तकाची रसिकांसमोर भलावण करावी म्हणून! एखाद्या अधिकारी पुरुषाकडून आपल्या पाठीवर शाबासकीची थाप मारून घ्यावी म्हणून! असे न करता प्रस्तावनाकार विद्वान माणसाने त्याला साफ तोंडघशी पाडावे हे योग्य नव्हे. डॉ. वि. स. जोग आपल्या 'मार्क्सवाद आणि मराठी साहित्य' या ग्रंथाला लिहिलेल्या 'निवेदना'त म्हणतात, "माझ्या ग्रंथाला प्रस्तावना देण्याविषयी कॉ. डांगे यांना विचारले असता डांगे म्हणाले, 'तुम्हाला तुमचे पुस्तक खड्ड्यात घालायचे असेल तर माझी प्रस्तावना घ्या?" (पृ. १३) आपण लिहिलेल्या पुस्तकामुळे जर एखादे पुस्तक खड्डयात जाऊ शकते तर त्याला प्रस्तावना लिहू नये. हा डांग्यांचा विचार योग्य नव्हता असे कोण म्हणेल! डॉ. वि. भि. कोलते यांनी डॉ. शं. गो. तुळपुळे यांच्या 'महानुभाव पंथ आणि त्याचे वाङ्मय' या पुस्तकाला प्रस्तावना लिहिली आहे. डॉ. कोलत्यांची ही प्रस्तावना अभ्यासपूर्ण असून महानुभाव वाङ्मय यांच्या अंगी मुरले आहे अशी कोणाचीही खात्री पटते. डॉ. कोलते यांनी डॉ. तुळपुळेंची मान्य नसलेली मते प्रस्तावनेतच यथेच्छ खोडून काढली आहेत. मतभेद एवढ्या तीव्र स्वरूपात व्यक्त करण्याकरिता 'प्रस्तावने'चाच लाभ घ्यावा हेही योग्य नव्हे. कै. बा. सी. मर्ढेकर यांनी श्री. प्रभाकर पाध्ये यांच्या 'कलेची क्षितिजे' या पुस्तकाला पुस्तकातील सामान्यतः दोषदिग्दर्शन करणारी प्रस्तावना लिहिली. परिणाम असा झाला की प्रभाकर पाध्ये यांनी 'मर्ढेकरांची सौंदर्यमीमांसा' हा ग्रंथच लिहिला व त्यात मर्ढेकरांची सौंदर्यमीमांसा अमान्य केली. मर्ढेकरांच्या भूमिकेतील विसंगती, त्यांच्या भूमिकेला आधार असलेले पाश्चात्य विचारवंत वगैरेंचे दर्शन त्यांनी आपल्या ग्रंथातून घडविले. प्रतिकूल प्रस्तावनेचा असाही परिणाम होतो. सारांश, प्रस्तावनेचा आडोसा घेऊन

लेखकावर सडकून टीका करावी हा प्रकार प्रस्तावनेचे शास्त्रीय स्वरूप ठरविताना आक्षेपार्ह ठरावा.

याचा अर्थ प्रस्तावना अतिशय कृत्रिम, लेखकात नसलेले गुण चिकटवणारी, भीडेखातर गुळमुळीत व स्तुतीवजा अशीही नको. भीडेमुळे कृत्रिम व स्तुतीवजा लिहिलेल्या प्रस्तावनांची उदारणेही मराठीत काही कमी नाहीत. अशाही वेळी प्रस्तावनाकाराने आपली भीड आवरून प्रस्तावना न लिहिलेलीच बरी ! कारण एखाद्या भिकार पुस्तकाला भिडेखातर स्तुतीपूर्ण प्रस्तावना लिहिली तर ती एखाद्या पुस्तकाची स्तुती तर होतच नाही, मात्र प्रस्तावनाकाराचेच हसे होण्याचा संभव असतो.

प्रस्तावना कशी असावी ?

तर मग उत्कृष्ट प्रस्तावना कशी असावी ? प्रस्तावनेत लेखकाबद्दल थोडी माहिती, ज्या विषयावर तो ग्रंथ असेल त्या विषयाचे अल्प दर्शन, ग्रंथात त्या विषयाला कसा न्याय दिला आहे अथवा ग्रंथविषयाच्या संदर्भात लेखकाने कोणती लक्षणीय वा वैशिष्ट्यपूर्ण भर टाकली आहे त्याचे विवेचन आणि समारोप असे चार मुद्दे तरी आलेच पाहिजेत. आणि हे चारही मुद्दे अतिशय आटोपशीर व प्रमाणबद्ध असावयास पाहिजेत. प्रस्तावनेचा ४०-५० टक्के भाग केवळ लेखकाच्या परिचयानेच व्यापला असणेही योग्य नाही. त्या चार मुद्यातून प्रस्तावनाकाराचे व्यक्तिमत्त्व उत्कृष्ट रीतीने प्रत्ययास येऊ शकते. लेखकाचा परिचय घडविताना प्रस्तावनाकाराचे व्यक्तिचित्रणाचे कसब त्या विषयाचे दर्शन घडविताना त्याचे ज्ञान, लेखकाच्या पुस्तकाचे महत्त्व सांगताना त्याची मार्मिकता इ. गुण यथार्थ स्वरूपात प्रगट होऊ शकतात. प्रस्तावना हा एक वाङ्मयप्रकार आहे तोही याच अर्थाने.

अशा प्रकारच्या प्रस्तावनेशी जवळजवळ मिळतेजुळते उदाहरण म्हणून डॉ. द. भि. कुळकर्णी यांनी डॉ. वि. स. जोग यांच्या 'मार्क्सवाद आणि मराठी साहित्य' या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेकडे अंगुलीनिर्देश करता येईल. या प्रस्तावनेतून दभिनी जोगांचे व्यक्तिमत्त्व, विषयाच्या संदर्भात डॉ. जोगांनी घातलेली लक्षणीय भर आणि समारोपातून डॉ. जोगांमधले असलेले सामर्थ्य ओळखून त्यांना दिलेला सल्ला इ. मुद्दे अतिशय आटोपशीरपणे व्यक्त झालेले आहेत. मात्र 'मार्क्सवाद आणि मराठी साहित्य' याचे अल्पदर्शन मात्र दभिनी पाहिजे तसे रंगविले नाही. आणखी एक उदाहरण डॉ. शं. दा. पेंडसे यांनी डॉ. वि. भि कोलते यांच्या 'महानुभाव संशोधन १' ह्या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेचे देता येईल. त्या प्रस्तावनेतून डॉ. पेंडसे यांनी डॉ. कोलते यांचे मेहनती व्यक्तिमत्व, महानुभाव ग्रंथ व वाङ्मयसंशोधनाचे त्यावेळेपर्यंतचे अल्प दर्शन इ. उत्कृष्ट पद्धतीने घडविले आहे.

मराठीत न. चिं. केळकर, वा. म. जोशी, आचार्य अत्रे, ग. त्र्यं. माडखोलकर, डॉ. वि. भि. कोलते, पु. ल. देशपांडे, नरहर कुरुंदकर वगैरेंनी अनेक प्रस्तावना लिहिल्या आहेत व त्यातून त्या त्या प्रस्तावनाकाराचे व्यक्तिमत्त्व उत्कृष्ट रीतीने प्रत्ययास येते. न. चिं. केळकर यांच्या प्रस्तावनांतून त्यांची रसिकता, समतोलपणा, बहुश्रुतता प्रत्ययास येते. वा. म. जोशी यांचे 'विचारसौंदर्य' त्यांच्या प्रस्तावनांतून प्रगट होते. डॉ. कोलते यांच्या प्रस्तावनांतून त्यांनी ग्रंथ अतिशय सूक्ष्मतेने वाचला असून प्रस्तावना लिहिण्यासाठी आवश्यक असलेला अभ्यास करण्याची तयारी दिसून येते. पु. ल. देशपांडे यांच्या प्रस्तावनांतून त्यांची मर्मग्राही अभिजात रसिकता दिसून येते. नरहर कुरुंदकर यांच्या प्रस्तावना वाचून असे वाटते की हे ग्रंथ वरवर वाचत असून त्यातलेच विचार अशा काही ठाम वाक्यातून व आवेशात प्रगट करतात की सर्वसामान्य वाचकाला त्याने खूप मूलगामी लिहिले आहे असे वाटते. त्या सर्व विद्वानांच्या प्रस्तावनांमधून त्यांची विद्वत्ता, रसिकता, विचारप्रवर्तकता, संशोधनात्मक दृष्टी वगैरे प्रगट होते यात संशय नाही. परंतु प्रस्तावनेच्या शास्त्रीय कसोटीला मात्र फार कमी प्रस्तावना उतरतील असे वाटते.

समारोप

असो येथपर्यंत प्रस्तावना ह्या वाङ्मयप्रकाराचे जे वेडेवाकडे दिग्दर्शन केले व जी मते नोंदविली ती माझी वैयक्तिक असून माझ्या अल्पबुद्धीतून व चिंतनातून व्यक्त झाली आहेत. त्यामुळे ती निर्णायक खासच नसून चर्चेला, मतभेदांना यात भरपूर वाव आहे. मराठी साहित्यात विचार गांभीर्याने नटलेल्या व आस्वाद-समीक्षा ही भूमिका घेऊन लिहिलेल्या अनेक मौलिक प्रस्तावना असून मराठी साहित्याचे ते एक गौरवशाली अंग आहे यात संशय नाही. तरीपण एक कलाप्रकार म्हणून प्रस्तावनेचा विचार मराठीत फारसा झाला नाही. तो करावा हाच या लेखाचा उद्देश होय. मराठीतील सुरुवातीपासूनच्या पुस्तकांची व त्यांच्या प्रस्तावनांची माहिती आहे असे डॉ. सुरेश डोळके, डॉ. द. भि. कुळकर्णी यांसारखे मुरब्बी संशोधक-समीक्षक पुढे येऊन त्यांनी प्रस्तावना ह्या वाङ्मयप्रकाराचा कलादृष्टीतून विचार केला तर प्रस्तावनेचे स्वरूप मराठी साहित्यात दृढ व्हावयास वेळ लागणार नाही. ■

बँक ऑफ महाराष्ट्र
लोहारा शाखा, एम.ई.एल.
चंद्रपूर-४४२४०२

लेखकांसाठी सूचना

१. मजकूर कागदाच्या एका बाजूने लिहिलेला व सुवाच्य असावा.

२. पुरेसे पोस्टेज नसलेले लेखन परत केले जाणार नाही. स्थळप्रत ठेवावी, नाहीतर पुरेसे पोस्टेज पाठवावे.

३. कवितेची पोच दिली जात नाही. निर्णयही दिला जाणार नाही. तीन अंकापर्यंत कविता न आल्यास ती अस्वीकृत आहे असे समजावे. कवितेसंबंधी कुठलाही पत्रव्यवहार करणे शक्य होणार नाही.

४. अनाहूत लेख, कथा, ललित वा वैचारिक निबंध ह्याबाबत निर्णय हवा असल्यास पत्ता लिहिलेले एक पोस्ट कार्ड पाठवावे. गद्याबाबत निर्णय कळवल्यानंतरही, तावडतोब प्रसिद्ध होईलच असे नाही. यथावकाश प्रसिद्ध होईल.

५. अनाहूत समीक्षणे प्रसिद्ध होणार नाहीत. 'युगवाणी' कडून मागवली गेलेली समीक्षणेच प्रसिद्ध होतात.

६. 'युगवाणी' साहित्यप्रेमाला, साहित्याला मोकळी वाट देते. पण ते साहित्य अभिरुची संपन्न असावे.

कनिष्ठ महाविद्यालयातील मराठीच्या अध्यापनातील अडचणी

प्रा. सुनंदा देशपांडे

शिक्षणाच्या तीन अवस्था गृहीत धरल्या जातात. प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च. या शिक्षण-प्रक्रियेमधल्या तीन प्रमुख पायऱ्या आहेत. कनिष्ठ महाविद्यालयात पदार्पण करणाऱ्या विद्यार्थ्याने यापैकी पहिल्या दोन प्रक्रिया पूर्ण केलेल्या असतात. आणि आता उच्च शिक्षणाकडे त्याची वाटचाल सुरू झालेली असते. त्याचे किशोरवय संपून त्याने आता तारुण्यात पदार्पण केलेले असते. वयाच्या या परिवर्तनासोबतच आता त्याच्या बौद्धिक पातळीकडे बघण्याचा दृष्टिकोनही बदलला असतो. या अवस्थेतील विद्यार्थ्यांच्या अध्यापकांवरील जबाबदारी शालेय अध्यापकाच्या तुलनेत बरीच कमी झालेली असते. अभ्यासक्रमातील मुद्यांची तोंडओळख करून देणे, महत्त्वाच्या व मूलभूत तत्त्वांचे विवेचन करणे, संदर्भ ग्रंथांची माहिती देणे, विद्यार्थ्यांना अभ्यासाची दिशा दाखवून देणे ही महाविद्यालयीन अध्यापकाची जबाबदारी असते.

इथे आपल्याला विशेषत्वाने कनिष्ठ महाविद्यालयातील मराठीच्या अध्यपनाविषयीचा ऊहापोह करायचा आहे. शालेय जीवनात विद्यार्थ्यांना करण्यात आलेले मराठी विषयाचे अध्यापन आणि आता महाविद्यालयात पदार्पण केल्यानंतर त्यांना करण्यात येणारे मराठीचे अध्यापन या दोहोत निश्चितपणेच फरक आहे. या विद्यार्थ्यांकडे आता महाविद्यालयीन विद्यार्थी म्हणून बघण्याचा अध्यापकाचा दृष्टिकोन असल्याने त्यांच्या अध्यापनाच्या दर्जातही शालेय-अध्यापनाच्या तुलनेत फरक पडतो.

पण हा फरक विद्यार्थ्यांच्या कितपत पचनी कितपत पडतो, हा प्रश्नच आहे. मराठी भाषा ही आपली मातृभाषा असणारे बहुतांश विद्यार्थीच मराठी विषय घेतात. असे असूनही बहुसंख्य विद्यार्थ्यांचा मराठी भाषेचा दर्जा अतिशय निकृष्ठ असतो. अध्यापकांचे मराठीच्या तासातले व्याख्यान त्यामुळेच काही विद्यार्थ्यांच्या डोक्यावरून जाते. शालेय जीवनात मराठी या विषयाचा अभ्यास कसा करावा याचे नीट आकलन ज्यांना झालेले नसते असे बहुतांश विद्यार्थी घोकंपट्टीच्या माध्यमातून मराठीचा अभ्यास करून पास झालेले असतात. असे विद्यार्थी जेव्हा महाविद्यालयात येतात, तेव्हा त्यांना आपल्या मनाने चार ओळीचे उत्तर देता येत नाही. आपल्या अध्यापनाला विद्यार्थ्यांचा कितपत प्रतिसाद मिळतो हे आजमावण्यासाठी या विद्यार्थ्यांना शिकवीत असलेल्या भागावर प्रश्न विचारलेत तर काही विद्यार्थी येत नाही म्हणून मख्खासारखे उभे राहतात, काही सांगण्याचा प्रयत्न करतात पण त्यांना जे सांगायचे आहे ते घडपणे सांगताच येत नाही, असा अनुभव येतो. ही परिस्थिती निश्चितच गंभीर आहे, यामुळे अध्यापकांच्या मनात स्वतःच्या अध्यापनाबद्दलच शंका उत्पन्न होऊ शकते. आपल्या अध्यापनाबद्दलच अध्यापकाच्या मनात अविश्वास निर्माण होऊ लागला तर ही बाब मराठीच्या अध्यापनासाठी फार अडचणीची ठरू शकते.

मराठीचा (एंजॉयमेंटचा) तास

कनिष्ठ महाविद्यालयास मराठी हा भाषा विषय कला, वाणिज्य, विज्ञान, गृहविज्ञान अशा सर्वच शाखांना ऐच्छिक विषय असतो. याबाबतीत असा अनुभव येतो की विज्ञान आणि गृहविज्ञान

या शाखेच्या विद्यार्थ्यांना विज्ञान विषयाच्या तुलनेत मराठी हा विषय फारच गौण वाटतो. पुढे पदवी महाविद्यालयात बी. एस्सी. (सायन्स होम सा.) च्या विद्यार्थ्यांना मराठी नसतेच. कला आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनाही आपल्या इतर विषयाच्या तुलनेत तसा तो विषय गौणच वाटतो. पण त्यांच्या तुलनेत विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांमध्ये ही जाणीव अधिक तीव्र स्वरूपात जाणवते. मराठी ह्या विषयाचे महत्त्वच वाटत नसल्याने या विषयाबद्दलची एक प्रकारची उदासीनताही त्यांच्यात जाणवते. मराठीच्या तासाला मराठीचे पाठ्यपुस्तक बहुतेक विद्यार्थ्यांनी आणलेलीच नसतात. मग एक किंवा दोन डेस्कवरच विद्यार्थ्यांमिळून एखादं पाठ्यपुस्तक दिसतं. मराठीचा अध्यापक शिकवत असताना विद्यार्थ्यांचे पाठ्यपुस्तकाकडे आणि त्यानुषंगाने शिकविणाऱ्या अध्यापकाकडेही तितकेसे लक्ष नसते विज्ञान विषयाच्या तुलनेत त्यांना मराठीचा तास हा काहीसा 'एन्जॉयमेंट' स्वरूपाचा किंवा 'रिलॅक्सेशन'चा वाटत असावा, असे त्यांच्या एकंदरीत वागणुकीतून मराठीच्या अध्यापकाला जाणवल्याशिवाय राहत नाही. हा अनुभव कनिष्ठ महाविद्यालयातील मराठीच्या अध्यापनातली एक मोठी अडचण आहे.

कला आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या बाबतीत ला अनुभवही तसा फारसा दिलासा देणारा आहे, असे म्हणता येणार नाही. मराठी या विषयाचे महत्त्व इतर विषयांच्या तुलनेत त्यांच्या मते गौण ठरल्यामुळे या विषयाकडे पाहिले पाहिजे त्या गांभीर्याने हे विद्यार्थी पाहताना दिसत नाहीत, त्यामुळे मराठीच्या तासात अध्यापकाच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करणे, 'मराठी काय आपली मातृभाषाच आहे', अशा समजुतीमुळे मराठी आपल्या हातचा मळ समजणे या गोष्टी ओघानेच येतातच. या विषयाकडे विद्यार्थ्यांच्या अशा उपेक्षेच्या दृष्टीमुळे अध्यापनावरही त्याचा विपरीत परिणाम झाल्याशिवाय राहत नाही. विद्यार्थ्यांनाच काही नाही तर आपण कशाला जीव तोडा असा विचार कनिष्ठ महाविद्यालयाच्या अध्यापकांच्या मनात येणे अशक्य नाही.

मराठीचे महत्त्वच नाही

कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी म्हणजे अकरावी, बारावीतील विद्यार्थी. हे नुकतेच शाळेतून महाविद्यालयात आलेले असतात. शाळेत अध्यापकाच्या त्या तासाच्या नोटस् देणे हा प्रकार बहुधा नसतो. कारण शाळांमध्ये 'डिक्टेट' करण्याचीच पद्धत बहुधा अवलंबिली जाते. त्यामुळे मराठीच्या अध्यापकाची बहुश्रुतता इथे कुचकामी ठरण्याची शक्यता अधिक असते. पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त अवांतर, जास्तीचे सांगणाऱ्या अध्यापकाचे बोलणे विद्यार्थ्यांच्या नोटस् न काढल्यामुळे त्यांच्या नुसते कानावरून जाते. बरे, नोटस् नाही तर नाही लक्ष देऊन ऐकल्यास तेही विद्यार्थ्यांच्या लक्षात राहू शकते. पण वर उल्लेख केल्याप्रमाणे विषयाचे महत्त्वच विद्यार्थ्यांच्या ध्यानी नसल्याने शेवटी पालथ्या घड्यावर पाणी अशी स्थिती होते. कनिष्ठ महाविद्यालयातील मराठी विषयाच्या अध्यापनासंबंधात ही बाबही लक्षात घेण्यासारखी आहे.

आज 'गाईड संस्कृतीने' चांगलेच बाळसे धरले आहे. प्रत्येक विषयाच्या विविध प्रकाशनांच्या गाईडस् विद्यार्थ्यांना सहजगत्या उपलब्ध आहेत. आज सगळं काही विद्यार्थ्यांना 'रेडिमेड' मिळतं. मराठीच्या अध्यापनावर या गाईड संस्कृतीचा विपरीत परिणाम होणं अपरिहार्य आहे. कारण विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला वाव देणे आणि भाषिकदृष्ट्या विद्यार्थ्याला सृजनशील बनविणे हे विशेषत: कनिष्ठ महाविद्यालयातील अध्यापकांसमोरचे आव्हान असते. पण गाईडमुळे या विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती आणि सृजनशक्ती दोन्ही मारल्या जातात. विद्यार्थ्यांना गाईडमधून 'रेडिमेड' मिळत असताना पिरेड केला काय किंवा न केला काय त्यांना काही फरक नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या वर्गातल्या उपस्थितीवरही निश्चितपणे परिणाम होऊन मराठीच्या अध्यापनावरही त्याचे सावट पडल्याशिवाय राहत नाही.

कनिष्ठ महाविद्यालयातील मराठी विषयासाठी 'युवकभारती' हे एकच पुस्तक नेमले आहे. यात गद्य-पद्य आणि स्थूल वाचन असे तीन विभाग केलेले आहेत. वर उल्लेखिल्याप्रमाणे मराठीचा अध्यापक बहुश्रुत असल्यास पाठ्य पुस्तकातील पाठाच्या किंवा कवितेच्या संदर्भात बरीच अवांतर माहिती सांगू शकतो आणि विद्यार्थ्यांच्या सामान्य ज्ञानात भर घालण्याच्या दृष्टीने तशी ती आवश्यकही असते. पण ठराविक कोर्स ठराविक काळात पूर्ण करण्याचे बंधन अध्यापकावर असल्याने (कारण नेमलेल्या पाठ्य पुस्तकांशिवाय निबंध, व्याकरण वगैरे भाग अभ्यासक्रमात पूर्ण करायचा असतो.) पाठपुस्तकाव्यतिरिक्त अवांतर काही सांगणे मराठीच्या अध्यापकाला शक्य होत नाही. बहुतांश विद्यार्थ्यांची दृष्टी तर फक्त नेमून दिलेल्या कोर्सपुरतीच मर्यादित असते. कारण परिक्षेत उत्तीर्ण होणे एवढेच उद्दिष्ट त्यांच्या डोळ्यासमोर असल्याने विद्यार्थी आपली दृष्टी पाठ्यपुस्तकातील नेमून दिलेल्या अभ्यासाव्यतिरिक्त त्याच संदर्भात जास्तीचे काही वाचण्याच्या किंवा आत्मसात करण्याच्या खटाटोपात पडत नाहीत. या संदर्भात प्रसिद्ध साहित्यिक पु. ल. देशपांडे यांनी काढलेले उद्‌गार आठवतात. 'आपल्या ज्ञानाचा स्पॅन दिवसेंदिवस कमी होत चालला आहे'. हे विधान मराठीच्या अभ्यासकालाही तंतोतंत लागू पडते. मराठी विषयाच्या विद्यार्थ्यांसंबंधी आलेला अनुभवही त्यांनी इथे सांगितला आहे. ते म्हणतात, विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तकातील जेवढा भाग परीक्षेसाठी नेमला असेल त्यातूनही विद्यार्थी आपआपल्या सोयीने विचार करतात. मी एकदा विद्यार्थ्याला विचारले, 'तुम्हाला अभ्यासाला ज्ञानेश्वर आहेत का?' तेव्हा त्याने उत्तर दिले, 'हो' दहा मार्कांचे' हा संवाद इथे देण्याचे कारण हे की अकरावीला नेमलेल्या 'युवकभारती' या मराठीच्या पाठ्य-पुस्तकातच पु. लं. चा हा लेख समाविष्ट केला आहे. यातून सांगायचे एवढेच की ज्या साहित्यिकाची एखादी कलाकृती विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकाद्वारे नेमली असेल, त्याच्या पलिकडे डोकावून पाहण्याची आवश्यकताच मराठीच्या विद्यार्थ्यांना वाटत नाही. त्यातूनही एखाद्या उत्साही अध्यापकाने ही चौकट मोडण्याचा प्रयत्न केलाच तर विद्यार्थ्यांकडून त्याला अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. आणि दुसऱ्या बाजूने ठराविक काळात कोर्स पूर्ण करण्याची मर्यादा पडते, अशा पेचात आज कनिष्ठ महाविद्यालयाचा मराठीचा अध्यापक सापडला आहे.

इंग्रजीची पखरण

कनिष्ठ महाविद्यालयातील मराठीच्या अध्यापनात वरील बाबींबरोबर आणखी एका बाबींचा उल्लेख करावा लागेल, तो म्हणजे 'इंग्लिश मिडियम' घेणारे विद्यार्थी. मराठी आपली मातृभाषा म्हणून मराठी विषय ते घेतात. पण परीक्षेच्या दृष्टीने आपल्याला मराठी जमेल की नाही या भीतीने त्यांची मनं दडपलेली असतात. मराठी माध्यम घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जसा इंग्रजी विषयाचा बाऊ वाटतो, त्यांना इंग्रजी वाक्यरचना करताना ज्या अडचणी येतात, तसाच बाऊ आणि अडचणी मराठीच्या बाबतीत इंग्रजी माध्यम घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वाटतो. त्यांना मराठीची वाक्यरचना घडपणे करता येत नाही. मराठी शब्द न सुचल्यामुळे इंग्रजी शब्दांची पखरण त्यांच्या लिखाणात त्यांनी भरपूर केलेली असते. असे विद्यार्थी कनिष्ठ महाविद्यालयाच्या मराठी अध्यापकांसमोर एक आव्हानच असतात.

अशुद्ध बोलणाऱ्या, अशुद्ध लिहिणाऱ्या विद्यार्थ्यांची तर वाणच नसते. मराठीच्या शुद्ध-लेखनाच्या नियमांत वारंवार घडून येणाऱ्या बदलांनी शुद्ध लेखनाच्या क्षेत्रात एक प्रकारची अनिश्चितता निर्माण झाली आहे. या संदर्भात मराठीच्या अध्यापकांच्याच संकल्पना कधी कधी निश्चित नसतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या बाबतीत विचारायलाच नको. पण जिथे 'ण' ऐवजी 'न' लिहिण्यात आणि उच्चारातही येतो, तेव्हा इतका ढोबळ प्रमादही विद्यार्थी दूर करू शकत नाहीत याचा मराठीच्या अध्यापकाला विषाद वाटल्याशिवाय राहत नाही.

बारावीत तर 'क्लासेस 'मुळेच दुर्लक्ष

कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी शाळेतून नुकतेच महाविद्यालयात आलेले असतात. शाळेत नियमित उपस्थित राहण्याची सक्ती त्यांना असते. पण महाविद्यालयांत ती शिथिल होते. त्यामुळे अकरावीच्या विद्यार्थ्यांची उपस्थिती वर्गात उत्साहवर्धक असली तरी बारावीच्या विद्यार्थ्यांची उपस्थिती मात्र कमी असते. यातही बारावीच्या विद्यार्थ्यांची पहिल्या सत्राची उपस्थिती जरा बरी पण दुसऱ्या सत्रातली उपस्थिती अतिशय शोचनीय असते. उपस्थितीच्या बाबतीत शाळेइतकी कठोर शिस्त महाविद्यालयांत नसल्याने तसेच बारावीला सगळ्या विषयांचे बाहेर 'क्लासेस' लावल्याने त्याचा वर्गातील विद्यार्थ्यांच्या उपस्थितीवर निश्चितपणेच परिणाम होतो. अर्ध्यापेक्षाही कमी उपस्थिती असलेल्या वर्गाला मराठीच्या अध्यापकाला शिकवतांना नाही म्हटले तरी विषाद वाटतोच. अध्यापनातला त्याचा अर्धा उत्साह अर्धा वर्ग रिकामा पाहून खलास होतो नि अर्धा उपस्थितांच्या अनास्थेने खलास होतो. एकंदरीत मराठी ह्या विषयाची समाजात, विद्यार्थ्यांत असलेली उपेक्षा आणि त्यातून उद्भवलेली अनास्था या दोहोंचा संयुक्त परिणाम म्हणून कनिष्ठ महाविद्यालयातील मराठीच्या अध्यापकांतही अध्यापनाबद्दलची उदासीनता अशा दुष्टचक्राने या विषयाला ग्रासण्याची शक्यता आहे.

मराठीच्या अध्यापनात कनिष्ठ महाविद्यालयातील मराठीच्या अध्यापकांना येणाऱ्या अडचणींच्या संदर्भात विद्यार्थ्यांच्या बाबतीतला विचार, ही एक बाजू झाली. आता क्रमिक किंवा पाठ्यपुस्तक म्हणून 'युवकभारती' हे अकरावी बारावीच्या मराठी विषयाला नेमले आहे. या पुस्तकासंबंधीही विचार करायला हवा.

प्राध्यापकी व्यवसाय नव्हे, वृत्ती समजावी

कनिष्ठ महाविद्यालयांत मराठीचे अध्यापन करणाऱ्या अध्यापकांवर या वयोगटातील विद्यार्थ्यांमध्ये मराठी या विषयाची गोडी लावण्याची एक महत्त्वाची जबाबदारी असते. कनिष्ठ महाविद्यालयांत जर विद्यार्थ्यांना मराठीची गोडी लागली तरच ते पुढे पदवी महाविद्यालयांत मराठी विषय घेतील. ज्यांना कनिष्ठ महाविद्यालयांत या विषयाची गोडी लागत नाही ते विद्यार्थी पदवी अभ्यासक्रमात मराठी हा विषय अजिबात सोडून तरी देतात, किंवा मराठी वाङ्मय (Literature) या विषयाच्या वाटेला तरी जात नाहीत. तेव्हा कनिष्ठ महाविद्यालयातील मराठीच्या अध्यापकाला ही जाणीव ठेवूनच मराठीचे अध्यापन करावे लागते. कारण नवीन पिढीची जीवनदृष्टी घडविण्याचे अतिशय जिव्हाळ्याचे काम मराठी भाषा व साहित्य यांच्या अध्यापकाला जेवढ्या सहजपणे करता येते, तेवढे ते अन्य विषयांच्या प्राध्यापकांना करता येत नाही. या वयोगटातील विद्यार्थ्यांच्या भावनांना आवाहन करण्याची, त्यांची विचारशक्ती जागृत करण्याची व त्यांना अंतर्मुख करून त्यांच्या विचारांना इष्ट दिशा देण्याची महत्त्वाची जबाबदारी कनिष्ठ महाविद्यालयातील मराठीच्या प्राध्यापकावर असल्याने त्याच्या बाबतीत तरी त्याने प्राध्यापकी हा निव्वळ व्यवसाय न मानता वृत्ती मानायला हवी. या दृष्टीने त्यांना अभ्यासक्रमात नेमलेले पाठ्यपुस्तक फार महत्त्वाचे ठरते. या पाठ्यपुस्तकांद्वारे विद्यार्थ्यांना साहित्यिकांच्या विविध साहित्य प्रकारांची ओळख करून देणे हा असतो. अकरावीच्या विद्यार्थ्यांना या दृष्टीने गद्य, पद्य आणि स्थूल विभागात आत्मचरित्र या वाङ्मयप्रकारांची ओळख करून देण्यात आली आहे, तर बारावीच्या पाठ्यपुस्तकातील स्थूलवाचन विभागातून विनोदी वाङ्मयप्रकाराची ओळख विद्यार्थ्यांना करून देण्यात आली आहे. गद्यविभागात व्यक्तिचित्रणात्मक लेखांबरोबरच वैचारिक लेखांचाही समावेश आहे, हे योग्यच आहे. पण शाळेतून नकत्याच महाविद्यालयात आलेल्या अकरावीच्या विद्यार्थ्यांना नेमलेले 'फौज भागीरथीस पार

गेली', 'इष्ट असेल तर ते बोलणार व साध्य असेल ते करणार', 'कोलंबो दर्शन' यासारखे वैचारिक वा भाषिकदृष्ट्या अतिशय क्लिष्ट धडे कितपत पचनी पडतात हा प्रश्नच आहे.

पाठ्यपुस्तकातील धड्या-कवितांमध्ये ज्या लेखकांचे लेख किंवा कविता नेमल्या असतील ते लेख आणि कविता त्या त्या लेखक-कवींचे प्रतिनिधित्व करणाऱ्या असाव्यात अशी किमान अपेक्षा असते. म्हणजे त्या त्या लेखावरून वा कवितेवरून त्या त्या लेखक-कवींच्या लेखनशैलीचे व्यवच्छेदक मर्म विद्यार्थ्यांच्या ध्यानी यायला पाहिजे. जसे गोविंदाग्रज म्हटले की त्यांच्या प्रेमाच्या कविता आपल्या डोळ्यांसमोर येतात. प्रेमाचे शाहीर म्हणून गौरविल्या जाणाऱ्या या कवीच्या प्रेमकविता हेच व्यवच्छेदक मर्म आहे तेव्हा वाराबीच्या युवकभारतीतून त्यांची प्रेमविषयक कविता न नेमता 'चितातून जंतू' ही उपरोधात्मक कविता नेमण्यात कोणते औचित्य अभ्यास मंडळाने साधले आहे हे कळत नाही.

उपयुक्त सूचना

नागपूर येथे मार्च ९१ मध्ये झालेल्या कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी प्राध्यापक परिषदेच्या सातव्या अधिवेशनात या प्रश्नांना बऱ्याच अनुभवी प्राध्यापक मंडळींनी बोलके केले होते. तसेच ग्रामीण भागातील कनिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी ग्रामीण जीवनांशी, भाषेशी निगडीत असा अभ्यासक्रम नेमण्यात आला पाहिजे असा सूरही तिथेकांनी लावला. शहरी विद्यार्थ्यांच्या जीवनाशी निगडीत असलेला मराठीचा अभ्यासक्रम ग्रामीण परिसरातील वेगळ्या जीवनसरणीशी सर्वथा विसंगत असेल तर त्याचा या विद्यार्थ्यांना काही एक उपयोग होणार नाही. उलट या अभ्यासक्रमापासून हे विद्यार्थी तुटून वेगळे पडण्याचीच शक्यता असल्याची जाणीव अनेक अनुभवी प्राध्यापकांनी व्यक्त केली ही बाबही कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषयाच्या संदर्भात आपल्याला अंतर्मुख करणारी आहे.

कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी प्राध्यापक परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक प्रा. वसंत वऱ्हाडपांडे यांनी तेव्हा काढलेले उद्गार बरेच काही सांगून जातात. ते आपल्या उद्घाटनपर भाषणात म्हणाले होते-'आपल्याकडे येणारा प्रत्येक विद्यार्थी आपली जन्मार्जित अशी बोलभाषा सोबत घेऊन येतो. त्याच्या जिव्हाग्रावर व मनावर त्याच्या बोलीचा खोल संस्कार झालेला असतो. हा संस्कार बरेचदा आपण स्वीकारलेल्या प्रमाण भाषेच्या आक्रमणाला अनुकूल असा नसतो. किंबहुना प्रतिकूलच असतो. विशेषत: गेल्या काही वर्षात आदिवासी आणि ग्रामीण क्षेत्रात जी महाविद्यालये निघाली आहेत, त्या महाविद्यालयांतून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संदर्भात तर ही वस्तुस्थिती अधिकच तीव्रतेने जाणवते....केवळ नेमलेल्या पाठ्यपुस्तकांचा आशयनिष्ठ अभ्यास केल्याने हा नव्याने शिक्षणाभिमुख झालेला समाज पुरेसा शिष्टभाषाभिज्ञ होऊ शकेल काय ?'

उद्घाटक म्हणून प्रा. वसंत वऱ्हाडपांडे यांनी तेव्हा उपस्थित केलेले हे प्रश्न डावलून केलेला कनिष्ठ महाविद्यालयातील मराठीच्या अध्यापनाचा विचार एकांगी ठरेल, किंबहुना ती जाणून-बूजून केलेली डोळेझाक होईल. म्हणूनच कनिष्ठ महाविद्यालयाच्या अध्यापनात मराठी विषयाचे पाठ्यपुस्तक नेमताना अभ्यासमंडळाने या सर्व बाबींचा विचार करणे अपरिहार्य ठरते.

कनिष्ठ महाविद्यालयातील मराठीच्या अध्यापनातल्या या सर्व अडचणींचा सांगोपांग विचार करण्याची वेळ आज निश्चित येऊन ठेपली आहे. ■

विदर्भातील स्मारकस्तंभ !

श्रीपाद केशव चितळे

युगवाणीच्या काही अंकातून माझ्या पुरावशेषांच्या तालिका प्रकाशित होताच त्या माहितीचा भरपूर उपयोग संशोधक, अभ्यासक, पर्यटक; कलासमीक्षकांना झालेला दिसतो, मी विदर्भात ज्या अनेक शैलाश्रयांची माहिती दिली, तेथे आता धाडसी तरुण जाऊन आपली धाडसाची हौस पूर्ण करतात, प्रतिमांच्या (मूर्ती) याद्या कलासमीक्षकांना आकर्षित करीत आहेत, तर प्राचीन मंदिरेही साप्ताहिक सुटीतील लघुपर्यटन स्थळेही ठरत आहेत. (युगवाणी अंक : ए./मे/जू. ९०, स./आ./नो. ९१, मे/जून ९२)

या वेळेस विदर्भातील काही स्मारक स्तंभाची माहिती देत आहे.

त्यात आपल्या सांस्कृतिक, सामाजिक व पारंपरिक इतिहासाचे प्रतिबिंब तर आपणास दिसेलच; पण त्यातून अशा पुरावशेषांबद्दल जिव्हाळा व आत्मीयताही वाढेल.

विदर्भातील अनेक प्राचीन-मध्ययुगीन स्थळाजवळ काही स्तंभ व्यवस्थित ठेवलेले किंवा विखुरलेले आढळतात. त्यावर काही कोरलेले असते, चंद्र-सूर्य असतात. कुठे पादुका असतात, तर कुठे घोडेस्वार कोरस असे असतो. स्तंभ जपून ठेवणेही त्या त्या ठिकाणच्या मंडळींना डोकेदुखी ठरते. पण ही आपली सांस्कृतिक संपदा असल्याने त्याचे जतन करणे आवश्यकच आहे.


अशा सुटचा सुटचा आढळणाऱ्या स्तंभात वीरगळ (वीर योध्याचे स्मारक), सतीस्तंभ (सती गेलेल्या स्त्रीचे स्मारक), गोरक्ष स्मारक किंवा गोवर्धन (गाईचे संरक्षण करताना आलेल्या मृताचे स्मारक), धर्माज्ञास्तंभ (धर्माचे पालन करून आचरणाचे आदेश), स्मृतीस्तंभ (कुण्या साधू-संन्याशाची स्मृती); गधीगाळ (धर्माज्ञास्तंभ); पथदर्शक स्तंभ (दिशा दाखविणारा दिशादर्शक). ह्या शिवाय वृंदावन, मखर, मूर्ती, वापी, द्वार, पायऱ्या, नदीघाट, दीपमाळ, धरण, पुष्करिणी, रंगशिळा, गणेशपट्टी, वेशी, बुरुज, घंटा अशा अनेक स्वरूपात हे अवशेष असतात. पण मुख्यत्वेकरून वीरगळ, सतीस्तंभ, गोरक्षा, स्मृती, धर्माज्ञा स्तंभ हे ५ प्रमुख स्तंभ-स्मारके होत. ह्यांपैकी प्रत्येकाचा थोडा परिचय आपण करून घेऊ व त्यानंतर जिल्हानिहाय अशी माहिती आपण पाहू.

१. वीरगळ : धारातीर्थी मरण पावलेल्या वीराची स्मारकशिळा म्हणजे वीरगळ होय. वीरगळ कर्नाटकाप्रमाणे-महाराष्ट्रातही आढळतात. असे स्तंभ ३ ते ४ फूट उंच असून चौकोनी आकाराचे असतात. कधी ते स्तंभ जमिनीत फूट-दीडफूट पुरलेले आढळतात तर कधी सुटेही आढळतात. ह्यावर चारही बाजूला एक चौकट असून त्यात एक पुरुष हातात ढाल-तलवार घेऊन शिल्पीत केलेला असतो, तर कधी कधी हा अश्वारूढही असतो. अशा स्मारकातच कधीकधी सतीस्तंभही अंतर्भूत असतो. (उदा. घुगुस-जिल्हा चंद्रपूर). एका स्तंभावर हा योद्धा परलोकात इष्ट देवतेचे पूजनही करताना दाखवितात. अशा योद्धयाला युद्धात जेव्हा वीरगती प्राप्त होते तेव्हा त्याचे स्मृतीप्रित्यर्थ असे स्तंभ तत्कालीन समाज उभे करताना दिसतो. ही प्रथा राजस्थान, गुजराथ, महाराष्ट्र, कर्नाटक आदी प्रांतात दिसते. शिळेचे प्रकार मात्र विविध असतात.

२. सतीस्तंभ : मृत पतीबरोबर सहगमन करणाऱ्या स्त्रीचे असे स्मारक असते. ह्या स्तंभास सतीस्तंभ म्हणतात व भाविक ह्या स्तंभाची श्रद्धापूर्वक पूजा करतात. स्तंभ ३-३॥ फूट उंच असून स्तंभाच्या उभय बाजूला चंद्र-सूर्य प्रतिमा कोरलेल्या असतात. ह्याचा अर्थ असा होतो की जोपर्यंत आकाशात सूर्य-चंद्र असतील, (यावच्चंद्रदिवाकरौ) तोपर्यंत ह्या सतीचे नाव (स्मृती) ह्या पृथ्वीतलावर अजरामर राहील

अनुक्रमणिका

(म्हणून हे प्रतिकात्मक रूपात कोरलेले असतात.) अशा स्तंभावर कधी कधी स्त्री-पतीचा हात हातात घेऊन उभी असतांना दिसते व स्तंभाच्या डाव्या अंगास स्त्रीचे ढोपरापासूनचे दोन हात नमस्कार मुद्रेत असून मनगटावर सौभाग्य-चुडारूपात बांगड्या कोरलेल्या दिसतात. कधी कधी ह्या स्तंभावर लेखही असतात (उदा. आळंदी लेख क्र. २२. प्रा. म. को. लेख श्री. शं. गो. तुळपुळे) असे स्तंभ आपल्या विदर्भातही भरपूर प्रमाणात आढळतात.



रेखाचित्र घुग्गुस-सती वीरगळ स्मारकस्तंभ

३. गोरक्षास्तंभ : कोरड्या हवामानाच्या कुरणाच्या भागात पशुरक्षण करताना सद्गती मिळालेल्या व्यक्तीचे हे स्मारक असावे असे आम्हास वाटते. अशा स्तंभावर एक गोवंश कुटुंब (३ गाई, १ बैल १ गाय व १ वासरू) कोरलेला मला मांढळच्या एका रस्त्याच्या कडेला आढळला. (हनुमंत मंदिराजवळ) वरच्या बाजूला चंद्र-सूर्य कोरलेले आहेत. अशा व्यक्तींची स्मृती समाजास असावी म्हणून असे स्तंभ उभे करीत असत. पशुंना भय हे हिंस्रश्वापदांपासून व साप-नागापासून असते. कन्हान नदीच्या पात्रातील एक स्मारक तर अभ्यासकांची अजून वाट पहात आहे. तेथे सापही कोरला आहे व व्याघ्रराजही ! अशा स्मारकांना गोवर्धन किंवा गोरक्षा स्मारक संबोधतात.

४. घर्माज्ञा स्तंभ : (गधीगाळ) अशा प्रकारचे घर्माज्ञा स्तंभही असतात. किंवा ह्या प्रसंगाचे शिल्पांकन एखाद्या शिलालेखाचे शेवटी असते. या स्तंभांना मध्यप्रदेशात गधैया व महाराष्ट्रात गधीगाळ असे म्हणतात. ह्यामध्ये स्त्री व गाढव ह्यांचा समागम दर्शविलेला असतो. हा प्रसंग अश्लील व घृणास्पद वाटत असला तरी गर्भितार्थ फार गहन आहे. वरच्या बाजूला पुनश्च चंद्र-सूर्याचे अंकन असते. तज्ज्ञांच्या मते (श्री. शं. गो. चट्टे) ह्या प्रसंगाचा अर्थ असा आहे की दत्त विधान संपत्ती (जसे घर, शेत, देवालयजमीन, वास्तू किंवा इतर काही तरी दान) पुढील पिढीतील वंशजाने (दत्तविधान कर्ता) दिलेल्या व्यक्तीकडून बळजबरीने हिसकावून घेऊ नये आणि जर हिसकावण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्या आई बहिणीस अशा गाढवासंगे समागमकरताना शिल्पित केलेले प्रतिकात्मक रूप समजण्यात येईल. आणि म्हणून हा एक प्रकारचा धाक या स्तंभामधून दर्शविलेला असतो.

ह्या स्तंभास वाङमयीन पुरावाही (तयाचे माय झवीये) असे संदर्भात आढळलेला आहे. (इ.स.चे १४ वे शतक-पदाची ही शेवटची ओळ) अशा प्रतिमा विदर्भ-मध्यप्रदेशात खूप मोठ्या प्रमाणात आढळतात.

५. स्मृतीस्तंभ : एखाद्या साधु पुरुषांची स्मृती चिरंतन रहावी म्हणून असे स्तंभ मोक्याचे ठिकाणी उभारल्या जातात. स्तंभाच्या चारही बाजूला (सर्वतोभद्र प्रतिमेसारखी) त्या सिद्ध पुरुषाचे अंकन केलेले असून वरच्या बाजूला पादुका असतात.

कधी कधी चंद्र-सूर्याचे अंकनही असते. असे स्मृतीस्तंभ सर्वत्र आढळतात असे अनेक स्तंभ विदर्भात देवळासमोर, खेडोपाडी, अरण्य-जंगलात,

डोंगर दऱ्या, गुंफासमोर, नदीकिनाऱ्यावर, आडोश्याला आढळतात.

कधी कधी तर ते दुर्लक्षित स्वरूपात आढळतात. विशेषत: गधीगाळ स्मारकास अगदी उकिरड्याची जागा समजताना आढळले. (उदा. पवनी) तर हे सर्व पुरावशेष आपल्या संस्कृतीचा वारसा आहेत व त्याचे जतन, संरक्षण करण्याचे कार्य केवळ सरकारच्या पुरातत्व विभागाचे नसून नागरिकांचेही आहे. असे प्रत्येकाने समजले पाहिजे. जिज्ञासूंनी अशा अशा स्मारकाचा संग्रह नागपूरच्या अजब बंगला (संग्रहालय) ह्या इमारतीच्यामागे जाऊन जरूर पहावा-अभ्यासावा. अशा स्मारकांचे एक भव्य संग्रहालय-संकलन गुजराथेत बडोद्याला असल्याचे ऐकिवात आहे. आता आपण एका तक्त्यात (Table) हे स्तंभ पाहू या. ह्या सर्व स्तंभ स्मारकाचे अंदाजे कालमापन इ. स. चे १३ वे १४ वे शतक भारतातील इतर तुलनात्मक पुराव्यांवरून ठरू शकते कारण तसे वाङ्‌मयीन उल्लेख आढळतात व त्यातूनच तत्कालीन समाजाचा सांस्कृतिक, सामाजिक व पारंपरिक दृष्टिकोन अशा स्मारकातून दृग्गोचर होतो असे दिसते.

जिल्हा / स्मारक स्थान	स्मारकाचा प्रकार व वैशिष्ट्ये
नागपूर जिल्हा	
१. पळसाट (मुंडले) नागपूर-भंडारा या महामार्गावरील गाव अंतर अंदाजे २४ कि. मी.	सतीस्तंभ (काळा वालुकाश्म) – चंद्र-सूर्य अंकन, स्त्रीपुरुष प्रतिमा अंकन व हातात बांगड्या
२. रामटेक – नागपूरपासून ३० कि. मी.	गधीगाळ / श्री. रामभरोसे हॉटेलजवळ, वराह द्वार, श्री सूर्य-चंद्र अंकन व स्त्री – गाढव समागम शिल्प.
३. मांढळ – कुही तालुका गावात हनुमान मंदिर (३अ) पथप्रदर्शक स्तंभ	गोरक्षा स्मारक; गाईचे अंकन व चंद्र-सूर्य स्तंभ ३ पुडांचा असून शिल्प तिन्ही पुडात आहे. (भ. द.) द व ती ति थ असे वाचन मी केले. भद्रावती गावचे पथप्रदर्शक ?
४. कामठी (जुनी) शिवमंदिरासमोर भरनदीच्या पात्रात	(भ. द.) द व ती ति थ (गोवर्धन) गाय-वासरू-व्याघ्रमुख-सर्प गोवर्धन. स्त्री-पुरुष व वरच्या बाजूला पादुका.
भंडारा जिल्हा	
१. मेंढा-भंडाऱ्याच्या पूर्वेस ५ कि. मी.	सतीस्तंभ २; चंद्र-सूर्य सौभाग्यचुडा.
२. प्रत्यक्ष गावात. खांब तलावावरील कोनाड्यात	वीरगळ २ / ढाल-तलवार घेऊन योद्धा व स्त्री.
३. पवनी गावात. शिवमंदिर रस्ता	गधीगाळ / स्त्री-गाढव समागम. चंद्र-सूर्य लोक मात्र ह्या स्तंभास गधेदेव म्हणतात.
४. पवनी	स्मारक स्तंभ, महाक्षत्रप रूपीअम्म यांच्या स्मृतीप्रित्यर्थ (विदर्भातील सर्वात प्राचीन स्मारक. इ. सनाचे दुसरे शतक).

जिल्हा / स्मारक स्थान	स्मारकाचा प्रकार व वैशिष्ट्ये
५. आमगाव–पद्मपूर	स्मारक स्तंभ, (सर्वतोभद्र–पद्धत) जैन साधूचे (आजानुबाहू) चारीही बाजूंना अंकन–श्रवण बेळगोळच्या (कर्नाटक) गोमटेश्वराप्रमाणे
चंद्रपूर (गडचिरोली) जि.	
१. घुग्गुस W.C.F. (Gate No. 5) कामगारांच्या वसाहतीत	सतीस्तंभ–४ पुढात कोरला आहे. पतीचे शव व शवापाशी हात जोडून स्त्री, घोडेस्वार. परलोकात इष्टदेवतेचे पूजन. सौभाग्यचूडा–हस्त.
२. घुग्गुस / चंद्रपूर रोड	शेतात, ढाल–तलवारीसहित योद्धा.
३. ठाणेगाव (डोंगर सावंगी) आरमोरीपासून २२ कि.मी.	देवळासमोर, वीरगळस्मारक २, योद्धा चंद्र–सूर्य अंकन.
यवतमाळ जिल्हा	
१. महागाव यवतमाळ–भामरोड	देवळासमोरच अनेक स्तंभांचे तुकडे, अस्पष्ट अंकन, सती, वीरगळ, स्मृती, धर्माज्ञा.
२. शिरपूर (शिंदोल्याजवळ) वणी तालुका	गधीगाळ–सूर्य–चंद्र अंकन, गावाजवळ, विहिरीवर हा भग्न स्तंभ आहे.
अकोला जिल्हा	
१. मालेगाव / किन्हीराजा रस्ता	सती स्तंभ–चंद्र–सूर्य अंकन.
२. वार्शी–टाकळी	प्रत्यक्ष मंदिरासमोर स्तंभ, वीरगळस्मारक. घोडेस्वार, शस्त्र. घोडा खूपच सुंदर कोरला आहे.

टीप : ह्याशिवाय विदर्भात हिंडत असताना असे स्तंभ भग्न स्वरूपात, दुर्लक्षित रूपात आढळतात. ह्यांचे संकलन करून एखाद्या जिल्ह्याच्या ठिकाणी अशा सर्व स्तंभांचे एखादे उत्कृष्ट संग्रहालय तयार झाल्यास एकाच ठिकाणी अभ्यासकांना ते उपलब्ध होतील व विदर्भाच्या प्राचीन इतिहासावरही प्रकाश पडेल असे माझे वैयक्तिक मत आहे.

संदर्भ सूची :

(१) विदर्भ संशोधन मंडळ, वार्षिक, १९८८–१९८९ (प्रस्तुत लेखकाचेच दोन लेख).

(२) विदर्भ संशोधन मंडळ, वार्षिक, १९६५, (कै. डॉ. वा. वि. मिराशी, पृष्ठ १ ते ५).

(३) Memorial Stones : A Study of their Origin; Significance & Variety, 1982, Ed. 5, Sater & Gunther & Sontheimer.

(४) प्राचीन मराठी कोरीव लेख (श्री. शं. गो. तुळपुळे, पृष्ठ क्र. २६).

(५) माझ्या प्रत्यक्ष भेटी (आभार–श्री. विश्वासराव जोशी, श्री. धनंजय मेश्राम, श्री. उपाध्ये, श्री. परांपपे, श्री. विलास कुळकर्णी व असंख्य गावकरी बंधू).

△ △

|| ग्रंथभाष्य ||

ज्ञाताच्या कुंपणावरून

लेखक : नंदा खरे

भाष्य : आचार्य अ. द. वेलणकर

ऐंशी साली श्री. नंदा खरे यांनी डग्लस हॉफस्टाडरचे पुस्तक वाचले–' गॉडेल-एशर–बाख.' पुस्तकाने ते प्रभावित झाले. डग्लश हॉफस्टाडर हा आपल्यापेक्षा दोनच वर्षांनी मोठा, म्हणजे आपल्याच पिढीतला, आणि आपण अद्याप काही लिहिलं वगैरे नाही, असा विचार श्री. खरे यांच्या मनात आला.

आपल्याला आवडलेल्या या पुस्तकाचे सरळ भाषांतर करावे की काय, असे नंदा खरे यांच्या मनात आले. पण अनेक कारणांनी तसे करणे त्यांना योग्य वाटले नाही. अशा पुस्तकाला लागणारी पूर्वपीठिका मराठी साहित्यात (!) नव्हती, नव्या नव्या कल्पनांच्या प्रेमात पडून केलेल्या लिखाणाची देखील मराठीत प्रथा नाही असे खऱ्यांना जाणवले.

डार्विन शताब्दीच्या निमित्ताने खऱ्यांनी बऱ्यापैकी वाचन केले. वाचलेल्या पुस्तकांवर विचार केला. त्यातून डार्विन–पॉपर–हॉफस्टाडर असा गोफ मनात विणला गेला. 'एक जीवशास्त्रज्ञ, एक तत्त्वज्ञ, एक कृत्रिम बुद्धिमत्ता–या संगणकशास्त्राच्या शाखेचा तज्ञ. पण वेगवेगळ्या विषयांमधील सारख्याच कल्पना, सर्व विषयांचे एकसंध रूप, यांची मजा वाटायला लागते. या साऱ्या नव्या कल्पनांच्या मी प्रेमात पडलो.'–या खऱ्यांच्या कथनातून प्रस्तुत पुस्तकामागची प्रेरणा कोणती ते वाचकांच्या लक्षात येते.

भारतातल्या सुशिक्षितांची संख्या भरमसाठ असली तरी भारतीयांची वैज्ञानिक कामगिरी नगण्य आहे. वैज्ञानिक वृत्ती आणि विज्ञानाचे आकलन तुटपुंजे आहे.

प्रस्तावनेत खऱ्यांनी ग्रेगरी बेटसन याने तयार केलेली यादी दिली आहे. या यादीतील २७ विषय, स्वतःला मुले असलेल्या सर्व प्रौढ व्यक्तींना बऱ्यापैकी समजायला हवेत अशी अपेक्षा आहे. विषय असे : एन्ट्रोपी, संस्कार, वाक्यरचना, संख्या, महत्ता, पॅटर्न, सरळ प्रमाण, नाव, वर्ग, संबंध, उर्जा, अतिरिक्त, बल, संभाव्यता, भाग, पूर्ण, माहिती पुनरुक्ती, साधर्म्य, वस्तुमान, प्रार्थना, स्पष्टीकरण, वर्णन, मितींचा नियम, तर्काचे प्रकार, उपमा, टोपॉलजी – खऱ्यांनी प्रस्तावनेत दाखवलेली ही २७ नक्षत्रे पाहून माझे डोळे दिपले, आणि आपण कशाला बाप आणि पालक झालो याचा मी विचार करू लागलो !

खऱ्यांच्या प्रस्तुत पुस्तकात वाचकाला असे 'साक्षात्कार' अनेक ठिकाणी होतात, हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य आणि सामर्थ्य निश्चितच आहे.

प्रस्तुत पुस्तकाचे लक्ष्य आहे. वैज्ञानिक जडवाद (Scientific Materialism) विज्ञानाला कोणती बंधने पाळावी लागतात आणि या बंधनांचे पालन करीत विज्ञानाने कुठे झेप घेतली आहे याची झलक या पुस्तकात आपल्याला मिळेल.

प्रत्यक्ष या पुस्तकात काय मांडले आहे ते मी प्रकरणशः सांगण्याच्या मुळीच भानगडीत पडत नाही. याचे एक कारण म्हणजे माझा त्या विषयात काही अधिकार नाही. दुसरे कारण म्हणजे ते परीक्षणाच्या मर्यादेत बसण्यासारखे नाही, एक वेगळी पुस्तिकाच लिहावी लागेल.

'ज्ञाताच्या कुंपणावरून' हे या पुस्तकाचे नाव उचित आणि आकर्षक आहे. केशवसुतांच्या 'झपूर्झा' या प्रसिद्ध गूढ कवितेतील एका कडव्याची ती पहिली ओळ आहे. ते कडवे असे आहे :

ज्ञाताच्या कुंपणावरून
धीरत्व धरून
उड्डाण करून
चिद्घनचपला ही जाते
नाचत तेथे चकचकते;
अंधुक आकृती तिस दिसती;
त्या गातात
निगूढ गीती;
त्या गीतीचे ध्वनि निघती
झपूर्झा ! गडे झपूर्झा !

या कवितेवर केशवसुतांनी टीप दिली आहे : (आपल्यास जे काही नाही असे वाटते, त्यातूनच महात्मे जगाच्या कल्याणाच्या चिजा बाहेर काढितात. त्या महात्म्यांची स्थिती लक्षात वागवून पुढील गाणे वाचिल्यास; ते दुर्बोध होऊ नये असे वाटते.)

तेव्हा महात्म्यांची स्थिती लक्षात घेऊन प्रस्तुत ग्रंथ वाचला तर तो दुर्बोध होणार नाही असे वाटते !

श्री. नंदा खरे यांच्याशी संभाषण घडण्याचे अनेक प्रसंग आले. त्यात माझ्या असे लक्षात आहे की हा माणूस मितभाषी आहे. बोलता बोलता विलक्षण माहिती किंवा मुद्दा सांगून ते दुसऱ्यांचा अंदाज घेण्यासाठी थोडा 'थांबा' घेतात. 'गरजेनुसार' संभाषणाचा सांधा बदलून टाकतात. आणि अनवस्था प्रसंग येऊ देत नाहीत. दुसरे त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे वैयक्तिक, खास अनुभवांचेही मधे मधे कथन करतात आणि त्यावर मार्मिक भाष्यही करतात. या त्यांच्या संभाषणशैलीशी एकदा परिचित झाल्यावरच त्यांच्याशी बोलणे खऱ्या अर्थाने शक्य होऊ शकते. हे सगळे सांगण्याचे कारण हेच की, साधारण याच शैलीत या पुस्तकाचे लेखन झाले आहे.

एक गमतीशीर गोष्ट म्हणून पुस्तकाच्या शेवटी प्रकरणशः संदर्भ दिले आहेत, तिकडे निर्देश करता येईल. सामान्यपणे संदर्भ म्हणजे संदर्भ. ते कोरडेपणाने अकारविल्हे, शिस्त पाळून द्यायचे असतात. खऱ्यांनी अनेक संदर्भ ग्रंथांविषयीचे स्वतःचे अभिप्राय तिथे नोंदवले आहेत. उदा. 'महाग पण सुंदर पुस्तक', 'स्वार्थी जीत तत्त्वाच्या गर्भित अर्थांचा खजिना. विल्सनचे 'सोशियोबायॉलॉजी' सहज सापडत नाही. पण दुधाच्या तहानेला हे ताकही उत्तम'–आणि जे संदर्भ वापरले नाहीत ते 'पुढच्या वाटा' म्हणून नोंदवून वाचकाला खरे मार्गदर्शनही करतात. हा सगळा प्रकार अनौपचारिकता सांभाळण्यातून झाला आहे हे उघडच आहे. 'पण ही यादी मागे पुढे वाटेल तेवढी वाढवता येईल.' वाक्याने संदर्भ यादी संपते, तेव्हा खऱ्यांना हे सुचवायला हवे की, कुठल्याही ग्रंथातल्या संदर्भ यादीला हे लागू पडते. नव्हे, ते तिथे गृहीतच असते !

या ग्रंथाची मांडणी पाहता असे सुचवावेसे वाटते की विषय सूची देणे आवश्यक होते. निदान विस्तृत अनुक्रमणिका तरी द्यायला हवी होती.

वाचतानाही लेखकाची इंटिग्रिटी मात्र जाणवते. खऱ्यांचे हे पुस्तक वाचताना मी ते त्यांच्याच आवाजात ऐकत होतो ! पण पुन्हा दुर्बोधतेचा प्रश्न शिल्लक राहतोच. माहितीचे प्रक्षेपण बिनचूक होण्यासाठी अतिरिक्त माहिती देणे आणि पुनरुक्ती हे उपाय योजता येतात, असे वेगळ्या संदर्भात या पुस्तकात पृ. ८१ वर आलेय. पुढचं पुस्तक लिहिताना खऱ्यांनी याचा जरूर विचार करावा, म्हणजे त्यांच्यावर दुर्बोधतेचा आरोप कोणाला करता येणार नाही आणि त्यांचे नवे पुस्तक मराठीतल्या पुस्तकांच्या परंपरेतही बऱ्यापैकी बसू शकेल ! वैचारिक गोंगाटावर दुसरा काही उपाय नाही. किंवा उपाय आहे म्हणायचे तर तो म्हणजे चूप बसणे. मौनात जाणे. सूक्ष्मात जाणे. लेखणी म्यानबंद करणे...पण मग कल्पनानंद आणि ज्ञाननंद चारचौघांना वाटता येणार नाही.

थोडे विषयांतर करून हे परीक्षण संपवू या. खऱ्यांनी गुलाबराव महाराजांच्या एका उपासकाचे मत उद्धृत केले आहे आणि त्यातील 'प्रयत्नवादा'तील तर्कविसंगती दाखवून दिली आहे. तसेच पु. ल. देशपांडयांनी उद्धृत केलेले श्री. म. माटयांचे मत वापरून आपल्याकडचे अनेक मोठे महात्मे 'बौद्धिक कसरत करणारे' किंवा 'आत्मवंचित' होते असे म्हटलेय. खऱ्यांचा जोर या गोष्टींवर आहे की 'इथले साक्षात्कार मात्र विज्ञानाने स्पष्टपणे ठरवलेल्या मतांविरुद्धच असतात, हे का ? पुराव्यांची गरज, विरोधी पुरावे नसण्याची गरज यातले काहीही लेखकाला आवश्यक वाटत नाही.' (१५७) असे एखादे स्थळ सोडले तर हे पुस्तक जडवादाचे मंडण करणारे आहे, सटरफटर गोष्टींचे खंडण करणे ही या पुस्तकाची भूमिका नाही. अंधश्रद्धानिर्मूलनाला निघालेल्या मध्ये जो एक अभिनिवेश दिसतो तो इथे नाही. या संयमांमुळे आत्मवादी, चैतन्यवादी विचार-धारेनेही आवर्जून वाचावे इतके दर्जेदार स्वरूप या पुस्तकाचे आहे. अर्थातच या ग्रंथाला काही मर्यादा आहेतच.

यंत्रमानवाने किंवा संगणकाने अगदी मानवी क्रियांसारख्या दिसणाऱ्या क्रिया जरी करून दाखवल्या तरी काय झाले ? उत्क्रांतीने कित्येक गोष्टींचे आपण स्पष्टीकरण करू शकतो पण विश्वाच्या प्रारंभक्षणाचे म्हणा वा प्रारंभ घटनेचे म्हणा अजून काही स्पष्टीकरण आपल्याला देता येत नाही. मर्ढेकरांनी म्हटल्याप्रमाणे विज्ञान—महंत आणि भावनेने संत असणाऱ्यांनाही जाणवते की सगळ्यांच्याच स्नायूंतील तारांचा स्वीच कोणाच्या तरी हातात आहे आणि मानवी ज्ञानाला स्मशानाचे कुंपण आहे—अशीच अवस्था आहे. ज्ञाताच्या कुंपणावरून पण ज्ञाताचेच वर्णन करणारे हे पुस्तक आहे. जिथे थोडे ज्ञातापलीकडे जाऊन किंवा शुद्ध जडवादी तर्कपरंपरेने 'मी कोण ?' 'आणि देव' यावर खरे ग्रंथाच्या अंती लिहितात तिथे एखादे उपनिषदातले पृष्ठ आपण वाचतो आहोत असे क्षणभर भासते. पण भासतेच. कारण ते सारेच धूसर, दुर्बोध, काहीतरी अनिर्वाच्य असे ठरून आकलनातून निसटून जाते. निदान माझे असे झाले ! खऱ्यांनी जसे तीन पदर एकत्र करून एक विशिष्ट आकलन इथे सादर केले आहे तसेच आणखी काही पदर उपलब्ध आहेत आणि ते आपल्याला आणखी वेगळ्या दुनियेत फिरवून आणू शकतात, आणि 'घुमवू' शकतात. कोणी असा प्रयत्न केल्यास स्वतः खरेही त्या प्रत्यनाचे कौतुक आणि स्वागतच करतील इतकी त्यांची भूमिका प्रांजळ आहे. खऱ्यांच्या या पुस्तकाने मराठीत अशा लेखनाचे स्वतंत्र दालन उघडो अशी सदिच्छा व्यक्त करून थांबतो. ■

प्रकाशक : ग्रंथाली मुंबई / मूल्य ७० रु. (माग्रसच्या स्नेहभेटीतील एक वाचन)

डॉ. प्रा. अरुण वेलणकर
३२५ गांधीनगर, नागपूर

साभार पोच

गाणारं घर / महावीर जोंधळे / अनुपम प्रकाशन केंद्र, औरंगाबाद / रु. ६/- [पृ. ३२]

मराठवाडी माणसं / डॉ. यू. म. पठाण / अनुपम प्रकाशन केंद्र, औरंगाबाद / रु. ६०/- [पृ. १२२]

नवी वारूळं / भास्कर चंदनशीव / अनुपम प्रकाशन केंद्र, औरंगाबाद / रु. ७५/- [पृ. १४९]

आयुष्य वेचताना / फ. मुं. शिंदे / अनुपम प्रकाशन केंद्र, औरंगाबाद / रु. ३०/- [पृ. ८०]

आत्मस्वर / महावीर जोंधळे / अनुपम प्रकाशन केंद्र, औरंगाबाद / रु. ३५/- [पृ. ११९]

साक्षेप / भु. द. वाडीकर / अनुपम प्रकाशन केंद्र, औरंगाबाद / [रु. ६०/- [पृ. १२८]

बा. भ. बोरकर व्यक्ती आणि वाङ्मय / मनोहर सरदेसाई / गोमंतक मराठी अकादमी, पणजी / रु. १२०/- [पृ. २८१]

अंतर्लाटा / सौ. गिरिजा मुरगोडी / गोमंतक मराठी अकादमी, पणजी / रु. ५०/- [पृ. ५९]

आनंदाचा रंग / मनोहर नाईक / गोमंतक मराठी अकादमी, पणजी / रु. ५०/- [पृ. १२६]

माझ्या नाट्य-स्मृती / सखाराम पांडुरंग बरवे / गोमंतक मराठी अकादमी पणजी / रु. ६०/- [पृ. १२६]

पोर्तुगीज राजवटीतील स्वातंत्र्यलढ्याची पाने / जगन्नाथ स. सुखठणकर / गोमंतक मराठी अकादमी, पणजी / रु. ९० [पृ. १७५]

पहल / इतिहास अंक / परिमल प्रकाशन, इलाहाबाद / रु. १५/- [पृ. ३४८]

दलित साहित्य दिशा आणि दिशांतर / दत्ता भगत / अभय प्रकाशन, नांदेड / रु. ६०/- [पृ. १५३]

सूर्य उगवू द्या / ना. म. बनसोड / संकेत प्रकाशन, नागपूर / रु. १०/- [पृ. ६०]

भाषांतर / सदा कऱ्हाडे / लोकवाङ्मयगृह, मुंबई / रु. ५० [पृ. १०८]

डॉ. आंबेडकर चिंतन / केशव मेश्राम / लोक वाङ्मयगृह, मुंबई / रु. ६०/- [पृ. १२१]

रेलाँ-रेलाँ / शांताराम / लोक वाङ्मयगृह, मुंबई / रु. ७५/- [पृ. १९३]

बेचका / अरुण साधू / लोक वाङ्मयगृह, मुंबई / रु. ६० [पृ. १३०]

घायवरची माणसं / डॉ. दिनकर गायकवाड / श्रीयोग पब्लिकेशन, पुणे / रु. ६०/- [पृ. १२०]

तापीतीर / गणेश कुडे / का. स. वाणी प्रगत अध्ययन संस्था धुळे / रु. ४०/- [पृ. ७५]

प्राचीन मराठी हस्तलिखिते / संशोधन आणि संपादन-डॉ. श्री. रं. कुळकर्णी / वा. स. वाणी प्रगत अध्ययन संस्था, धुळे / रु. १००/- [पृ. २४३]

विदर्भ साहित्य संघ आयोजित
एक दिवसीय दलित साहित्य संमेलन

अध्यक्षीय भाषण : प्रा. डॉ. भाऊ लोखंडे

विदर्भ साहित्य संघाने प्रथमच आयोजित केलेल्या दलित साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. भाऊ लोखंडे यांचे अध्यक्षीय भाषण वर्तमानपत्रांमधून प्रकाशित होण्याचे राहून गेलेले असल्याने त्यांनी परिश्रमपूर्वक तयार केलेले हे भाषण 'युगवाणी'तून क्रमशः प्रकाशित करीत आहोत. त्याचा हा पुढील भाग.

(मागील अंकावरून पुढे)

झोप उडाली पाहिजे

केवळ शद्वबंबाळ भाषेचा वापर करून शाब्दिक कसरत करण्यात किंवा शब्दांची 'बाल की खाल' काढण्यात धन्यता मानू नये. या बोटावरची थुंकी त्या बोटावर केल्यासारखी शब्दचलाखी किंवा शब्दतस्करी करू नये. दुर्बोध प्रतिमा आणि बोजड शब्द वापरून आम्हाला आमच्या असीम समस्या आणि अपरंपार वेदनांना वाचा फोडता येणार नाही. त्यासाठी आम्हाला आपल्या अनुभवाशी ईमान राखूनच लिहावे लागेल. भगवान बुद्ध म्हणाले होते, "मी स्वत: जे अनुभवले ते सांगतो आहे"– "यं मया सामं दिट्ठं तमहं वदामि।" संत कबीरांनी तर पंडितांना ठणकावूनच सांगितले. 'तू कहता कागज की लेखी। मैं कहता अंखियन की देखी॥'

एका विशिष्ट कालखंडात ते निभून व शोभून गेले तरी आता आम्हाला नुसती शिवराळ भाषा योजून धन्यता मानता येणार नाही. बाबांनी माणसाला व त्याच्या मनोवृत्तीला चेतवून, पेटवून टाकणारे साहित्यसर्जन केले पण कुठेही अश्लील किंवा असंसदीय वाक्प्रयोग प्रयुक्त केले नाहीत याची आम्ही कलावंत साहित्यिकांनी दखल घेतली पाहिजे. उलट बाबासाहेबांना 'इंग्रजांचे हस्तक', 'मुसलमानांचे बगलबच्चे', 'महारांचे नेते' अशा शेलक्या शिव्या देऊनही विरोधक त्यांना नामोहरम करू शकले नाहीत. संयम, शिस्त आणि सामाजिक बांधिलकीच्या बळावर त्यांनी भल्याभल्यांना चारी कोनी चित केले. बाबा म्हणतात, "ग्रंथाची भाषा जीवंत व नारळातील पाण्याइतकी मधुर अशी असली पाहिजे. त्या ग्रंथाच्या वाचनाने माणसाची झोप उडून जाऊन त्याची विचारशक्ती जागृत झाली पाहिजे. ग्रंथाची लेखनशैली ही प्रासादिक, सुगम, उत्तेजक व वाचकांची तंद्री लागेल अशा दर्जाची असली पाहिजे."

संस्कृताचे गहनतीर

कालपर्यंत राजेमहाराजे, सेनापती, अमात्यादि उच्चवर्णीय ब्राह्मण किंवा क्षत्रियच साहित्यातील नायक असत. त्यांच्यासाठी देववाणी संस्कृत ब्रटकिणीसारखी राखीव राहत असे. दुसऱ्याला मज्जाव होता. पट्टराणी असली तरी तिला संस्कृत नाटकात संस्कृतात बोलण्याची मनाई होती. तिला

प्राकृतातच बोलावे लागे. शूद्रातिशूद्र पात्रांच्या ओठाचा स्पर्श होताच देववाणी बाटत असे. सांगायला सांगितले जाते की राजाच्या चुका साधारण शूद्र किंवा कमी दर्जाचे लोक काढीत असत. 'न तथा बाधते राजा यथा बाधति बाधते' असे विधान संस्कृत भाषा व साहित्य सामान्यजनांपर्यंत पोचली होती हे दाखविण्यासाठी केले जाते. पण वास्तव असे आहे की विदूषक हा 'जोकर' किंवा 'मस्खरा' जरी असला तरी केवळ तो उच्चवर्णीय असल्यामुळे तो संस्कृतातच बोले. पण पट्टराणी राजाची अर्धांगिनी असूनही संस्कृतचा उच्चार करू शकत नसे. अलिकडे संस्कृतचा अभ्यास करताना संस्कृत छाया वापरता येते. भगवान बुद्धाच्या उदयानंतर जी हायब्रीड संस्कृत किंवा बुद्धिस्ट संस्कृत उदयास आली तीस मात्र अशाप्रकारचे कोणतेही बंधन नव्हते. ब्राह्मणापासून तर शूद्रापर्यंत सर्वच पात्रांना संस्कृतचा सारखाच वापर करता येत असे. परंतु आजही वेदोपनिषद आणि वर्णजातीभेदाचे व्हायरस पसरविणारी मनुस्मृती अनेकानेक विद्यापीठात अभ्यासिली जाते पण बौद्धसंस्कृत साहित्यातील अतुलनीय साहित्य बहिष्कृत ठरविले जाते. अश्वघोषांचे 'बुद्धचरित', 'सौन्दरनन्द' ही महाकाव्ये आर्यदेवांची 'जातकमाला', आचार्य शांतिदेवांचे 'बोधीचर्यावतार' औषधालाही संस्कृतच्या अभ्यासक्रमात दिसत नाही. असे का ? भारताच्या इतिहासात पहिल्यांदा बुद्धाने संस्कृतऐवजी सामान्य जनतेच्या बोलीभाषेचा वापर धर्मोपदेशासाठी केला. कारण तोपर्यंत संस्कृतभाषा उच्च-वर्णातच कैद होती. विशिष्ट जातीची ती दासी बनल्यामुळे धर्मज्ञान किंवा साहित्यचर्चा कुणाही वर्णहीन दलित-शोषित शूद्राच्या दारापर्यंत जाऊच शकत नव्हती. अगदी अलीकडे पं. मालवीयांची नात व खुद्द बाबासाहेब संस्कृत शिकू शकले नाहीत. सर्वप्रथम बुद्धाने पाली किंवा मागधी बोलीचा अवलंब करून धर्मज्ञान जनसामान्यांपर्यंत पोचविले. शूद्रातिशूद्र ज्ञानवंचित होतील म्हणून बुद्धाने संस्कृतवापराची परवानगी मागणाऱ्या भिक्षुंना निक्षून सांगितले, "अनुजानामि भिक्खवे सकाय निरुत्तिया।"

भिक्षुंनो ! जनबोलीतच धर्म ज्ञानदानाची परवानगी देतो. संस्कृताचा वापर करील त्याला दुष्कृत दोष लागेल. भगवान महावीरांनी मग प्राकृतचा वापर केला. सिद्ध व नाथांनी प्राकृत-मिश्रित हिन्दी वापरली. संत कबीर म्हणालेत, 'संसकिरत है कूपजल, भासा बहता पानी', संतश्री चक्रधरस्वामी म्हणालेत, 'नको गा केशवदेवा मी तुझा हा अस्मात् कस्मात् नेणेचि गा मला मराठी चि ये पुसा' आणि ज्ञानदेवांनी 'तोडोनि संस्कृताचि गहन तीरे' लोकांना गीतेच्या लोकगंगेत स्नान करता यावे म्हणून मराठीचे तीर्थ (घाट) साकार केले. आणि अमृतातेही पैजा जिंकणारी, 'अक्षरे रसिके' मेळवीत इन्द्रियांमध्ये भांडण लावणारे मराठीचे बोल साकार केलें. असा हा प्राकृत भाषेच्या वापराचा प्रवास बुद्धापासून सुरू होऊन सिद्धनाथांच्या गुहांतून प्रवास करीत आम्हा वारकरी नामदेव, तुकाराम, चोखामेळा, एकनाथ व ज्ञानदेवांच्या पंढरपुरात येऊन थांबला. म्हणून हिंसक अंगुलीमालासारखा क्रूरकर्मा, उपालीसारखा न्हावी, अनाथपिंडिक व राष्ट्रपालासारखे बनिया, काश्यपासारखा ब्राह्मण, सुनीतसोपाकासारखे चांडाळभंगी, आम्रपालीसारखी नगरवधू; वासवदत्ते-सारखी गणिका, सिंहसेनापती व नन्दआनन्दासारखे क्षत्रिय आणि चाण्डालीसारख्या मातंग कन्येला बौद्ध पाली व संस्कृत साहित्यात नायिका व नायकत्व प्राप्त झाले. आता हीच परंपरा दलित साहित्यातून साकार होऊ लागली आहे. आम्हाला पुणेरी शुद्ध भाषेतच साहित्य निर्माण झाले पाहिजे असा आग्रह धरता येणार नाही. वऱ्हाडी किंवा खानदेशी किंवा अहिराणी किंवा आदीवासींच्या बंजारी वा गोंडी बोलीभाषेतही साहित्य निर्माण करण्यात संकोच बाळगण्याचे कारण नाही. दीनदलित जनतेचा राजा शाहू महाराज स्वतः जनसामान्यांच्या भाषेत बोलत असे आणि आपल्या मुलामुलींना सांगत असे, "सर्व सामान्य रयते(प्रजे)च्या भाषेत आपण बोलले पाहिजे. जी प्रजेची भाषा तीच राजाची भाषा" असा त्यांचा दंडक होता. महात्मा ज्योतिबा फुले स्वतः सामान्य महार-मांग-चांभार आणि शेतकऱ्यांना समजेल अशाच भाषेत बोलत व लिहीत. चिपळूणकरशास्त्री

त्यांचे शुद्धलेखन तपासतच राहिले आणि सामाजिक चळवळीच्या चक्रीवादळात गडपही झालेत. त्यांचा एकच पुतळा आहे पुण्यात आणि म. फुल्यांचे पुतळे महाराष्ट्रभर आहेत. म्हणून आपल्या पद्धतीने आपल्या भाषेत दलित, पीडित, आदिवासी, शेतकरी व कामकरी जनतेचा हुंकार कधी 'आठवणींचे पक्षी', कधी 'वलुतं', कधी 'तराळ अंतराळ', कधी 'जेव्हा मी जात चोरली होती', 'सूड', 'देवाचे गोठणे'; 'वादळाचे वंशज'सारख्या साहित्यकृतीतून ऐकायला मिळतो. आणि लक्ष्मण मान्यांचा 'उपरा' जेव्हा हाती पडतो तेव्हा त्याला मिठी माराविशी वाटते. लक्ष्मण गायकवाड, श्री. अरुण काळे आणि आत्माराम राठोड, पार्थ पोळके, राम दोतोंडे, सतेश्वर मोरे आम्हाला गळ्यातील ताईत वाटतात. गोलपिठ्यापासून निघालेला आमचा कवी आता 'गावकुसा-बाहेरून' केव्हाचीच छावणी हलवून 'उत्थान गुंफेतला' उजेड शोधीत, 'हुंकार वादळाचे' काढीत 'आता होऊन जाऊ द्या' म्हणतो आहे. नवीन तरुण गोऱ्ह्यांना कौतुक कमी आणि ढंगऱ्यांना चारापाणी जास्त असे अनेकदा होत असते. पण आमच्या तरुण कवींची इतकी दमदार आणि कसदार बटालियन आहे, की ती कोणत्याही कवीसंमेलनात भल्याभल्यांना पराभूत करू शकते. उल्हास मनोहर, ववन चहांदे, प्रसेनजित, शिवा इंगोले, चंद्रकान्त वानखेडे, डॉ. प्रकाश खरात, वसंत शेंडे व संबोधीचा ग्रुप. कोणाकोणाची आणि किती नावे घ्यावीत! ज्यांची नावे सुटलीत ते राग मानू शकतात.

दस वीस शराबी हो तो तोबा कर ले।
सारा शहर ही डूबा है मयखाने में ।।

ब्लॅक इज ब्यूटीफूल

ज्यांनी आयुष्यभर अठराविश्वे दारिद्र्यच पाहिले, ज्यांच्या पोटाने सतत भुकेचीच सोबत केली, ज्यांच्या नाकाला करपलेल्या भाकरीचा वास भासरूपाने भुरळ पाडीत राहिला, त्यांना शुद्ध सौंदर्याचा लळा कसा लागेल. 'पिपासितैः काव्यरसं न पीयते' किंवा 'बुभुक्षितः किं न करोति पापं' असे म्हणून कवीने दलित साहित्याला आधारच दिला नाही काय? भूकेने आतडी तिळतिळ तुटत असताना 'गुलाब' हा नेत्र किंवा नाकाचा विषय ठरून रसिकता किंवा सौंदर्यवृद्धी जागण्यापेक्षा पोटातील जठराग्नीच जास्त खवळतो. त्याला पौर्णिमेचा चन्द्रदेखील भाकरीसारखाच वाटू लागतो कारण पोट रिकामे असते. ते ज्याचे भरले असते त्याला मग चन्द्रात 'चन्द्रमुखी' दिसते. दोन्हीही क्रिया भुकेच्या आहेत. रिकाम्यापोटी रसिकता जागत नाही.

भूखे भजन न होत गोपाला। संभालो अपनी कंठी माला ।।

किंवा

जब जेब में पैसे होते हैं और पेट में रोटी होती है।
उस वक्त यह जर्रा हिरा है उस वक्त यह शबनम मोती है ।।

म्हणून बुद्धाने उपाशी माणसाला कधीच धर्म सांगितला नाही. आधी त्याच्या भुकेची चिंता केली.

नुसत्या भुकेने नव्हे तर वैचारिकतेमुळेही चन्द्र किंवा ताजमहाल कवी जातीच्या रसिक-कवीलाच वेगवेगळा अनुभवास येतो. शकील बदायुनी ताजमहाल पाहून म्हणतो.

एक शहेनशाहने बनवाके हंसी ताजमहल।
सारी दुनियां को मुहब्बत की निशानी दी है ।।

आणि त्याच मोहब्बतच्या निशानीकडे पाहून साहीर लुधियानवी म्हणतो.

एक शहेनशाहने दौलत का सहारा लेकर।
हम गरीबों की मोहब्बत का उडाया है मजाक ।।

बुद्धालाही उपवासाने बुद्धत्व लाभले नाही. सुजातेने दिलेली खीर खाऊनच त्यांना बोधीलाभ झाला. असे हे 'बायोलॉजिकल एंटरनल ट्रूथ' असल्यामुळे पंचपक्वान्नांवर आकंठ ताव मारणाऱ्या सुखवस्तु मंडळींची सौंदर्यासक्ती वा कला सौंदर्याची भूक आणि शतकांच्या उपासमारीने खंगलेल्या गलितगात्र लोकांची सौंदर्यासक्ती एकसारखी कशी असणार ? म्हणून प्रस्थापित सौंदर्यशास्त्राचे निकषांचे नखरे सहन करणे आणि आकृतीबंधाचे चोचले पुरविणे दलित साहित्याला कठीण जाईल. अमेरिकेतील निग्रोंनी 'ब्लॅक पॉवर'च्या अस्मितेतून 'ब्लॅक इज ब्युटीफुल' ही नवीन संकल्पना अस्तित्वात आणली आणि विश्वमान्य केली. आपले स्वतंत्र 'ब्लॅक थियेटर' उभारून 'जॉझ संगीत' साकार केले व जगभर ते लोकप्रिय केले. परिणामत: अमेरिकन गोऱ्या पोरी काळ्यांवर फिदा व्हायला लागल्यात. दलित साहित्याला देखील साहित्यशास्त्रातील पारंपारिक नियम व निकषांची पर्वा न करता आपली सौंदर्यशास्त्रविषयक कल्पना आणि आकृतीबंध तयार करावे लागतील. त्यासाठी बौद्ध, पाली व संस्कृत साहित्याची मदत घ्यावी लागेल. गळ्यात सर्पराज आणि सर्वांगाला विभूती माखलेला महादेव जर 'शिव' वाटत असेल आणि मानवी धडावर हत्तीराजाचे मुंडके असलेला गणराज जर सुंदर भासत असेल तर आपल्याला माणसाच्याच धडावर माणसाचेच मस्तक अधिक सौंदर्यपूर्ण दाखवता येणार नाही काय ? याचा गांभीर्यपूर्वक विचार केला पाहिजे नववा रस व नववा अवतार प्रस्थापित सौंदर्यशास्त्र व वैदिक धर्माला देणारा बौद्ध तत्त्वविचार आजमितीला आपल्या हृदयात धडकतो आहे हे विसरू नका.

लेडी ऑफ शेलॉट

'दलित साहित्य एकसुरी झाले आहे, 'तोच तो पणा आला आहे', 'दलितसाहित्य आवर्तात सापडले आहे', 'आक्रस्ताळेपणा आला आहे.' 'त्यातून बाहेर पडले पाहिजे' या फसव्या मृगजळा-प्रमाणे चकवणाऱ्या भ्रामक चालबाजीने आपण हुवकून, दचकून किंवा खचून जाऊ नये. हजारो वर्षे केवळ वेदोपनिषद, रामायण, महाभारतातील आख्यान व कथोपकथनांवर पोसल्या गेलेल्या नाटक व कथा कादंबऱ्यांचे अंबार उभारणाऱ्या मध्यमवर्गीय प्रतिगामी हस्तिदंती मनोऱ्यात, नव्हे, काचेच्या घरात राहणाऱ्या समीक्षकांनी 'लेडी ऑफ शेलॉट'प्रमाणे आपल्या खिडकीव्यतिरिक्त बाहेरचे जग वा जीवनाकडे डोकावण्याचा प्रयत्न करण्यापूर्वीच आमच्यावर दगडांचा वर्षाव आरंभिला आहे. जळतं त्यालाच कळतं. 'घायल की गती, दूजा क्या जाने गव्हारा रे' हेच सत्य आहे. ज्ञानकोषकारांनी कादंबरी लिहिली तीही 'ब्राह्मणकन्या', उदारमतवादी नाट्याचार्य तेंडुलकरांनी नाटक लिहिले तेही 'कन्यादान' ब्राह्मणकन्येच्या हीतात्म्यवर्णनासाठी. 'पुरुष' ही अशाच हेतूने लिहिले गेले. परंतु 'बलुतं' मधील एखाद्या स्त्री किंवा पुरुषाचे अपवादात्मक अनैतिक जीवन जसं 'दलित जीवना'चं प्रातिनिधिक उदाहरण ठरत नाही तसाच 'कन्यादान'मधील ब्राह्मणकन्येचा पती-नायक-देखील दलित समाजाचा प्रतिनिधी ठरू शकत नाही. हा प्रकार म्हणजे सरळसरळ अपवादाने नियम सिद्ध करण्याचे हस्तलाघव किंवा 'ब्राह्मणाचे कसब' आहे. त्यामुळे कालपर्यंत नव्हे आजही ज्यांनी 'कलेसाठी कला' या वांझ, वाळवंटी विकृतीची कास सोडली नाही, त्यांना दलितांच्या दाहक जीवनातील सच्च्या अनुभवांना एकसुरी, आक्रस्ताळी, आवर्तग्रस्त म्हणण्याचा काय अधिकार आहे ? आपल्या वैयक्तिक, सामाजिक किंवा वर्गीय वा जातीय स्वार्थपूर्तीसाठी साहित्याला ज्यांनी गरजेनुसार सोयीने वाटेल तसे वापरले त्यांनी सौंदर्यशास्त्र किंवा आकृतीबंधाच्या नावाने एवढा गहजब किंवा हंगामा वर्पा करण्याचे काहीच कारण नाही. आणि तिकडे लक्ष देण्याची आम्हालाही गरज नाही. ज्यांच्या दर्शनासाठी आम्हाला रक्त सांडूनही यश आले नाही ती दैवते आम्हाला पूज्य व अनुकरणीय काय म्हणून वाटावीत ? आम्हाला आमचे अनुभव प्रामाणिकपणे अधिक हृदयस्पर्शी व वास्तवरूपात मांडता आले पाहिजेत. त्यासाठी आम्हाला विविध साहित्यासोबत पाली, संस्कृत, बौद्धसाहित्याचे खूप अध्ययन केले पाहिजे.

गद्यरूपात (मूळ व भाषांतरित) पाली व संस्कृतात बौद्धसाहित्य प्रचंड प्रमाणात उपलब्ध आहे. दलित साहित्यिकांनी बौद्ध साहित्याचे अवगाहन केल्यास त्यांना मार्क्सवादाकडे दीक्षा वा प्रेरणेसाठी जावे लागणार नाही. बौद्धजातक कथासाहित्याने केवळ हितोपदेश व पंचतंत्रावर नव्हे तर ईसापनीती व अरेबियन नाईटस्सारख्या वैश्विक कथासाहित्यावर आपला प्रभाव पाडला आहे. आपण त्याचा पाथेय म्हणून उपयोग केला पाहिजे.

गरज आहे पुराणकथांची


त्याच साहित्यात अनेक पात्र आणि प्रसंग आहेत की ज्यांच्या आधारावर दलित साहित्याला जीवनमूल्यांची व कृतीतत्त्वांची पाठराखण करणाऱ्या शेकडो हजारो पुराणकथा व दंतकथा तयार करता येतील पुराण आणि इतिहासात महत्त्वपूर्ण फरक आहे. ओशो रजनीश म्हणतात, " इतिहास एकदा घडून थांबतो. पुराण वर्तमानातही घडत असते. जेथे इतिहास थांबतो तेथून पुराणाला प्रारंभ होतो. इतिहास काय घडले ते सांगतो पण पुराण काय घडायला पाहिजे ते सांगते." स्वत: दलित-साहित्याचे प्रमुख उद्गाते डॉ. म. ना. वानखेडे म्हणतात, " पुराणकथा ह्या निव्वळ दंतकथा किंवा लोककथा नव्हेत. पुराणकथा ही देव किंवा देवासारख्याच महामानवांची, नायकाची, आदिम मानवाच्या विचारधारेत बसणाऱ्या शब्दात सांगितलेली कथा, विश्वमानवाच्या व्युत्पत्तीच्या काळात साचेबंद रूढींच्या संदर्भात आदिम मानवाने केलेला प्रयत्न म्हणजे पुराणकथा. खुद्द बाबासाहेब डॉ. आंबेडकरांनादेखील पुराणकथांची आवश्यकता भासत होती. प्रा. म. भि. चिटणीसांनी, बुद्धचरितातील उद्धरणे घेतल्याबद्दल विचारणा केली असता बाबांनी दिलेले उत्तर मोठेच समर्पक आहे. ते म्हणतात, " पांडवप्रतापावर ज्यांची मानसिक पुष्टी व जडणघडण झाली आहे अशा माझ्या लोकांना बौद्धधर्मात देखील पुराणकथांची फारच गरज आहे." म्हणून या कथांना धर्माच्या महत्त्वाच्या अंगाचे स्वरूप येते. पुराणकथा वाङ्मयात खोलवर रुजलेल्या असतात. बौद्धांच्या अवदान साहित्याचे वैदिक पुराणसाहित्यावर फार मोठ्या प्रमाणात प्रतिबिंब उमटलेले दिसते. दलित लेखकाला आपले नायक शोधून काढावे लागतील, किंवा ते नव्याने निर्माण करावे लागतील. आर्यांच्या पूर्वी येथे नाग लोकांची वस्ती होती. नाग आर्यांची तुंबळ युद्धे झालीत. यात जिंकलेल्या आर्यांनी नागांना दास केले. या युद्धातून दलित लेखकांना नवीन पुराणकथांसाठी नायक–नायिका सापडू शकतील. बुद्ध, त्यांचे जीवनचरित्र, त्यांचे महानशिष्य, शिष्या, उपासक, उपासिका, बोधीधर्म, यक्ष, किन्नर, गंधर्व, मार, ब्रम्हासह्यपती, इन्द्रदेवता, बळीराजा इत्यादि व्यतिरिक्त जातककथातूनही नवीन (MYTHS) पुराणकथा निर्मिता येतील. म. पं. राहूल सांकृत्यायन यांनी लिहिलेल्या 'किन्नरदेश' व 'वोल्गा से गंगा' यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून वाटचाल करता येईल.

दलित रंगभूमी

नाटक हे साहित्यातील अत्यंत प्रभावी असे माध्यम आहे. त्यात दृष्टी आणि कान या दोन्ही इंद्रियाद्वारे थेट अंत:करणावर प्रभाव पडत असतो. महाराष्ट्रात तमाशा हे माध्यम दलितांमध्ये आरंभापासून प्रचलित होते. 'बामणाघरी लेणं (लिवणं) आणि महाराघरी गाणं' ही म्हण त्याची साक्ष देते. महात्मा फुलेप्रणीत सत्यशोधक जलसाकारांनी तर लोकनाट्याच्या या माध्यमातून बहुजनसमाजात अभूतपूर्व नवचैतन्य निर्माण केले होते. सर्वप्रथम कालिदासाच्याही पूर्वी भारतात नाटक निर्मितीचे श्रेय भदन्त अश्वघोष नामक बौद्धभिक्षूला आहे. सारिपुत्रप्रकरण नावाचे सारि-पुत्राच्या (बुद्धाचा पट्टशिष्य)– जीवनावर आधारित नाटक त्यांनी लिहिले. त्यालाच 'शारद्वती-पुत्रप्रकरण' असेही नाव आहे. हे एक छोटे प्रकरण–नाटक त्यांच्याच नावावर गणले जाते. त्यात सर्व प्रकारच्या पात्रांचा म्हणजे, चोर, लुच्चे, लफंगे, विट, गणिका, विदूषक, वेश्या, दारुबाज

इत्यादींचा समावेश आहे. डॉ. किथ ह्याला ' गणिका रूपक (Hetaera Drama) म्हणतात. यो नऊ अंकी प्रकरणनाटकात धर्मसेनापती सारिपुत्र आणि महामोग्गल्लान यांच्या धर्मस्वीकाराच्या ऐतिहासिक प्रसंगाचे चित्रण आहे. नाट्यकौशल्य म्हणजेच नाट्यकला व नाट्यतंत्राचे भदन्त अश्वघोष किती महान अधिकारी होते; याचे वर्णन करीत 'स्टेटनोव्हा' लिहितात. " Ashvaghosha's literary efforts extended also to the sphere of Drama. From the fragments of his work known as ' सारिपुत्र-प्रकरण ', it is evident that he was master of the technique of the art and that his dramas already manifested most of the characteritics of the Indian theatre." हा ग्रंथ शोधण्याचे श्रेय ल्यूडर्सला आहे. प्रो. ल्युडर्स लिहितात, " As a dramatist Ashvaghosha was worthy predecessor of Kalidas." भदन्त अश्वघोष स्वतः संगीतकारही होते. त्यांनी एकतारीसारखे वाद्य तयार केले होते. ते गावोगाव, चौकाचौकात आपल्या कलाकारांच्या संचाबरोबर फिरून गाणे गाऊन बौद्धधर्माचा प्रचार करीत असत. त्यांच्या कविता फारच लोकप्रिय झाल्या होत्या. आधुनिक पथनाट्यांच्या संकल्पनेच्या उगमाचे भारतीय मूळ येथे शोधता येईल.

निग्रोंच्या ' ब्लॅक थिएटर 'च्या धर्तीवर आपण ' दलित रंगभूमी ' उभारली आहे. पथनाट्याचे आम्ही यशवी प्रयोग करीत आहोत. म. भि. चिटणीस, दत्ता भगत, टेक्सास गायकवाड, प्रभाकर दुपारे, हेमंत खोब्रागडे, प्रेमानंद गज्वी, अविनाश डोळस इत्यादि मंडळी नेटाने दलित रंगभूमी नावारूपाला आणीत आहेत. या भागात अमर रामटेके, वंदना कोटंबे, तक्षशिला वाघदरे, कमल वाघदरे, संजय जीवने इत्यादि तरुण मंडळी लक्षणीय कार्य करीत आहेत. नाट्यक्षेत्रात पाहिजे तेवढी प्रगती झालेली दिसत नाही. हा साहित्यप्रकार सर्वाधिक महत्त्वाचा आहे. त्यामुळे इकडे लक्ष देणे अगत्याचे आहे. (क्रमशः)



वा | च | की | य

संपादक; 'युगवाणी'/स. न. वि. वि.

'युगवाणी'चा अंक मिळाला. 'वैदर्भीय कवी : या. मु. पाठक' हा लेख प्रकाशित केल्याबद्दल आभारी आहे. लेखात माझ्या अनवधानाने एक चूक झाली आहे. २५ जून १९०५ ही कै. या. मु. पाठकांची जन्मतारीख आहे. ती चुकून २४ जून १९२५ अशी लेखात लिहिल्या गेली आहे. वाचकांची व संशोधकांची दिशाभूल होऊ नये म्हणून माझे हे पत्र.

'युगवाणी'चा वाङ्मयीन दर्जा आपल्या काळात सातत्याने टिकून असल्याबद्दल आपले मनःपूर्वक अभिनंदन!

कृष्णा चौधरी
रामाळेश्वर वार्ड, रामटेक जि. नागपूर

स. न. वि. वि.

'युगवाणी'चा अंक मिळाला. आपले संपादकीय फार आवडले. 'वेगळेपण : महेश एलकुंचवारांचे' हा कमलेश यांचा लेख अतिशय अभ्यासपूर्ण व विश्लेषणात्मक आहे. याव्यतिरिक्त 'शैली : एक संवादशास्त्रीय विचार' हा श्रीपाद भालचंद्र जोशी आणि 'पुरावशेष सूची : हेमाडपंती मंदिरे' हा श्रीपाद केशव चितळे यांचे लेख अत्यंत उत्तम आहेत व उपयुक्तही. आपणास व 'युगवाणी'स हार्दिक शुभेच्छा.

मोहन हरिभाऊ धनकर
२२४ 'हरिवंश', सरस्वती निवास, गंज वार्ड, चंद्रपूर ४४२४०२

स. न. वि. वि.

'युगवाणी'चा अंक मिळाला. आभारी आहे. आपले संपादकीय वाचले. आपले संपादकीय लगेच वाचण्याची सवय लागून गेली आहे. आवडते. 'युगवाणी'चे अंक वेळेवर निघत जावेत ही इच्छा.

पंकज कुरुलकर

स. न. वि. वि.

'युगवाणी'चा अंक मिळाला. आभारी आहे. अंक आपल्या परंपरेला साजेसाच निघाला आहे. वाङ्मयीन नियतकालिकांच्या उपजीविकेकरिता आवाज उठविण्याचा मान विदर्भ साहित्य संघालाच जातो. अजूनही ही काळाची गरज आहे. कल्पनेचा पाठपुरावा जरूर करावा. आपली संपादक म्हणून पुढील तीन वर्षे निवड झाली त्याबद्दल अभिनंदन. अंकाचे सातत्य तसेच कार्याची धुरा आपण अतिशय कुशलतेने सांभाळत आहात. पुनःश्च अभिनंदन.

प्रभाकर तेलंग
माजी संपादक : 'माय मराठी'
'स्वप्नसिद्धी', मंगलवाडी, आर. बी. देसाई रोड, बडोदे ३९०००१

स. न. वि. वि.

'युगवाणी'चा अंक मिळाला. त्याबाबत मी आपला आभारी आहे. या अंकातील संपादकीय मतांबाबत श्रीपाद भालचंद्र जोशी यांचे मी अभिनंदन करतो. अंकाच्या वाङ्मयीन दर्जाबाबत वेगळे नमूद करण्याची आवश्यकता नाही. श्री. ढाणके, व सौ. ज्योती मोहन पुजारी यांच्या कविता वाचून आनंद झाला, येणाऱ्या नवीन संपादक मंडळाचे मी स्वागत करतो. कळावे.

विष्णू सोळंके
मुदलियार नगर, अमरावती–६

स. न. वि. वि.

'युगवाणी' सत्यकथेची पोकळी भरून काढत आहे. आज चेहरा नसलेल्या मासिकांच्या गर्दीत 'युगवाणी' विचलित होत नाही.

सुनील साळुंके
७९१, द कसबा/साळुंके वाडा/शिंदे चौक, सोलापूर

स. न. वि. वि.

'युगवाणी'चा अंक मिळाला. वसंत आबाजी डहाके यांचा 'जी. ए.'वर लिहिलेला लेख आवडला. पण 'लग्न' ह्या पंकज कुरुलकर यांनी लिहिलेल्या कथेतून काय घ्यावे आणि कथा कशी असावी हे मुळीच कळत नाही. एकदरीत ही कथाच मला आवडली नाही. प्रा. डॉ. अविनाश कांबळेंचा सुरेश भटांवरचा लेख बरा वाटला. गंगाधर गाडगीळ यांची घेतलेली मुलाखत बरीच वेधक आणि कथेच्या जडण घडणीवर प्रकाश टाकणारी आहे. 'गझलचे छंद:शास्त्र : एक अभ्यास' क्रमशः प्रकाशित करीत आहात, बरं वाटलं.

मोहन शिरसाट
दंडे चौक, वाशीम

स. न. वि. वि.

'युगवाणी'तला श्रीपाद केशव चितळ्यांचा 'पुरावशेष सूची : हेमाडपंथी मंदिरे' हा लेख वाचून काढला. युगवाणीचा हा अंक एस. टी. बसमध्ये कोणी विसरला म्हणून मला सापडला. श्री. चितळ्यांसारखी संशोधक मंडळी वास्तव इतिहासाला बगल देऊन सर्वच इतिहास भगव्या रंगाने पोतण्याचा प्रयत्न करतात. नव्हे ते त्यांचे जीवनकार्यच असते प्राचीन मंदिरे राक्षसांनी बांधली असे जे स्थानिक लोक सांगतात याचा उलगडा चितळ्यांना होत नसावा असे वाटत नाही. हे राक्षस म्हणजे कोण हे चितळ्यांना माहीत नसेल काय ? हे राक्षस म्हणजे या भारताचे मूळ निवासी होत. हे राक्षस म्हणजे आपले गोंड, नवारी, आदिवासी लोक होत. या मूळ निवासींचा इतिहास दडपण्याचा शिस्तबद्ध प्रयत्न होतो आहे. तेव्हा चितळेसारखे संशोधक इतिहासाला न्याय देऊ शकणार नाही हे कळण्यासारखे आहे. खरे म्हणजे भारतातील प्राचीन मंदिरे ही अनार्यांची भारताला दिलेली अमूल्य देणगी होय.

ओंकार नारायण जगताप
काटोल

प्रिय श्री. चंद्रकांत कुळकर्णी


स. न. वि. वि.

थोडा वेळ का असेना तुमच्या ग्रंथालयात येता आले. तुमच्याशी आणि सौ. कुंदाताई केळापुरे यांच्याशी चर्चा करता आली, याचा खूप आनंद झाला. विशेषत: तुम्ही मंडळी घरोघरी जाऊन जो ग्रंथप्रसाराचा, ग्रंथवाचनाचा कार्यक्रम करीत आहात, त्याला आश्चर्यकारक प्रतिसाद मिळत आहे हे ऐकून आनंद झाला. तुम्ही वाचकासांठी मांडून ठेवलेली पुस्तके पाहून मन प्रसन्न झाले. माणसाचे ग्रंथावर प्रेम असेल तर तो वाचकांसाठी किती नवनव्या कल्पना लढवतो आणि त्यात यशस्वी होतो, याचा पडताळा तुमच्या कृतीउक्तीतून आला. तुमच्याशी झालेले अल्पसे बोलणे आणि चर्चा या माझ्या मनाला चटका लावून गेल्या. मला त्यतूना खूपसे नवीन काही मिळाले.

वि. सा. संघातर्फे घेण्यात येणाऱ्या परीक्षांविषयीही ऐकून आश्चर्य वाटले. हा उपक्रम फारच महत्वाकांक्षी आहे. वरील सर्व बाबींमुळे संघाचा संपर्क जनतेशी, रसिकांशी, अभ्यासकांशी घनिष्टपणे राहिला आहे. हे फार महत्त्वाचे आहे. जास्त काय लिहू !

आनंद यादव

'भूमी' ५, धनकवडी, पुणे ४११ ०४३



विदर्भ
साहित्य
संघ
नागपूर

केन्द्रीय कार्यवृत्त १ ऑगस्ट ९२ ते ३१ ऑक्टोबर ९२

दि. १-८-९२ लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्त लोकमान्यांच्या छायाचित्रास पुष्पहार अर्पण करण्यात आला.

दि. ६ व ७-८-९२ कै. श्री. कृ. कोल्हटकर व्याख्यानमालेत सुप्रसिद्ध विनोदी लेखक प्रा. द. मा. मिरासदार यांची दोन व्याख्याने आयोजित करण्यात आली. 'कोल्हटकर-गडकरी – विनोदी गुरु-शिष्यांची पहिली जोडी' या विषयावर पहिल्या दिवशी त्यांनी विचार व्यक्त केले. दुसरे दिवशी 'कै. चि. वि. जोशी व्यक्ती आणि वाङमय' या विषयावर त्यांनी आपले व्याख्यान गुंफले. प्राचार्य राम डोके अध्यक्षस्थानी होते. प्रा. सुरेश द्वादशीवार यांनी मान्यवरांचे स्वागत केले. या कार्यक्रमाच्या सुरुवातीस कै. अच्युतराव पटवर्धन यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

दि. ९-८-९२ सुप्रसिद्ध नेपथ्यकार श्री. बापू लिमये यांच्या 'गोष्ट नेपथ्याची' या पुस्तकाच्या संबंधाने त्यांचे एक सप्रयोग व्याख्यान आयोजित करण्यात आले.

दि. १५-८-९२ भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या ४५ व्या वर्धापन दिनाप्रीत्यर्थ ध्वजवंदन करण्यात आले. या प्रसंगी स्थानिक कार्यकारिणी सदस्य व कर्मचारी वर्ग उपस्थित होता. उपस्थितांना मिठाई वाटण्यात आली.

दि. २१-८-९२ ग्रंथसहवास व विजय प्रकाशन यांचे संयुक्त विद्यमाने पुस्तक प्रकाशन समारंभ आयोजित करण्यात आला.

दि. २७-८-९२ डॉ. सौ. ज्योती लांजेवार यांच्या नवीन कविता संग्रहाचे प्रकाशन प्रा सुरेश द्वादशीवार यांचे हस्ते संपन्न झाले.

दि. २५-९-९२ विदर्भ साहित्य संघाचे माजी अध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी एका शोकसभेचे आयोजन केले होते. महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री श्री. नाशिकराव तिरपुडे, श्री. ताराचंद्र खांडेकर, श्री. गो. काशीकर प्रभृतींनी या प्रसंगी कै. ना. रा. शेंडे यांना श्रद्धांजली अर्पण केली.

विदर्भ साहित्य संघात कै. ना. रा. शेंडे यांचे कायमस्वरूपी स्मारक उभारण्यासाठी २१००० रु. ची देणगी श्री. तिरपुडे यांनी जाहीर केली. वि. सा. संघाचे अध्यक्ष प्रा. द्वादशीवार यांनी माननीय तिरपुडे यांचे आभार मानले.

दि. ३०-९-९२ वि. सा. संघाच्या 'घर आंगण' प्रकल्पांतर्गत प्रथम हिंदी एकांकिकेचा प्रयोग सादर करण्यात आला. सुंदर बुटाणी दिग्दर्शित व मोहन राकेश लिखित 'हूं' या एकांकिकेत वीथीकादास व सुंदर बुटाणी यांनी भूमिका केल्या.

दि. १२-१०-९२ स्व. गं. दे. खानोलकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी एक शोकसभा घेण्यात आली.

दि. १३-१०-९२ सुप्रसिद्ध कवयित्री सौ. सुलभा हेर्लेकर यांच्या 'आमासवेळा' या कविता संग्रहाचे प्रकाशन प्रतिमा प्रकाशनच्या संयुक्त विद्यमाने संपन्न झाले. या प्रसंगी बरीच रसिक मंडळी उपस्थित होती.

दि. १७ व १८ ऑगस्ट ९२ वि. सा. संघाच्या कै. ना. के. बेहरे व्याख्यानमालेत सुप्रसिद्ध लेखक श्री. अरुण साधू यांची व्याख्याने झाली. प्रा. सुरेश द्वादशीवार या प्रसंगी अध्यक्षस्थानी होते. 'मराठी साहित्यातील वैचारिक दारिद्र्य' व 'मार्क्सवादाची पडझड' या विषयावरील त्यांच्या व्याख्यानास प्रचंड प्रतिसाद मिळाला.

दि. २१-१०-९२ विदर्भ साहित्य संघ व 'रसिक रचना' यांच्या संयुक्त विद्यमाने, कॅसेटमध्ये ध्वनिमुद्रित अभिनव दिवाळी अंकाचा प्रकाशन समारंभ संपन्न झाला.

श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालय : ग्रंथ सहवास

१ ऑगस्ट १९९२ ते ३१ ऑक्टोबर ९२ या कालावधीत श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयात अनेक ग्रंथ खरेदी झाली. तसेच अनेक मान्यवर प्रभृतींनी ग्रंथालयाला भेट दिली. ग्रंथ-सहवास या उपक्रमाचे कार्यक्रम अनेक ठिकाणी आयोजित केले होते.

२ ऑगस्ट १९९३ रोजी डॉ. डी. के. गुहा यांच्या मेंटल हॉस्पिटल चौकातील निवासस्थानी हा कार्यक्रम आयोजित केला होता.

९ ऑगस्ट ला श्री. विनोद देशमुख यांच्या "ऑलिंपिकायन" या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ प्रसिद्ध धावपटू चारूशिला नायगावकर यांच्या हस्ते झाला; ग्रंथ सहवासतर्फे हा कार्यक्रम आयोजित केला होता अर्थात नवप्रकाशित, लक्षवेधी ग्रंथांचे प्रदर्शन याप्रसंगी मांडण्यात आले होते.

२६ ऑगस्टला महामहोपाध्याय कै. वा. वि. मिराशी यांचे जन्मशताब्दीनिमित्य त्यांचे निवासस्थानी कार्यक्रम घेण्यात आला. प्रा. म. रा. जोशी अध्यक्ष होते. प्रज्ञाभारती श्री. वर्णेकर, प्रा. सुरेश द्वादशीवार इ. मान्यवर मंडळी उपस्थित होती. त्यांच्या अभ्यासिकेत त्यांचे हस्तलिखित, त्यांचेच वाङ्मय, लेख, व्यवस्थित लावून ठेवण्यात आले. उपस्थित श्रोत्यांनी या दुर्मिळ वाङ्मयाचा पुरेपुर आस्वाद घेतला.

१ सप्टेंबरला श्री. रमेश शेटे यांचे निवासस्थानी चंदननगर येथे श्री. गजानन महाराज पुण्यतिथीच्या मुहूर्तावर आयोजित केलेल्या या कार्यक्रमात प्राचीन वाङ्मयाचे प्रदर्शन लावण्यात आले तसेच श्री. प्रकाश एदलाबादकर यांनी रामदास आणि त्यांचे वाङ्मय याचे महत्त्व सांगितले.

६ सप्टेंबरला श्रीमती शैलजा पुंडलिक यांचे निवासस्थानी कार्यक्रम आयोजित करण्यात आला. प्रा. सौ. सुनंदा देशपांडे यांनी याप्रसंगी कथाकथन केले.

२० सप्टेंबर रविवारचा कार्यक्रम श्री. विजय दंडिगे, यांच्या निवासस्थानी घेण्यात आला.

२३ सप्टेंबर, सौ. आशा अजित देशपांडे, ॲड. अजित देशपांडे यांचे येथील कार्यक्रमात ग्रंथप्रेमी ग्रंथपाल कै. गजाननराव भवाळकर यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

१ आक्टोबरला ७५ वा अमृत महोत्सवी कार्यक्रम सौ. मधुरिका गडकरी यांच्या निवासस्थानी ग्रंथ सहवास कार्यक्रमाचे वेळी प्रमोदिनी क्षत्रिय आणि सहकारी यांचा 'स्वरगंधा' हा कार्यक्रम सादर करण्यात आला होता. याचवेळी नवीन पुस्तकांचा विशेष परिचय (जगले जशी, एक तरी ओवी अनुभवावी, शब्द घन) करून दिला.

१२ आक्टोबरला दिवंगत चरित्रकार गं. दे. खानोलकर यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. चरित्र वाङमयाचे प्रदर्शन तसेच डॉ. सौ. आशा सावदेकर यांचे भाषणही या कार्यक्रमात आयोजित केले होते.

१६ आक्टोबर रोजी छायाचित्रकार डी. के. गोडबोले यांचे निवासस्थानी ग्रंथ-सहवासचा कार्यक्रम झाला. सौ. शोभा बुचे व सौ. शोभा उबगडे यांनी कथाकथन केले.

सुप्रसिद्ध समीक्षक कै. डॉ. वसंतराव वऱ्हाडपांडे यांचा ग्रंथ-संग्रह त्यांच्या स्नुषा प्रा. रेणू व डॉ. मीनल वऱ्हाडपांडे यांनी श्री. शिवाजी संदर्भ ग्रंथालयाला दि. १७-१०-९२ रोजी सप्रेम भेट म्हणून दिला. त्यांच्या या दुर्मिळ ग्रंथ-संग्रहाची विशेष व्यवस्था ठेवली असून अभ्यासक त्याचा पुरेपूर फायदा घेत आहेत.

विदर्भ साहित्य संघ : परीक्षा समिती

दिनांक ५ ऑगस्ट १९९२ ला 'भाषा परिचय' वर्गाचे समापन करण्यात आले.

दिनांक २६ ऑगस्ट रोजी वार्षिक पारितोषिक व प्रमाणपत्र वितरणाचा कार्यक्रम निवृत्त भाषा उपसंचालक श्री. शरश्चंद्र बुचे यांच्या हस्ते संपन्न झाला. याप्रसंगी त्यांनी भाषेच्या व्यावहारिक उपयोगावर भर देऊन केन्द्राधिकारी व विद्यार्थी यांना अमूल्य मार्गदर्शन केले. याचप्रसंगी महाराष्ट्र राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक डॉ. बाबासाहेब नंदनपवार यांचा विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष व श्री. सुरेश द्वादशीवार यांचे हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

१९९२ च्या सत्रापासून भाषा स्नातक (बी. ए. समकक्ष) व साहित्य स्नातक (बी. ए. समकक्ष) या दोन परीक्षांना नवीन पुरस्कार देण्यात आला. उपरोक्त पुरस्कार कै. श्रीमती शांताबाई दंडिगे यांनी आपल्या मातोश्री कै. जानकीबाई सुभेदार यांच्या स्मृति प्रीत्यर्थ वरील परीक्षांमध्ये सर्वप्रथम येणाऱ्या ५०००/- ची ठेव विदर्भ साहित्य संघाकडे ठेवली. वार्षिक पारितोषिक वितरण प्रसंगी त्यांचे चिरंजीव श्री. विजय दंडिगे यांना आमंत्रित करून त्यांचा सत्कार करण्यात आला.

दिनांक १० व ११ ऑक्टोबर १९९२ रोजी द्वितीय सत्रातील परीक्षा संपन्न झाली. एकूण सात केन्द्रावर परीक्षा घेण्यात आल्या. ८०० विद्यार्थी विविध परीक्षांमध्ये सम्मिलित झाले.

विदर्भ साहित्य संघ : परीक्षा समिती, नागपूर

फेब्रु.–१९९२ सत्रातील विविध पारितोषिकांचे विवरण

अ. क्र.	परीक्षा	विद्यार्थ्यांचे नाव	रक्कम	केन्द्र
१.	म. प्रवेश	कु. शिल्पा तुळणकर	२०/–	परांजपे विद्यालय, नीरी
२.	म. परिचय	सोनाली महेन्द्र खोब्रागडे	२०/–	शांती निकेतन ज्ञानपीठ हायस्कूल हनुमाननगर
३.	म. बोध	कु. संगीता बन्सीधर मिश्रा	२०/–	प्रॉव्हीडन्स गर्ल्स हाय. सिव्हील लाईन्स
४.	म. प्रबोधिनी	कु. उमारानी किष्टय्या चित्तापल्ली	२०/–	लोकमान्य टिळक विद्यालय, ब्रम्हपुरी
५.	म. प्रबोध	अंजुम इकबाल रशिद अहमद खान	२०/–	सुबहॉनिया हाय. शांतीनगर
६.	म. प्राथमिक	अतुल अनिल जकाते	२०/–	ऑर्डनन्स फॅक्टरी, अंबाझरी, नागपूर
७.	म. प्रारंभ	नितीन नारायणराव माळोदे	२०/–	जवाहर हायस्कूल, नंदनवन नागपूर
८.	म. प्रारंभोत्तर	स्मिता वसंत साळवणकर	२०/–	धर्मराज हायस्कूल, कन्हान
९.	पूर्व विनीत	निखील सुरेश घडचाळ-पाटील	२०/–	सोमलवार हायस्कूल, रामदासपेठ, नागपूर
१०.	सा. विनीत–१	नामदेव पत्रूजी कोसमशिगे	२०/–	शिवाजी हायस्कूल, चामोर्शी
११.	सा. विनीत–२	रेषणकुमार कृष्णराव दुधे	२०/–	दिनवाई विद्यालय दिग्रस
१२.	सा. परिचित–१	नंदा रामदास पवार	२०/–	कमला नेहरू महाविद्यालय, नागपूर
१३.	सा. परिचित–२	सुधीर महादेव वाठ	२०/–	शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती
१४.	भा. स्नातक	रजनी उत्तमराव पडोळे	५१/–	महिला महाविद्यालय
१५.	भा. स्नातक	कु. दीपाली अरुण कोलते	५१/–	वि. सा. संघ केन्द्र, नागपूर

अ क्र.	परीक्षा	विद्यार्थ्यांचे नाव	रक्कम	केन्द्र

सर्वाधिक परीक्षार्थी पुरस्कार

विद्यालयीन		महाविद्यालयीन
(१) सोमलवार हायस्कूल, खामला	प्रथम क्रमांक	(१) कमला नेहरू महाविद्यालय
(२) विकास हायस्कूल, कन्हान	द्वितीय क्रमांक	(२) महिला महाविद्यालय
(३) हितकारिणी उच्च मा. विद्यालय, आरमोरी	तृतीय क्रमांक	(३) नवीरा महाविद्यालय, काटोल

शाखावृत्त

चोहोट्टा बाजार शाखा

चोहोट्टा बाजार : दि. २९-९-९२ मंगळवारी स्थानिक जि० प० प्राथ० मराठी शाळेचे से० नि० मुख्याध्यापक श्री. दामोदर गोपाळराव कडू व शिक्षक श्रीरंग गंगाराम वोरचारे या शिक्षकांनी उत्कृष्ट कार्य करून संस्थेला तालुक्यात अग्रक्रम मिळवून दिल्याबद्दल व आयोजित केलेल्या उपक्रमांस वेळोवेळी शाखेला सहकार्य दिल्याबद्दल श्री० पी० एस० क्षीरसागर माजी अध्यक्ष बार असोसिएशन व श्री० रा० ना० दहिभाते अध्यक्ष प्राथमिक शिक्षक संघ यांच्याहस्ते शाल व श्रीफळ देऊन सपत्निक सत्कार करण्यात आला.

शैक्षणिक क्षेत्रात यश व गुणवत्ता मिळणारे प्रा० प्र० शा० भालेराव, प्रा० साधना वानखडे; कु० ममता राठी, डॉ० रत्नप्रभा पाटील, डॉ० संगीता खोडके, डॉ० अनिल घांडे; कु० टिकार, कु० देवळे, चि० वोरचाटे, चि० इंगळे इत्यादींचे शाखेतर्फे अभिनंदन करण्यात आले.

स्व० ना० रा० शेंडे माजी संघाध्यक्ष, स्व० अनुताई वाघ यांना शाखेच्यावतीने श्रद्धांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाखाध्यक्ष अ० पां० खोडके, संचालक सौ० गोकर्णाताई आढे, उपाध्यक्षा व आभारप्रदर्शन सचिव प्रा० प्र० शा० भालेराव यांनी केले. कार्यक्रमाला ५०० च्या वर स्त्री-पुरुष शिक्षक-शिक्षिका व विद्यार्थी उपस्थित होते.

लाखनी शाखा

विदर्भ साहित्य संघशाखा लाखनीची आमसभा दिनांक २७-९-९२ रोजी श्री. गोविंद ठेंगडी सचिव वि० सा० संघ शाखा मोदा यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सभेला ४१ सदस्य उपस्थित होते. सौ० इंदिराबाई बोरकर, आजीव सदस्य, हिरामण पाखपांडे, सदस्य, साहित्य महर्षी ना० रा० शेंडे, व न्यायमूर्ती हिदायतुल्ला या दिवंगत मान्यवरांना सभेनी श्रद्धांजली अर्पण केली.

माजी शाखाध्यक्ष यांनी सभेच्या वतीने विचार व्यक्त केले. पुढील सत्रासाठी नवीन कार्यकारिणी खालीलप्रमाणे निवडली गेली.

शाखा कार्यकारिणी

(१) अध्यक्ष– प्रा० वे० तु० आगाशे, (२)उपाध्यक्ष–सूर्यनारायण भारद्वाज, (३)कोषाध्यक्ष–ता० तु० चवळे, (४) सचिव– द० सा० वोरकर, (५) सहसचिव– ता० ह० भुरे, (६) कार्यक्रम प्रमुख– प्रा० डॉ० गुरुप्रसाद पाखमोडे, (७) सदस्य– खु० मो० बारसागडे, दौ० श्री० लांजेवार, प० भ० पाखमोडे, दिनेश पंचवृद्धे, पुं० वा० सपाटे, सो. आशा ज० कापसे, सौ० मंदाकिनी मा० पोहरकर, निमंत्रित–श्री० दा० सी० शिवनकर, श्री० ह० रा० मोहतुरे,

आमच्या लाखनी शाखेचा १५ वा वर्धापन दिन, दि. ६–१०–९२ रोजी स्थानिक विवेकानंद सभागृहात संपन्न झाला. प्रमुख अतिथी प्राचार्य गो० मो० कोलते हे होते.

(१) याप्रसंगी बालचित्रकला प्रदर्शनी भरविण्यात आली होती, (२) लाखनी केन्द्रातील मराठी विषयात सर्वोच्च गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात आली, (३) शाखेच्या आजीव सदस्य असलेल्या आदर्श शिक्षकांचा गौरव करण्यात आला.

गौरव / सत्कार / चित्रकलास्पर्धा

(अ) खुलागट– वर्ग ११ च्या वर व इतर.

(१) राजकुमार देवराव वहाने–समर्थ महाविद्यालय लाखनी

(२) विनायक राजाराम घरट–जि० प० क० विद्यालय पिंपळगाव / सडक

(३) सुरजलाल श्रीराम साखरे–समर्थ क० म० वि० लाखनी

प्रोत्साहन–किरण राजहंस गोस्वामी–जि० प० क० म० वि० पोहरा

शालान्त गट– सर्व समर्थ विद्यालय लाखनी

(१) कु० शिला भूमेश्वर मिसार (२) अभय गोपीचंद लांडगे

(३) मनोहर राजरतन पिडचल

प्रोत्साहन–सुनील आनंदराव गुजर व प्रदीप आनंदराव लिचडे

एकूण १४० बालकलाकारांनी स्पर्धेत भाग घेतला

लाखनी केंद्र

मराठी प्रथम : वर्ग १० वा (१) विठ्ठल कयाराम चचाने, (२) येशूताई नामदेवराव भडके,
वर्ग १२ वा (१) केशव व्ही० मानकर,
बी० ए० (१) राजकुमार नारायण देशकर,
आदर्श शिक्षक : (१) श्री० वा० तु० चवळे,
(२) श्री० द० गो० अतकरी राष्ट्रीय पुरस्काराची घोषणा
वरील सर्व स्पर्धकांना पुस्तके देण्यात आली.

प्रास्ताविक-सचिव द० सा० बोरकर, आभार प्रदर्शन शाखाध्यक्ष प्रा० बे० तु० आगाशे व संचालक कार्यक्रम प्रमुख डॉ० गुरुप्रसाद पाखमोडे यांनी केले.

रामटेक

(१) दिनांक ५-७-९२ रोजी कालीदास स्मारक येथे आषाढधारा हा कार्यक्रम घेण्यात आला. या कविसंमेलनात खालील कवींनी भाग घेतला-- सुगंधा शेंडे, कुमुद मंडलेकर, माला केकतपुरे, आशा पांडे, अदिता गहलाते, सुचित्रा कातरकर, तारा सांवगीकर, प्रतिभा कुळकर्णी, स्मिता भालेराव, मालती निमखेडकर, प्रेमा घुले, प्रा. कृष्णा चौधरी, विवेक गोखले (स्थानिक) गीरधर (स्थानिक) कार्यक्रमाचे अध्यक्ष गजानन भेदे होते तर प्रास्ताविक प्रा. चौधरींनी केले तर आभार प्रदर्शन गजाननराव किमतकर यांनी केले तर कार्यक्रमाचे संचालन मनोहर राघोर्ते यांनी केले.

(२) दिनांक १९-९-९२ रोजी रामटेक शाखेतर्फे शहरातील व परिसरातील शाळा व ज्यु. कॉलेजच्या विद्यार्थ्यांकरिता समर्थ विद्यालयात निबंध व चित्रकला स्पर्धांचे आयोजन केले होते. या स्पर्धेत ४०० ते ५०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. खालील विद्यार्थ्यांनी गुणानुक्रमे बक्षिसे प्राप्त केली-- चित्रकला स्पर्धा 'अ'गट प्रथम लेनिनकुमार हांडे, द्वितीय कु. सुकेशीनी राऊत, तृतीय रूपेंद्र पोकळे तर 'ब' गटात प्रथम कृष्णा रहाटे, द्वितीय भूपेंद्र घमागदे, तृतीय कु. ममता चांदेकर ह्यांनी प्राप्त केला. तर निबंध स्पर्धा अ गटात प्रथम प्रदीप ढोले, द्वितीय किशोर आष्टणकर, तृतीय संदीप महाजन तर 'ब' गटात प्रथम विलास मडावी, द्वितीय जयंत पाटील तर तृतीय आशीष फुलबंरकर यांनी प्राप्त केले.

(३) दिनांक ७-१-९३ रोजी विदर्भ साहित्य संघ शाखा, रामटेक व महात्मा फुले मित्र-मंडळ यांचे संयुक्तरीत्या सावित्रीबाई फुले जयंती घेण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष गजाननराव भेदे होते. सौ. कुसुमाताई किमतकर प्रमुख्याने उपस्थित होत्या तर याप्रसंगी डॉ. सौ. सीमा जोशी व प्रा. कृष्णा चौधरी यांची भाषणे झालीत. कार्यक्रमाचे संचालन शाखा सचिव मनोहर राघोर्ते यांनी केले.

(४) १६ जानेवारी ९३ रोजी विदर्भ साहित्य संघ शाखा, रामटेक ने 'स्व. श्री. दामोदरराव किमतकर स्मृती वक्तृत्व स्पर्धेचे' आयोजन केले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थी श्री. गजाननराव भेदे होते तर अॅड्. भाऊराव देवळे व प्रा. मधुकरराव पोकळे व सादीक अली कुतूबी प्रमुख अतिथी होते. प्रास्ताविक प्रा. कृष्णा चौधरी यांनी केले तर कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन शाखा सचिव मनोहर राघोर्ते यांनी केले. याप्रसंगी शाखा अध्यक्ष गजाननराव किमतकर व उपाध्यक्ष येडके यांची भाषणे झालीत. या स्पर्धेत 'अ' गटात प्रथम हर्षल भगत, द्वितीय आशीष उराडे तर तृतीय मनिस फुलवंरकर यांनी प्राप्त केले तर 'ब' गटात प्रथम कु. रोहिणी सहदेव, द्वितीय एम. एम. पाटील तर तृतीय कु. अंजली कुर्वे यांनी प्राप्त केले.

परीक्षकाचे कार्य अॅड्. अरुण देवळे, डॉ. सीमा जोशी, डॉ. विनोद जयस्वाल, सादीकअली कुतूबी व सुमतीताई क्षीरसागर यांनी केले.

अनुक्रमणिका

अमरावती शाखा

कै. ए. श्री. पटवर्धन व्याख्यान विदर्भ साहित्य संघ व अमरावती नगर वाचनालय यांचे संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. २१–८–९२ रोजी आयोजित करण्यात आले. श्री. अरुण साधू, मुंबई हे वक्ते होते. व्याख्यानाचा विषय " मार्क्सवादी विचारांची पडझड' हा होता. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी वि. सा. संघ शाखा अमरावतीचे सचिव श्री. नानासाहेब पिंपळगावकर हे होते.

भंडारा शाखा

(१) कै. पु. भा. भावे स्मृतिदिन–कथालेखन स्पर्धा

कै. पु. भा. भावे स्मृतिदिनामित्त वि. सा. संघाच्या भंडारा शाखेतर्फे भंडारा जिल्ह्यातील नवोदित कथालेखकांसाठी कथालेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत श्री. घनश्याम डोंगरे (जवाहर नगर) यांच्या ' पोरायसाठी तरी वाचवा ' या कथेला प्रथम क्रमांक, कु. नीलिमा सुतोने (भंडारा) यांच्या ' जिद्द ' या कथेला द्वितीय क्रमांक तर श्री. संजय मेश्राम (लाखांदूर) यांच्या ' ऋणानुबंध ' या कथेला तृतीय क्रमांक मिळाला.

कै. पु. भा. भावे स्मृतिदिन कार्यक्रमात दि. १३ ऑगस्ट रोजी भाव्यांच्या पत्रकारिता, कथा-कारिता आणि नाट्यलेखन या पैलूंचा परामर्ष अनुक्रमे गोपु पिंपळापुरे, प्रा. कु. चंद्रकला रामटेके आणि श्री. सुधीर गुप्ते यांनी घेतला आणि भाव्यांना आदरांजली वाहिली. याच कार्यक्रमात कथालेखन स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली.

(२) कै. ना. रा. शेंडे यांना श्रद्धांजली

कै. ना. रा. शेंडे यांचा गौरव करुन वि. सा. संघाच्या भंडारा शाखेतर्फे दि. २५–९–९२ च्या कार्यक्रमात श्रद्धांजली वाहण्यात आली.

वि. सा. संघ भंडारा शाखेचा आगळा उपक्रम ' रिमझिम गाणी '

वि. सा. संघ भंडारा शाखेच्या विद्यमाने शुक्रवार दि. २५–९–९२ ला सायंकाळी वाचना-लयाच्या सभागृहात ' रिमझिम गाणी ' सादर करण्यात आलीत. कवी कुसुमाग्रज, मर्ढेकर, बा. भ. बोरकर, ना. धों. महानोर, अनुराधा पोतदार, ना. घ. देशपांडे, इंदिरा संत, बालकवी, इत्यादींच्या निवडक पावसाळी कवितांचे सादरीकरण नानोटी संगीत विद्यालय आणि भंडाऱ्याच्या गायक कलावंतातर्फे यावेळी करण्यात आले. श्री. अरविंद तांबे यांचे संगीत नियोजन; आणि प्रा. सुमंत देशपांडे यांचे निवेदन होते.

कलावंतांना अध्यक्ष अॅड्. सुधीर गुप्ते यांचे प्रशस्तिपत्रे देण्यात आली. कवी ग. दि. माडगूळ-करांच्या ' वेदमंत्राहुनी आम्हा वंद्य वंदेमातरम् ' ह्या गीताने कार्यक्रमाचा समारोप झाला. कार्यक्रमाचे संयोजन कार्यवाह माधुरी सुतोने यांनी केले होते.

मांढळ शाखा

क्रांतीपर्वाच्या शुभमुहूर्तावर नवघटीत वि. सा. संघ शाखा मांढळचा उद्घाटन सोहळा पूर्वनियोजित पाहुणे प्रा. सुरेश द्वादशीवार अध्यक्ष वि. सा. संघ नागपूर, श्री. वामनराव तेलंग

उपाध्यक्ष वि. सा. संघ नागपूर, श्री. मा. ल. भोळे प्रसिद्ध साहित्यिक नागपूर काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित न राहिल्यामुळे डॉ. सूर्यभानजी पायघनी भारतीय खाण ब्यूरो येथील मुख्य अभियंता यांचे अध्यक्षतेखाली व प्राचार्य राम गुरुनूले, श्री. माधवराव कोंवाडे, डी. पी. डी. सी. सभासद, श्री. वसंतराव इटकेलवार माजी. सभापती कुही पंचायत समिती, देविदास तिरपुडे, ज्ञानेश्वर कुंलूरकर, पं. स. सौ. जयश्रीताई डोळस जि, प. स. नागपूर, सौ. आशाताई गायघनी अध्यक्ष श्री. लेमदेव पाटील कलावाणिज्य, महा. मांढळ यांच्या प्रमुख उपस्थितीत श्री. डी. एस. घवरोटे फौजदारी व दिवाणी न्यायाधीश कुही यांनी सरस्वतीच्या प्रतीमेसमीर दीप प्रज्वलन करून उद्घाटन केले.

वि. सा. संघ नागपूरचे माजी अध्यक्ष कै. ना. रा. शेंडे, मांढळ येथील सरपंच स्व. शेषरावजी राऊत यांना दोन मिनीट मौन पाळून वि. सा. संघ शाखा मांढळ तर्फे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

उद्घाटन सोहळ्याची सुरुवात श्री. लेमदेव पाटील कला/वाणिज्य महाविद्यालय मांढळच्या विद्यार्थी व विद्यार्थिनीनी गायलेल्या सरस्वती स्तवन व स्वागत गीताने झाली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाखाध्यक्ष प्रा. अविनाश तितरमारे यांनी केले, प्रमुख अतिथी श्री. राम गुरुनुले, बाबासाहेब तितरमारे, यांनी प्रत्येकी ५१/–रु. देणगी म्हणून वि. सा. सं. शाखेला देणगी प्रदान केली, मा. सभापती श्री. वसंतराव इटकेलवार यांनी सुद्धा २५१/–रु. ची देणगी प्रदान केली.

उद्घाटनपर भाषणात दिवाणी व फौजदारी न्या. डी. एस. घतरोटे यांनी आपले विचार व्यक्त करताना, म्हणाले की "साहित्य हा समाजाचा एक प्रकारे आरसा आहे या साहित्यरूपी आरशात समाजातील बऱ्या वाईट अनुभवाचे रेखाटन केले असते." पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे संचालन श्री. प्रकाश गोंडे, यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. अरुण पारडकर यांनी केले.

२. ऑक्टोबर गांधी जयंती

विदर्भ साहित्य संघ शाखा मांढळच्या वतीने स्थानिक बस स्टॉप मांढळ येथे सप्तरंगी क्रीडा व सांस्कृतिक मंडळाच्या माध्यमातून जॉनी मेश्राम लिखीत 'बेंडवा' हे पथनाटच गांधी जयंतीच्या मुहूर्तावर सादर करण्यात आले.

सरचिटणीस



अनुक्रमणिका

पोस्टल रजि. एन.जी.पी. नं. /४११
PRINTED MATTER PERIODICAL

युगवाणीचा हा जुलै-ऑगस्ट'१९९२ चा अंक.
हा अंक मुद्रणातील विलंबामुळे
बऱ्याच उशिरा आपल्या हाती पडत असून
या नंतरचे म्हणजे सप्टेंबर-ऑक्टोबर'९२,
नोव्हेंबर-डिसेंबर'९२ व जानेवारी-फेब्रुवारी'९३
हया एव्हाना आपणास प्राप्त व्हावयाच्या अंकांना देखील
त्यामुळेच विलंब संभवतो याची कृपया नोंद घ्यावी.
विलंबाबद्दल क्षमस्व.
गैरसोयीबद्दल दिलगीर आहोत.

प्रकाशक
'युगवाणी'

प्रकाशक मनोहर म्हैसाळ्कर, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, नागपूर-१२
मुद्रक मधुसूदन पांडुरंग बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धंतोली, नागपूर-१२

अनुक्रमणिका